Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख ७ माहे डिसेंबर सन १९१४ ई० [ अंक ५७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ।।।= शुद्ध शिलाजीत ।। असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व ३½+१½ गज ६ शे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ४८३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६½ तोळे असतें.

मुंबई बँक
आकोला २१-९-१० } J. G. Ridland. एजंट
नो० नं० ९

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयेप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट
नो. नं ४

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

## डायरी बक्षीस!!

(१)खडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ८६. (२)खडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ८६. [३] धर्मपद, किंमत ८४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ८९. ५ विदग्धवाङ्मय, किंमत ८३. (६) आकोलें (वऱ्हाड) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ८२. (७) मुलास थोडा उपदेश, किंमत ८८. (८) वाल्मीकीचा जय, किंमत ८८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ८१२. (१०) शिवलीलामृत किंमत ८८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील म्हणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल

भट आणि मंडळी, पुणें शहर.
नो. नं ४१४

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना
### ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः—पांजरा पोळचा नाका, चिंमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! । एकच भाव! ।

आटो मुरंगी आमचेकडे मिळणारा माल ओटो मुरंग

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुश्कहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. ही अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १।। रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २।। आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आयुर्वर्धक कार्डस, चिंशिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्दे व वेण्यांचें गंगावन इत्यादि वरील पत्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ४११

## चांदीचीं भांडीं.
### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २९

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरि ह्या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही.पी.नें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणें सिटी
नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केसनाशकचूर्ण किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमिंट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० बरब गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, तळहातावरील, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिव्यसुख' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, धिचवावर पड किं. १। रु० व डोळ्यांतील वेगळ तोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० सु० पत्रव्यारें, वंग प्रवाळ हात महीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

### नोटीस

नोटीस बेशमी साधू वा हरीबा घोडकी जात मराठे राहणार आकोला शहर पाटलाच्या मळ्यांत आकोला

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देते कीं तुम्ही माझे गंधर्वाचे नवरे असून गंधर्वास सुमारें ९ वर्षं झालीं. सुमारें ४।। वर्षें मी तुमच्या जवळ होते. त्यावर गेल्या नागपंचमीस तुम्ही माझे अंगावरचे माझे बापानें दिलेले दागीने काढून घेऊन मला माझे बापाचे घरीं आणून घातले तुमचे माझें भांडण वगैरे कांहीं झालें न. व्हतें, पुढें मला घेऊन जाण्या बद्दल माझ्या बापानें बरेच वेळां निरोप दिले परंतु तुम्ही

ढें मी वागवीत नाहीं असें । इकडील पंचास मिळऊन केलें असें कळते. तरी या नोटीशीनें कळविते कीं पासून १९ दिवसांत मला माझे दागिने व भांडी माझे . तसें नसल्यास मला ताब- ी द्यावी नाहीं पेक्षां वरील ीच तजवीज न केल्यास नो- ारकती समजून मी दुसरा . मग तुमचा मजवर अगर लावणारावर कोणताच हक्क ं. व तुमची तक्रार ऐकिली . कळावें ता० २७।११।१४ । निशानी आगठा मर्द साधू घेडकी राहणार मलकापूर हिचा खुद

नो नं ४ १२

## नोटीस

ेशमी कादरखा वा॥ फौजखां मुसलमान रा. ता. जळगांव.

यांसः—

सही करणाराकडून नोटीस देण्यांत मी तुह्मास जें पाच वर्षाच्या कुलमुखत्यार पत्र नोंदून दिलें तुमचें काम बरोबर होत नसल्यानें खे पासून रद्द केलें आहे. सदहू ग अन्वये तुह्मीं आमचे तर्फे मच्या इस्टेटी तर्फे कोणतेंही काम केल्यास त्याबद्दलची जबाबदारी राहून त्या कृत्यासंबंधीं कायदेशीर र। तुमचेवर राहील. मुमारे २ र्वीं तुमचें मुखत्यारपत्र मी तोंडीं ं हाते परंतु तुर्ला नापकिल्यां वर्तमान पत्रांतून नोटीस देण्यांत ाहे कळावे ता० २१-११-१९१४

सही.

सरदारखा वल्द गुलाब दस्तगीरखां पाटील रा. नूरपूर ता. जळगांव दस्तुर खुद

नो० नं० ४१२

## नोटीस

न १८९९ चा हिन्दुस्थानांतील वार- आक्ट कलम २१०, किंवा सन ८१ चा प्रोबेट आणि अडमिनिस्ट्रेशन कलम ६९ आन्वयें हुकुम. यमान डिस्ट्रिक्टजज्ज साहेब यांचे कोर्ट मुक्काम आकोला

. दिवाणी मुकदमा नंबर १०१ सन १४ ई०

अर्जदार रामलाल नेमिचंद खत्री आकोला.

विषयः— मृत्यु पत्राचे प्रोबेट मिळण्या र्यी अर्ज.

ज्या पेक्षां मयत चंदुबाई. मर्द गिरधारीलाल. जात खत्री राहणार आकोला हसिल आकोला जिल्हा आकोला. च्या मृत्युपत्राचे प्रोबेट मिळण्यासाठीं वरील अर्जदार यानें या कोर्टास अर्ज केला आहे व सदहू अर्जाची चौकशी या कोर्टांत तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९१५ ई० रोजीं आकोला. येथें करण्यांत येईल. त्या पेक्षां ज्याचा मयत चंदुबाई मजकूर याच्या मालमत्तेवर आपल्या हक्क संबंधा विषयीं दावा असेल त्या सर्व लोकांस या लेखानें नोटीस देण्यांत येत आहे कीं, त्यानें सर्वांनीं कोर्टांत हाजर राहून प्रोबेट दिले जाण्यापूर्वीं जी कारवाई करण्यांत येईल ती पाहावी.

आज तारीख २९ माहे नोव्हेंबर सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का.

K. K. Thakur
डिस्ट्रिक्ट जज्ज आकोला

नो नं. ४१४

## नोटीस

नोटीस बेशमी सखाराम वा॥ जानजी सुतार रा० वरुड बु॥ ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं, मौ० वरुड बु० येथील शेत सर्वे नं० ८९ ए० गुं० १२८२७ आ० रु० ३२ चे खाते माझें नांव असोन, त्या शेताचा मी पूर्ण मालक आहे. हें शेत आपण २३०० रुपयांस माझे जवळून ता० ९।१०।१२ इ० रोजीं विकत घेतले. व बयाना बद्दल रु० १०० तुह्मी हरी वा॥ सखाराम कुणबी रा० वरुड याचेपाशीं बरवर ठेवून, सदरहु रुपये पावल्या बद्दल तुह्मी माझेपासून पावती घेतली. व बाकीचे २२०० रुपये बारीसरों आठ दिवसात देऊन खरेदीखत करुन घेण्याचे ठरले होते असें असतां आपण अद्यापपर्यंत त्याचा कांहींच उलगडा केला नाहीं उलटपक्षीं इसारा बद्दल दिलेले रुपये १०० परत मागण्याकरितां तुह्मी मजवर आणि हरी सखाराम याचेवर आकोट स्मॉल कॉज कोर्टांत स्मॉ० मु० नं ४३८ चा केला होता.

१४

परंतु ह्या कोर्टास तो दावा चालविण्याचा अधिकार नाहीं ह्मणून योग्य कोर्टांत दाखल करण्याकरिता तो दावा तुह्मी ता० १२। ११।१४ रोजीं परत घेतला. ह्या सर्व व्यवहारावरुन हे स्पष्ट होत आहे, कीं, वरील शेत विकत घेण्याचा तुमचा इरादा दिसत नाहीं. ह्मणून तुह्माला ह्या जाहीर नोटीसीनें असें कळविण्यात येतें कीं, ही नोटीस पावल्यापासोन ८ दिवसांचे आंत तुह्मी आह्मास २२०० रुपये देऊन आमचे पासोन शेताचे खरेदी खत करुन घ्यावें. तसें न केल्यास हा करार पुराकरुन घेण्या करितां आह्मी तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करुं त्याचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. किंवा हें शेत आह्मी दुसऱ्यास विकल्यास त्यांत आह्मांस जें नुकसान येईल तें तुह्मास भरुन द्यावे लागेल. ही नोटीस दिली सही.

सही

मु० आकोट } तुळशीराम वा॥ विठु
तारीख } बेहडे तर्फे त्रिं० मा०
२९।११।१४ } चिरणीकर वकील रा० आकोट

नो० नं० ४१९

## नोटीस.

नोटीस बेशमी भिकाजी चंद्रभान भरणे रा. नोगलखेड ता. बाळापूर पो. बाळापूर यासः— मी खाली सही करणार. नोटीस देतो कीं माझी बायको तुमची चुलत पुतणी असोन ती साप्रत तुमचे घरी आहे. तिचे आई ह्मणजे माझे सासूने आपल्या इस्टेटीचें बक्षीस पत्र मरताना तिच्यानांवें करुन दिलें. तरी तिजजवळून हा बक्षीस पत्रानें मिळालेली इस्टेट तुह्मी तिला फुसलाऊन घेण्याचे विचारांत आहांत असें कळते, तरी तुह्मांस या नोटीसीनें बजावतो कीं तुह्मी या बाबतीत बिलकुल पडूनये. वरील इस्टेटी संबंधी जर कांहीं कागद पत्रें तिच्या जवळून करुन घ्याल तर ती रद्द समजली जाताल व असें करण्या पासून पराणामी जेमाझें नुकसान होईल तें कायदेशीर रितीनें मला कोर्ट मार्फत वसूल करावे लागेल व तसें करण्याचा खर्च तुमचे कडून वसूल केला जाईल. ता. ११२।१९१४

सही

पंढरी वा॥ खुशाल पाटील रा. मोरगांव
साधीजन तालुका बाळापुर
दः खुः पो. उरळ

नो. नं. ४६.

# वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष वद्य ९ शके १८३६

## विसाव्या शतकांतलें महायुद्ध.

गेल्या आठवड्यांत या युद्धाची विशेष कांहीं बातमी आली नाहीं, आणि जी आली आहे ती मित्र-राष्ट्राना सर्वथा अनुकूल अशीच आहे. आज सहा आठवडे क्याले घेण्याच्या प्रयत्नात जर्मनी आहे पण तें घेण्याचें तर दूरच, पण त्याच्याजवळसुद्धा जर्मन सैन्याला ब्रिटीश व फ्रेंच सैन्यानीं जाऊं दिलें नाहीं. जर्मनीच्या जंगी तोफांचा भडि- मार शिथिल झाला आहे. जर्मन बादशहाला मनुष्य प्राणाची कांहींच क्षिति वाटत नाहीं असें दिसतें. केवळ पुष्कळसा माणसांच्या लाटेनेंच आपण मित्र-राष्ट्रांना दडपून टाकूं अशी अद्याप त्याची समजूत दिसते. जर्मनीचें पाऊल या युक्तीनें रेसभर सुद्धां पुढें पडलेलें दिसत नाहीं. डिक्समुड फ्रेंचांनीं परत घेतल्याची खबर आली आहे. जर्मन आरमार अद्याप नमावि- स्थितींतच आहे. पण इंग्लिश व फ्रेंच आरमारें एकत्र मिळून त्यांनीं ईजिप्तच्या किनाऱ्याच्या रक्षणासाठीं आड्रियाटिक व डार्डेनेल्स यांचीं तोंडें बंद करुन ठेविलीं आहेत. रशियन सैन्याचें पाऊल पुढेंपुढें पडत आहे. या सैन्यानें जर्मन सैन्यावर जमास थक्क करुन सोडणारा असा विजय संपादन केल्याच्या बातम्या रशियातून येत आहेत. त्यांत कांहीं अतिशयोक्तीचा भाग असला तरी येवढें खास कीं ब्रेस्लॉ येथून जर्मनीला मागें हटवून तें शहर व भोवतालचीं खेडींपाडीं हस्तगत केलीं. इतकेंच नाहीं तर कांहीं ज- तोफा ही घेतल्या. बिस्तुला नदीच्या उ- च्या तीरावर जर्मन झपाट्यानें मागें ह- आहेत. ही सगळी स्थिति जर्मनीला निर- करणारी आहे यांत शंका नाहीं. या ि राशेचा आणखी एक पुरावा हा आहे जर्मनी अमेरिकेच्या मार्फत तहाची खट- करीत आहे अशा बातम्या तिन्हाईत रा- च्या वर्तमान पत्रांतून येऊं लागल्या आहे- ब्रिटिश आरमाराची श्रेष्ठता या युद्धांत अ- पर्यंत तरी उत्कृष्ट प्रकारें दिसून येत अ- इंग्रज व जर्मन बुडालेल्या सबमरीन बो- चा संख्या सारखीच आहे पण अद्य- इंग्रज लोकांचें एक ही डिस्ट्रॉयर बुड- नाहीं. जर्मनीचीं मात्र सात अ- बुडालीं. हें कांहीं थे- नाहीं. पण भविष्यकाळ याहून ही उज्ज्व- आहे असें मि० चर्चिल ह्मणतात. १९१- साल अखेर जर्मन आपल्या आरमारात तीं जहाजांची भर घालील. पण इंग्लंडची १- जहाजें नवीन करण्याची तयारी आहे हिंदुस्थानानें या युद्धात उत्कृष्ट कामगि- केल्याबद्दल सर्वतोमुखीं प्रशंसा होत आ- एकट्या गंगादीन नावाच्या हवालदारानें १- जर्मन लोकाना मारल्याबद्दल सर्वात मोठा लष्करी मान ह्मणजे व्हिक्टोरिया क्रॉस त्याला देण्यात आला आहे. या युद्धा- अनेक गुरखे, शीख, व मराठे गा- कामास आले आहेत. पंजाबचे रा० स- हरनामसिंग यांचे चिरंजीवही या युद्धा- पडल्याची खबर आली आहे.

## देवाचीं नावें.

प्रार्थना समाजाच्या सुबोधपत्रिकेंत ए- ब्राह्मभक्त या सहीनें इंग्रजी लेख लिहिणा- ह्मणतो कीं महाभारतात एके ठिकाणी महादेवाचीं १००८ व विष्णूचीं १००० नावें दिलीं आहेत. पण त्यातलीं पुष्कळ अशीं आहेत कीं तीं दोन्ही देवतांना - एका सर्वेश्वरालाही लावता येतील. उदा०— अंशु ह्मणजे प्रकाशमय; अकर= अनिर्मित, स्वयंभु, अनादि; अक्रूर= सदय; अकल= अविच्छिन्न; याप्रमाणेंच अक्ष= सर्वव्यापी; अक्षोभ्य वगैरे या ब्राह्मभक्ताला आपला हा शोध अपूर्व का वाटावा तें कळत नाहीं. हिंदुलोक आपला देव निराळा, व मुसलमानाचा निराळा, जैनांचा निराळा व बौद्धाचा निराळा असें मुळींच मानीत नाहींत. त्यांची बुद्धि इतकी कोती व मन इतकें संकुचित खास नाहीं. उत्तम वर्णाच्या ब्राह्मण जातीच्या शंकराचार्य इतकेच हिंदुलोक कबीर, नानक, येशूख्रिस्त व मुसलमानांचे पीर यांना भजतात व त्यांना नवस करतात. मग या ब्राह्मानें धार्मिक औदार्याचा सगळा गड्डा आपलेपाशीं आहे अशी कल्पना करुन हिंदुधर्माविषयीं निराळा प्रकार लोकांच्या समजुतींत आहे असें भासविण्याचा यत्न कां करावा व आपल्या अजब शोधची टिमकी का वाजवावी तें कळत नाहीं.

## जर्मनीचें विमानबळ.

प्रेडन नांवाचा एक जर्मन हेर जर्म- नीशीं द्रोह करुन इंग्रजांना मिळाला आहे. त्यानें जर्मनीच्या विमानबळाविषयीं कांहीं

चमत्कारिक माहिती प्रसिद्ध केली आहे. तो ह्मणतो कीं जर्मनीचीं कित्येक झेपलिन विमानें गतवर्षीं जळालीं व इतर प्रकारानीं नष्ट झालीं यावरून लोकांनीं स्वस्थ राहूं नये. जर्मनीचे खाण्याचे दांत निराळे, आणि दाखविण्याचे निराळे, असा प्रकार आहे. प्रदर्शनांत दाखविण्याचीं झेपलिन विमानें जर्मनी जवळ निराळीं आहेत, आणि खास लष्करी उपयोगासाठीं बांधलेलीं अगदीं निराळीं आहेत. हीं लष्करी विमानें लपवून ठेविलीं आहेत. तशाच आणिबाणीच्याप्रसंगीं तीं बाहेर येतील. त्यांत जो वायु भरतात तो अगदीं नव्या तऱ्हेचा आहे. हा वायु पेट न घेणारा असून वाटल्यास तो द्रवरूपानें पेटींत भरून नेतां येतो. हीं लष्करी विमानें अल्युमिनम पेक्षांही हलक्या अशा एका धातूचीं केलेलीं आहेत. हीं विमानें दहा हजार फूट उंच जाऊं शकतात. या विमानांत भरलेल्या वायूच्या अंगच्या उष्णते मुळें विमानांत बसलेल्या माणसांचे हातापायास ऊब मिळते. हीं विमानें सुमारें एक हजार मैल लांब जाऊं शकतात त्यांत हजारों टन दारूगोळा ही नेतां येतो.

## खिशांत घालण्याजोगें बिन तारेचें यंत्र

इटली देशांतल्या एका शास्त्रज्ञ प्रोफेसरानें खिशांत मावण्याजोगें बिनतारी तारायंत्र तयार केलें आहे. याच्या योगानें स्वतःला इष्ट स्थळाकडे बातम्या पाठवितां येतात इतकेंच नाहीं, तर ७५० मैलावरच्या दुसऱ्या कोणी माणसानें तिसऱ्या माणसाला पाठविलेल्या बातम्या ही अडवितां येतात. इतकें उपयुक्त हें यंत्र असून त्याची किंमत फक्त १२ शिलिंग ह्मणजे सात आठ रुपये आहे. असें ह्मणतात कीं जर्मन सरकारनें त्याशास्त्रज्ञाला याबद्दल एक कोट रुपये देऊं केले होते, पण मी आपल्या देशाला माझ्या शोधाचा फायदा प्रथम करून देईन, नको तुमचे रुपये नकोत असें स्वदेशाभिमानाच्या बाण्याचे उत्तर त्यानें दिलें!

## इतर बातम्या

जामीन देण्यावर हमदर्द व कॉमरेड हीं मुसलमानांचीं वर्तमानपत्रें बंद ठेवण्यात आलीं आहेत. कलकत्त्याच्या अलीहिलाल पत्राजवळून घेतलेली जामिनकीबद्दलची दोन हजार रुपयांची रकम जप्त करण्यात आली आहे. नाताळांतल्या हिंदी लोकांवरचा तीन पौंडांचा कर गेल्या जून महिन्यापासून उठविण्यांत आला आहे असें रे० मि० अँड्र्यूज हे लिहितात. कांहीं जातींत प्रेतयात्रेबरोबर जाणारे 'रामनाम सत्य है' असें मोठ्यानें ओरडत जातात. या गोष्टीला कोणत्या शास्त्राचा आधार आहे असें पाटलीपुत्राचे संपादक विचारतात. प्रसिद्ध हिंदी लेखक ठाकूर गदाधरसिंह हे युरोपांतल्या युद्धांत राजपूत पलटणी बरोबर गेले आहेत. तिकडे जाण्यापूर्वी सध्याच्या युद्धाचा इतिहास लिहिण्याचा त्यांचा विचार होता. आतां प्रत्यक्ष अनुभवसिद्ध माहिती देतां येईल. हिंदुस्थानाला प्राचीन काळीं बंदुकीची दारू व तोफा माहित होत्या कीं नाहीं या विषयीं एक सप्रमाण लेख मद्रासच्या कॉमनवील पत्रांत प्रसिद्ध होत आहे.

## यवतमाळची सेंट्रल ब्यांक.

यवतमाळच्या सहकारी सेंट्रल ब्यांकचा दुसरा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा रिपोर्ट जून १९१४ अखेरपर्यंतचा आहे. रिपोर्टाच्या सालांत ब्यांकेचें भांडवल ३३२९ रुपयांपासून वाढून ३९१९८ रुपयांवर गेलें. पैकीं १९१९० रु० भांडवल शेअरच्या रूपानें आहे. या वर्षांत नफ्याची नक्की रकम ६६४ रु० होती. त्यांची वाटणी करतांना शेंकडा ५ टक्के भागीदारांना देण्यांत आले. ब्यांकेला जोडलेल्या सोसायट्यांची संख्या ५ होती ती १४ झाली आहे. लोकांनीं कर्जाऊ ह्मणून नेलेल्या रकमांची फेड नेमलेल्या वेळीं केली हीही एक समाधानाची गोष्ट आहे. ब्यांकेच्या व्यवस्थेच्या कामीं सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद रा० कैकिणी, ऑन० सेक्रेटरी रा० देशपांडे व रा० खानझोडे यांनीं फार मदत केली. या संस्थेची अशीच सतत भरभराट होवो व तिच्या हातून इष्ट हेतु सिद्धीस जावो असें आह्मी चिंतितों.

## मद्रासचा पदवीदान समारंभ.

युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचे बाबतींत तरी मद्रास इतर सर्व प्रांतांच्या पुढें आहे इतर युनिव्हर्सिटींतून पदवीदान समारंभाच्या वेळीं भाषण करण्याचा मान चान्सेलर किंवा व्हाइसचान्सेलरांसच देण्यांत येतो. मद्रास युनिव्हर्सिटी हा मान दरसाल निरनिराळ्या सर्वमान्य फेलोंना देत असते. यामुळें मद्रास युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचीं भाषणें नेहमीं वाचण्यालायक व मनन करण्यालायक असतात. यंदा हा मान ना० मि० शिवस्वामी आयर यांना देण्यांत आला होता. यंदाच्या त्यांच्या भाषणांत स्पष्टवक्तेपणा, स्वत्व, आणि व्यवहारोपयुक्तता हे गुण विशेष होते. बहुतक पदवीधर सरकारी नोकरींत शिरल्यानें त्यांच्या बुद्धीचा व शिक्षणाचा लाभ खासगी धंद्यांना व व्यापाराला मिळत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे असें त्यांनीं सांगितलें. त्याच प्रमाणें आजपर्यंत लाटीन, ग्रीक सारख्या प्राचीन युरोपियन भाषाकडे लक्ष देण्याविषयीं पदवीधरांना उत्तेजन देण्यात आलें, तसें आपल्या संस्कृताच्या हक्काकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं या बद्दल ही त्यांनीं खेद प्रदर्शित केला. तिसरी गोष्ट पाश्चात्य पद्धतीनें वैद्यकाचा अभ्यास केलेले आमचे डाक्तर आयुर्वेदाचें अध्ययन न करतां त्याचा तिरस्कार करतात याही गोष्टीचा त्यांनीं तीव्र निषेध केला. नामदार साहेबांच्या भाषणांतले हे तिन्ही मुद्दे खरोखर विचार करण्यासारखे आहेत. विशेषतः तिसरा मुद्दा अधिक महत्त्वाचा आहे व व्यवहाराचे दृष्टीनें तर तो अत्यंत उपयुक्त आहे. सध्या युद्धामुळें स्वस्त युरोपियन औषधें जर्मनीहून येण्याचें बंद झाल्याबरोबर आमच्या डाक्तर लोकांची कशी तिरपिट उडाली आहे याचा विचार केला आणि त्याबरोबरच आमच्या काष्ठामेध्याचीं औषधें किती स्वस्त आणि सहजप्राप्य असतात हें पाहिलें तर स्वदेशी वैद्यकाची हेळसांड करणाऱ्या आमच्या डाक्तर लोकांची अक्षम्य चूक उत्तम प्रकारें दिसून येईल. औषधांच्या बाबतींत तरी निदान आह्मी परावलंबी होण्याचें बिलकुल कारण नाहीं. आमचे पदवीधर डाक्तर आतां तरीं डोळे उघडून आर्य व युनानी वैद्यकाचा अभ्यास करतील काय ?

## स्थानिक स्वराज्याचा आदर्श

बंगालचे गव्हर्नर नेक नामदार लॉर्ड कारमायकेल हे अनेक बाबतींत इतर अधिकारी वर्गाहून अगदीं निराळ्या प्रतीचे आहेत. त्यांचें गुप्त वेषानें हिंडणें, देशी ग्रंथकारांच्या गुणाची मोकळ्या मनानें स्तुति करणें, स्वतः साहित्यसंमेलनाला हजर राहणें, राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यास आपल्या एक्झिक्युटिव्ह कौंसिलचा सभासद नेमणें वगैरे अनेक गोष्टी या पूर्वीं वर्तमानपत्रांतून पूर्वीं प्रसिद्ध झाल्या आहेत. परवा त्यांच्या कौंसिलाचे सभासद ना. सर अर्ल ड्यूक हे वारले त्याबद्दल सरकारी ग्याझिटांत जो मृत्युलेख आला होता त्यात ते देशी लोकांविषयीं सहानुभूति ठेवीत या गोष्टीचा ठळक रीतीनें उल्लेख करण्यांत आला होता ही गोष्ट ही त्यांच्या सरळ व उदार मनाची साक्ष देणारी आहे. अशा थोर अधिकारी पुरुषाचे स्थानिक स्वराज्य बद्दलचे विचार ही त्यांच्या उदाहरणास साजेलसेच असल्यास नवल नाहीं. मिदनापूर येथील लोकांस उद्देशून भाषण करतांना ते ह्मणाले कीं बंगालच्या लोकांना त्यांच्या स्थानिक स्वराज्य चालविण्याच्या कामीं मदत करणें हें आपण आपलें कर्तव्य समजतों. हें स्थानिक स्वराज्य आरभीं जरी मर्यादित असलें तरी पुढें त्याच्या कर्तव्याचें क्षेत्र वाढत गेलें पाहिजे स्थानिक स्वराज्य लोकनियुक्त सभासदांच्या बहुमतानें बनलें पाहिजे. त्यानें स्थानिक पोलिस, रस्ते, आरोग्य, पाण्याचा पुरवठा वगैरे गोष्टीच नव्हेत, तर लोकांचे दिवाणी आणि फौजदारी खटल्यांची चौकशी करून निकाल दिले पाहिजेत. अशा रीतीनें भक्कम पायावर ते उभारलें गेलें तरच तें लोकांना हितावह व सुखकारक होईल. स्थानिक स्वराज्याच्या आदर्शाचें हें चित्र लॉर्ड मॉर्ले यांच्या चारदेव बद्दल हट्ट घेण्याच्या निषेधाच्या चित्राहून किती निराळे आहे! लॉर्ड कारमायकेल सारखे उदार मनाचे अधिकारी लाभणारा बंगाल किती भाग्यवान् ह्मटला पाहिजे!

## कौन्सिलांतला अपूर्व प्रकार.

गेल्या आठवड्यांत मद्रासच्या कायदेकौंसिलाच्या बैठकींत एक अपूर्व प्रकार घडून आला. त्या कौंसिलापुढें इरिगेशन बद्दलचें एक बिल आलें होतें. या बिलानें जमीनदारांच्या हक्कांवर थोडीशी गदा येण्यासारखी होती. सध्या युद्धामुळें लोकांचीं मनें अस्वस्थ व चिंतायुक्त झालेलीं आहेत अशा वेळीं हें बिल पुढें आणणें बरोबर होणार नाहीं अशी एका लोकनियुक्त सभासदानें सूचना केली व तिला इतर बहुतेक बिनसरकारी सभासदांनीं पाठबळ देऊन बहुमतानें तें बिल पुढें येऊं दिलें नाहीं. सूचनेला पाठबळ देण्यांत चार युरोपियन सभासद ही होते, ही गोष्ट विशेष सांगण्यासारखी आहे. त्या बरोबरच एकादेशी सभासदानें सरकारासारखें मत दिलें हेंही सांगितलें पाहिजे. बहुमत या प्रमाणें बिलाच्या विरुद्ध झालें तरी त्या बहुमताला फेटाळून लावण्याचा अधिकार व्हाइसराय साहेबांस आहे ही गोष्ट खरी असली तरी कौंसिलांत सहकारी बिलाविरुद्ध देशी व युरोपियन सभासदांचें एक मत आणि तें ही सरकारी अधिकाऱ्याच्या मर्जीविरुद्ध झालें ही गोष्ट अपूर्व आहे.

## जर्मन लोकांकरितां दहा आज्ञा.

खालीं लिहिलेल्या दहा आज्ञांचीं ( Ten Commandments ) जाहीरपत्रकें सर्व जर्मनीभर वाटण्यात आलेलीं आहेत असें कळतें:—

१ कोणत्याही खर्चाच्या बाबतींत आपल्या लोकांच्या हिताकडे लक्ष ठेवीत जा.

२ परदेशी माल विकत घेतला ह्मणजे आपल्या देशाला दैन्यावस्था येते. हें कधींही विसरूं नका.

३ तुमच्या पैशाचा फायदा जर्मन लोकांखेरीज इतर कोणाही मिळूं नये.

४ परकीयांचीं यंत्रें वापरून जर्मन कारखाने भ्रष्ट करूं नका.

५ भोजनाचे वेळीं परदेशी खाद्य पदार्थ भक्षण करूं नका.

६ जर्मनींत तयार झालेले कागद, जर्मन टांक व जर्मन टीप कागद हेच वापरा.

७ जर्मन फळें ........ यानींच तुमच्या अंगीं खरें जर्मन तेज उत्पन्न होईल.

८ जर्मनीतला मास्ट कॉफी जर तुह्मांला आवडत नसेल तर जर्मन वसाहतींतली कॉफी वापरा.

९ जर्मनींत झालेलें कापडच वापरा.

१० परकीय भाषा पहून या वचनापासून भ्रष्ट होऊं नका; कोणी कांहींही ह्मणोत परंतु जर्मन नागरिकाला जर्मन मलच बोध आहे एवढी बाकी खात्री असूं द्या.

'स्वदेशी चळवळी'चें तत्त्व वरील दहा आज्ञांत चांगलें गोंविलें आहे. आपल्या हिंदुस्थानांत कितीतरी जर्मन माल येत आहे. व त्यांवाचून आपलें चालेनासें झालें आहे. हल्लीं युद्धामुळें या मालाच्या प्रवाहाला आहोटी लागली आहे. तेव्हा वरील आज्ञां आपल्या परिस्थितीप्रमाणें कमी जास्त फरक करून त्या आपणालाही पाळता येण्यासारख्या आहेत. या कामी आपणांस आपल्या दयाळू इंग्रज सरकारचें सहाय्य अवश्य पाहिजे. आता आणीबाणीची वेळ आली आहे. आपण योग्य चळवळ केली तर सरकारची या कामीं आपणाला मदत मिळेल. ही सोन्याची संधी गमावली तर मागाहून आपणांला पश्चात्ताप करीत बसावे लागेल. वाईटापासून कधीं कधीं चांगलें निष्पन्न होतें अशी एक ह्मण आहे. त्या न्यायानें हल्लींच्या भयंकर युद्धामुळें आपल्या जर औद्योगिक उन्नतीचा वाटा चालावयास मिळाला तर तो अलभ्य लाभच होय ह्मणावयास हरकत नाहीं. एका वेळ हिंदुस्थान औद्योगिक कलाकुसरींचें माहेरघर होतें. परंतु आतां तें त्याच कलांना अगदीं पारखे झालें आहे. ही स्थिति

मंशानें जरी पालटली तरी तेवढ्यांतच समाधान मानावयास जागा आहे. रहाटगाडग्याप्रमाणें हिंदुस्थान वरच्या पायरीपासून खालीं ढकललें गेलें होतें. तेंच आतां पुन्हा " नीचैर्गच्छ—त्युपरिच परां चक्रनेमिक्रमणे " या न्यायानें वर सरसावेल. सारांश हिंदुस्थानच्या भावी उन्नतीचा काल जवळ आला आहे अशी आशा प्रदर्शित करण्यास कांहीं हरकत नाहीं.

## सुखप्रसूति.

प्रसूतिसमय हा स्त्रियांना मृत्युसमयी-प्रमाणेंच भासतो, त्यातून त्या सुखरूपपणें पार पडल्या ह्मणजे त्यांचा पुनर्जन्म झाल्या-सारखाच असतो. या करितां जेणेंकरून सुखप्रसूति होईल असे उपाय शोधून काढण्याकडे शास्त्रज्ञांचें लक्ष लागून राहिलें होतें. अमेरिकेंतील बेहन युनिव्हर्सिटीमध्यें एका प्रकारची एक योजना अंमलांत आली आहे. त्या योगानें कांहीं कष्ट न होतां सुखप्रसूति होते असा अनुभव आला आहे. ... स्त्रियांवर या योजनेचे प्रयोग करून पहाण्यांत आले यामुळें एकही स्त्री मृत्युमुखी पडण्याची भीति नाहीं इतकेच नाहीं तर बालमृत्यूचें प्रमाणही पुष्कळ कमी होतें असे शास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे.

या योजनेप्रमाणें Scopolamin व morphium या औषधांचें मिश्रण एकदां किंवा दोनदां द्यावें लागतें व त्यामुळें थोडीशी गुंगी twilight sleep येते. ही गुंगी व बेशुद्धि फार मात्र फरक असतो. या गुंगींत बाहेर काय चाललें आहे हें सर्व कळतें ह्मणून खोलीत थोडासा अंधार व शांतता ठेवावी लागते ह्मणजे नुकत्याच झालेल्या गोष्टींचें विस्मरण होतें परंतु एखादी सूचना दिली तर ती मात्र कळूं शकते. शक्तीही कायम रहाते. प्रसूतीचें बिलकुल भान रहात नाहीं. औषधाचा गुण लागू पडला कीं नाहीं हें पाहण्या करितां एखादी वस्तु स्त्रीस दाखवितात. अर्ध्या तासानें पुनःतीच वस्तु दाखवितात व पूर्वी ही वस्तु पाहिली आहे काय असें विचारितात. वस्तु पाहिली आहे असें तिनें सांगितलें तर औषध लागू पडलें नाहीं असें समजून पुन एकदां औषध टोंचतात. या योजनेंत कोणत्याही हत्यारांचा उपयोग करावा लागत नाहीं. प्रसूति समयीं शक्तीचा व्ययही फार होत नाहीं. व ह्मणून प्रसूतिनंतर शक्ति येण्यास फार दिवस लागत नाहींत.

या योजनेप्रमाणें एका स्त्रीची सकाळीं ९ वाजतां प्रसूति झाली. त्या नंतर ती अगदीं नेहमीप्रमाणेंच दिसे. आठ वाजतां तिनें फराळ केला व दुपारी चांगली नेहमीप्रमाणें जेवली. एका आठवड्यांतच ती बाहेर फिरूं येऊं लागली. मोठमोठ्या दवाखान्यांत ही योजना कितपत शक्य होईल हा एक मोठा प्रश्न आहे. कारण औषधांचे डोसांचें प्रमाण ठरविणें, वेळाचा अंदाज, गडबड बंद करणें वगैरे गोष्टी फार कठिण आहेत.

## सहकारी चळवळ

( मे. क्रास्थवेट सा० रजिस्ट्रार नागपूर व वऱ्हाड यांनीं अकोलें येथील शेतकी कानफरन्स पुढें वाचलेल्या निबंधाचें रूपांतर)

मागील अंकावरून पुढें चालूं

१ सहकारी पतपेढ्यां संबंधानें व त्याच प्रमाणें सहकारी शेतकी संघा (युनियन) संबंधानें मी निबंध वाचावा अशी मिस्तर क्रुस्टन यांनी इच्छा दर्शविली आहे, परंतु ज्याच्या जवळ विकण्या करितां औषध ठेविलें आहे, त्यानें सदरहू औषध किती चांगलें आहे याबद्दल गुणानुवाद प्रत्येकाजवळ गाण्यापेक्षां तें औषध ज्यांनीं विकत घेतलें आहे त्यांनींच त्या औषधाची स्तुती करावी असें मला वाटतें. वऱ्हाडामध्यें (काटन—युनियन्स) उत्तम कापसाची लागवड वाढविण्याच्या हेतूनें जे संघ स्थापन झाले आहेत त्यांस करून जे काम घडून येते ते चांगलें असल्याबद्दल जरीं निरनिराळ्या ठिकाणाहून गुणानुवाद ऐकू येतात तरी त्यांच्या कामाच्या बरेवाईट पणा बद्दल अद्याप एक मत झालेलें दिसून येत नाहीं. हल्लीं या संघाकडून जें काम होत आहे त्याची माहिती वऱ्हाडांत बऱ्याच लोकांना आहे असें मला वाटतें. जेव्हां हे संघ प्रथम स्थापण्यांत आले तेव्हां या कामानिमित्त भांडवल देण्यास शेतकरी अगदीं नाखुष होते, परंतु मला एवढें सांगितलें पाहिजे कीं, संघाजवळ स्वतःचा सरकी काढण्याचा कारखाना असल्या शिवाय त्याच्याकडून फारच थेट काम घडून येणार आहे. आज पावेतों जे संघ काढले आहेत त्या करिता भांडवल मुळींच मागितलें नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल; कारण संघानें नेमिलेल्या कामदारांच्या पगारापेक्षां जास्त खर्च करण्याची जबाबदारी या संघांच्या सभासद वर आजपर्यंत नसे व हें कामदाराचें वेतन देण्याकारितां दर एकरी दोन आणे पासून सहा आणे पावेतों प्रत्येक सभासद वर्गणीच्या रुपानें देत आहे. रोझीया जातीच्या कापसाची लागवड केल्यापासून जास्त माल निघाल्यामुळें सभासदास जास्त नफा होतो, व हा नफा दर भागीदारास सरासरीनें सेंकडा सहासष्ट पडतो असें दिसून आलें आहे. ता० ३० जून १९१४ ला वऱ्हाडात चार संघ अस्तित्वांत होते, त्यांनीं दोन लक्ष सातहजार तीनशें दैशी पौंड निर्भेळ रोझीयम कापसाची सरकी विकली आहे, या प्रमाणें या संघानी सहकारी तत्वाच्या मदतीनें केवळ आपल्या सभासदांचाच फायदा केला नाहीं तर ह्या संघातून निघालेली निर्भेळ सरकी ज्या ज्या शेतकऱ्यांनीं विकत घेतली आहे, त्याचाही फायदा केला आहे. सूत काढणाऱ्या व्यापारी मंडळाचे सेक्रेटरी मि. मार्नो स्मिट यांनीं वऱ्हाडांतील संघाचें काम पाहिलें, त्या बद्दल त्यांनीं खालील प्रमाणें या संघाबद्दल आपलें मत दर्शविलें आहे.

" या संघाची व्यवस्था माझ्या मतें हिंदुस्थानांत जितकी पूर्ण असावी तितकी आहे. रोझियम कापसाच्या झाडांची निवड एका शेतांत होते, आणि जेंव्हां पसंत केलें जाते त्याची लागवड अकोला येथील फार्म मध्यें मोठ्या प्रमाणावर करण्यांत येते व तेथें या कापसाच्या लागवडीपासून पुष्कळ फायदा होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येते तेथील सरकी बऱ्याच संघाना पुरविण्यांत येते, व त्यांच्या कडून ही सरकी इतर शेतकऱ्यांना विकण्यांत येते, व या प्रमाणें या कापसाची लागवड सहकारी पतपेढ्यांचे सभासद आपापल्या शेतांतून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. सरकारानें एक अधिकारी नेमिला आहे तो जी पाहणी करतो तिजमुळें रोझीम कापसा बरोबर दुसऱ्या जातीची भेसळ होते कीं काय याबद्दल दक्षता ठेवण्यांत येते, या शेतातून जी सरकी निघते ती साधारण्य शेतकऱ्यांना लागवडी करितां मिळते. याप्रमाणें रोझीयम कापसाच्या लागवडी वर सरकारची देख रेख गेल्या तीन वर्षांपासून आहे आणि शेतकी खात्याच्या नजरे खालीं ज्या इतर शेतांतून या कापसाची लागवड होते, ती आसपासच्या शेतकऱ्यांना आयतीच पाहण्यास सांपडते. ह्या प्रमाणें सहकारी पतपेढ्या, शेतकीच्या सभा व सीड युनियन्स यांच्या मदतीनें शेतकी खात्याच्या कामास पुष्कळ मदत मिळाली आहे व या योजनेचें अनुकरण इतर प्रांतांनीं करण्यासारखें आहे मद्रास इलाख्यांत यातऱ्हेची योजना अस्तित्वात नाहीं."

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे सहकारी तत्वावर चालविलेल्या ब्यांका आणि सहकारी पतपेढ्या यांच्या योगानें शेतकऱ्यांत स्वावलंबन आणि काटकसर या तत्वाचा प्रसार होऊन त्याच्यांत असणारे भांडवल एके ठिकाणीं करतां येईल व त्याचा उपयोग तुमच्या प्रांतांतील शेती जास्त किफायतवार करण्या कडे झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि शेतकऱ्यांच्या अंगीं स्वावलंबन आणि नेटाचा प्रयत्न, करण्याची हौस हे गुण मुरले ह्मणजे शेती किफायतवार होईल; तेव्हां ज्या योजनेनें हल्लींच्या चढा ओढींत हे गुण अंगांत येतील तिच्या मुळें एकंदर राष्ट्रांतील व्यक्तींची दानत व त्याची राहणी यांत सुधारणा झाल्यावांचून राहणार नाहीं. याप्रमाणें सहकारी चळवळ ही पुढील सुस्थिती प्राप्त करून देणारी पायरीच होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं. किंवा ही चळवळ ह्मणजे असा दरवाजा आहे कीं तो उघडल्या बरोबर हिंदुस्थानास सुस्थिती प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं. हा दरवाजा तुह्मा वऱ्हाडवासी जनांस वाटेल तर बंद ठेवितां येईल परंतु तुह्मास वाटेल तर दृढनिश्चयानें व नेटाचा प्रयत्न करून तो तुह्माला उघडतां येईल व त्या योगानें तुह्माला भावी सुख साध्य करून घेतां येईल.

## पुराणांतलें शास्त्रीय ज्ञान.

नोवेंबरच्या ' नवयुगा'च्या अंकांत रा० वासुदेव गोविंद आपटे यांचा ' पुराणांतलें शास्त्रीय ज्ञान ' याविषयावरील लेख वाचण्यासारखा आहे. पुराणें ह्मणजे. शिमगा होत ही खोटी समजूत आमच्या सुशिक्षित लोकांच्या मनांत इतकी दृढ होऊन बसली आहे कीं सबंध अठरा पुराणें वाचलेला पदवीधर क्वचितांत एक तरी मिळेल कीं नाहीं याची शंका आहे. पुराणाविषयींचा ह्या आह्मां सुशिक्षितांचा कटाक्ष किती निराधार आहे हें दाखविण्याच्या उद्देशानें रा० आपटे यांनीं हा लेख लिहिलेला दिसतो. पुराणांत धर्म, नीति, व राजकारण यांची उदात्त तत्वें जागोजाग कशी चमकतात हें त्यांनीं मत्स्यपुराणसार नांवाच्या आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत दाखविलें होतें. त्या प्रस्तावनेची पुरवणीच हा लेख आहे. यांत अध्यात्मिक ज्ञानाच्याच बाबतींत नव्हे तर ज्योतिष, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र वगैरे भौतिक शास्त्रासंबंधानें सुद्धां आमच्या लोकांची कशी प्रगति पौराणिक काळांत झालेली होती व प्रो० जगदीशचंद्र बोस यांच्यासारख्या हल्लींच्या शास्त्रीय शोधकांच्या शोधाचीं बीजें पुराणातून कशीं भरलीं आहेत हें थोडक्यात दाखविलें आहे. रा० आपटे यांच्या लेखांत एक टळक दोष आह्मांस दिसतो तो हा कीं हा त्याचा लेख फार लहान व सूत्र पद्धतीनें लिहिलेला आहे. कदाचित् सध्याच्या महाराष्ट्रीय वाचकांच्या प्रवृत्तीवर फार ताण न पडावा ह्मणून त्यांनीं मुद्दाम हा लेख संक्षेपानें लिहिला असेल. पण आमची अशी सूचना आहे कीं त्यांनीं अशा प्रकारचे लेख वारंवार लिहून पुराणाच्या वाचनाकडे सुशिक्षिताची प्रवृत्ति ओढून नेण्याचा इष्टयत्न अवश्य करावा. रा० आपटे यांनीं आपल्या लेखात शेवटी एक सावधगिरीची सूचना केली आहे ती आमच्या मतें फार अवश्य व महत्वाची आहे. पुराणातून दिलेलें शास्त्रीय ज्ञान हे त्या काळचें महत्तम शास्त्रीयज्ञान नाहीं. तर त्या काळच्या प्रचलित शास्त्रीय समजुतींचें तें प्रतिबिंब आहे हें ध्यानांत न राहिल्यामुळें पुष्कळ लोक पुराणाला वष्कळ ह्मणत असतात. पण पुराणें हे शास्त्रीय ग्रंथ नव्हेत, तर तत्कालीन सामाजिक प्रगतीचें तें मापनयंत्र आहे या दृष्टीनें पुराणांकडे पाहिलें ह्मणजे या आक्षेपाचें निरसन होतें, इतकेंच नाहीं, तर आमच्या सामाजिक प्रगतीच्या इतिहासाचें तें एक महत्वाचें साधन आहे. पण या मुद्याकडे लक्ष न दिल्यामुळें आमच्या पुराण ग्रंथांना सुशिक्षितांनीं वाळीत टाकिलें आहे. यापुढें तरी त्यांवरचा बहिष्कार आमचे सुशिक्षित काढून घेतील आणि सहृदयतेच्या दृष्टीनें व ऐतिहासिक पद्धतीनें पुराणाचें निरीक्षण करतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

## युद्ध आणि सरकारचें राज्यधोरण.

इंग्लंड हें राष्ट्र ह्मणजे आज जवळ जवळ एक शतकभर खुल्या व्यापाराच्या तत्वाला चिकटून बसलें होतें. वाग्युद्धाचा त्याच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. पण सांप्रतच्या शस्त्रयुद्धानें त्याला अंगीकृत तत्वापासून ढळण्यास लाविल्याचें श्रेय घेतलें आहे. इंग्लंडनें ब्रिटिश व्यापाराच्या वृद्धीसाठीं संरक्षणतत्वाचा स्वीकार करून ब्रिटिश उद्योग धंद्यांना उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. यासाठीं ब्रिटिश कारखानदारांना सवलती देण्यासच नव्हे तर सदर कारखान्यांचे शेअर विकत घेऊन भांडवल पुरविण्यास ही तें तयार झालें आहे.

इंग्लंडचें हें राज्यधोरण बदलल्यावर हिंदुस्थान सरकारही आपलें धोरण बदलण्यास तयार होईल अशी आम्ही आशा करतों. सध्या आपलें सरकार देशी कारखानदारांस नुसतें शाब्दिक उत्तेजन देत आहे. पण लवकरच या शाब्दिक उत्तेजनाचें प्रत्यक्ष मदतीत रूपांतर व्हावें हीच आम्हां सगळ्या भारतीयांची उत्कट इच्छा आहे. हिंदुस्थानानें ब्रिटिश राष्ट्रासाठीं आपलें सर्वस्व अर्पण केलें आहे. अशावेळीं सरकार हिंदुस्थानासाठीं थेवढी उदारता दाखविण्यास ही तयार होणार नाहीं असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं.

वर सरकारच्या 'शाब्दिक' उत्तेजनाचा जो आम्हीं उल्लेख केला आहे त्याच्या अर्थाचा खुलासा करणें अवश्य आहे. आमच्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं सरकारचें व्यापारी खातें निरनिराळ्या जातीच्या मालाच आयात व निर्यातीचे आंकडे प्रसिद्ध करून कोणता माल हिंदुस्थानांत [illegible] केला असता त्याला विशेष [illegible] होईल [illegible] माहिती सध्या देत आहे व [illegible] कसा तयार करता येईल या संबंधाच्या माहितीचीं स्वतंत्र पुस्तकें लवकरच काढणार आहे. या पुस्तकांतल्या माहितीचा पुष्कळ उपयोग निःसंशय होईल ही गोष्ट [illegible] पण तेवढ्यानें कारखानदारांच्या [illegible] अडचणी दूर होतील असें नाहीं. त्यांच्या सध्याच्या अडचणी म्हणजे भांडवलाचा अभाव, व [illegible] [illegible] दिवाळखोरीमुळें [illegible] [illegible] हिंदुस्थानांत [illegible] त्या अडचणी दूर केल्या असता सरकारनें प्रत्यक्ष मदत दिल्यासारखें होईल.

## हिंदुस्थानच्या रेलवे संबंधीं रिपोर्ट.

रेलवे बोर्डकडून १९१३—१९१४ सालचा हा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून पुढील माहिती मिळते— आजपर्यंत रेलवेवर चार अब्ज व ४० कोट ६० लाख खर्च झाला आहे. ७ कोट ६८ लक्ष ६० च्या सडका तयार होत आहेत. गेल्या सालीं रेलवेवर १८ कोट ४६ लक्ष ६० खर्च झाला एकंदर रेलवेसालचें उत्पन्न ६६ कोट ९८ लक्ष झालें. पैकीं निव्वळ नफा ३ कोट ६३ लक्ष ६० हजार. मीटर गेज रेलवे ४९२ मैल आहेत. पैकीं १९० मैल रेलवे नुसत्या ग्वाल्हेर संस्थानांत आहेत. डिस्ट्रिक्ट बोर्डें ही स्वतःच्या रेलवे बांधण्याचा विचार करूं लागलीं आहेत. गेल्या सालीं बहुतेक सर्व मोठ्या देशी संस्थानिकांनीं आपापल्या संस्थानांत रेलवेवर अधिक खर्च केला. बडोदें, कोल्हापूर, हैदराबाद, जयपूर, जोधपूर, त्रावणकोर, वगैरे संस्थानांतून गेल्यासालीं रेलवेचा विस्तार करण्यास मंजुरी मिळाली आहे. ग्वाल्हेर संस्थानांत कोठें कोठें नवीन रेलवे काढण्यासारख्या आहेत त्याची पाहणी करण्याच्या कामावर पुण्याचे ना० मि० गोडबोले यांची नेमणूक करण्यात आली आहे. ना० गोडबोले यांनीं दौंड बारामती रेलवे बांधण्याचें काम यशस्वी रीतीनें करून दाखविलें आहे. तसेंच ग्वाल्हेर संस्थानांत हें होईल असा अंदाज आहे. या कामावर एखादा युरोपियन अधिकारी न नेमता महाराजांनीं ना० गोडबोले यांच्या सारख्या हुशार देशी इंजिनियराची त्या कामावर नेमणूक केली ही फार संतोषाची गोष्ट आहे. त्या संस्थानांत देशी गृहस्थांच्या कर्तृत्वशक्तीला उत्तेजन देण्यास मोठें क्षेत्र आहे. तेव्हां इतर मोठ्या कामीं सुद्धां देशी गृहस्थ नेमण्याची बुद्धि महाराजांस होवो व त्यांचें अनुकरण इतर संस्थानिकही करोत म्हणजे झालें.

## तुर्कस्थानकडील बातमी.

[illegible] अद्याप कायम [illegible] इंग्लंड विरुद्ध [illegible] [illegible] आहे. हिंदुस्थानांतील [illegible] तुर्कस्थानविषयीं [illegible] दाखविली नाहीं. [illegible] केली तरी आपण [illegible] राष्ट्र [illegible] कायम ठेव असें [illegible] [illegible] पणें मत दिलें आहे. एनवर पाशाला [illegible] गोष्टी लागत आहेत. पण या त्यांच्या गोष्टी ऐकून खुद्द [illegible] माईनच [illegible] हंसत आहेत! तुर्कस्थानचीं दोन मोठीं मोक्याचीं ठिकाणें म्हणजे [illegible] व [illegible] टाकलीं आहेत. यामुळें अर्थातच बगदाद कडून हिंदुस्थानांत येण्याला जर्मनीला आता मार्गच उरला नाहीं.

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः— ऊन कडक व थंडीही तेजस्वी असल्यामुळें आरोग्यसंपदा वाढत आहेत. रोगराई नाहीं.

नामदार रावबहादूर केशव गोविंद दामले हे Co-operation कमिशन पुढें साक्ष देण्यासाठीं जबलपुरास गेले होते.

काल रोजीं सायंकाळीं मेजर बी० फोअर सिव्हिल सर्जन यांच्या अध्यक्षते खालीं डाक्टर त्रिंबकराव भगवे यांनीं साथीचे रोग व रोग- प्रतिबंधक शक्ति या विषयावर श्रीराम नाटकगृहात व्याख्यान दिलें. हे सरकारी अंमलदार आपली वैद्यकीय विद्या इतकी लोकप्रिय करीत आहेत हें खास भूषणास्पद होय.

गेल्या मोहरमच्या सुटींत रायपूर येथें प्रांतिक सहकारी पतपेढ्यांची वार्षिक सभा भरली होती. ती फार यशस्वी झाली. तेथील व्यवस्था फार नामी होती आणि तेथून आलेल्या गृहस्थांच्या अंगात हें नवें वारें चांगलें संचरलें आहे, असें दिसतें.

रा. रघुनाथ बळवंत घारपुरे हे मुनसफ म्हणून या जिल्ह्यांतील लोकांचे परिचयाचे आहेत. त्यांस फार्म विकला नंतर सबार्डिनेट जजचा हुद्दा मिळून वर्धा येथें नेमिले हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. महमद हादी सबजज्ज हे आकोल्याहून हर्दा येथें बदलले होते. त्यांस आतां [illegible] संस्थानात डिस्ट्रिक्ट जज्जाची जागा मिळाली ही आनंदाची बातमी होय.

नामदार रा. रा. हरबर्ट स्पेन्स यांच्या जागीं रा. रा. मॉथाकिंग यांस कायदे-कौंसिलचे सभासद नेमण्यात आलें.

## प्रदर्शन

पिंपळगावदेवी तालुका मलकापूर जिल्हा बुलढाणा येथें होणारे जनावरांचे व शेतीच्या पदार्थांचें प्रदर्शन आणि वऱ्हाडी व परदेशी नांगरांची शर्यत

—:*.*.*:—

हें प्रदर्शन तारीख ४।१।१ [illegible] सन १९१४ पर्यंत सुरू ठेविलें जाईल. [illegible] दिलीं जातील [illegible] पण वगैरे [illegible] मानानें [illegible] केलीं जातील. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शेतकरी लोकांनीं आपापलीं उत्तम जनावरें आणावीं.

### बक्षिसांचा तपशील

#### जनावरांबद्दल

भाग १ बुलढाणा जिल्ह्यांतील किरसान लोक [illegible] देतात त्यांचेसाठीं.

| वर्णन | बक्षिस पहिलें रुपये | दुसरें रुपये | तिसरें रुपये |
|---|---|---|---|
| १ अवलाद घेण्याजोगा उत्तम [illegible] | १५ | १० | ८ |
| २ उत्तम [illegible] | १० | ६ | ५ |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षांच्या आतील उत्तम [illegible] | २ | ८ | ५ |
| ४ पीत नसलेला १ वर्षांच्या आतील उत्तम गोऱ्हा | १० | ८ | ५ |
| ५ सर्वांत जास्त दूध देणारी गाय | २० | १५ | ४ |
| ६ दुधाची बकरी | ५ | २ | २ |
| | ७० | ९२ | २८ |

भाग २ बुलढाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाला शंभर रुपयांपेक्षा जास्त शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें रुपये |
|---|---|
| १ अवलाद घेण्याजोगा उत्तम [illegible] | १५ |
| २ उत्तम बैलाची जोडी | १० |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षांचे आतील उत्तम कालवड | ८ |
| ४ पीत नसलेला १ वर्षांचे आंतील उत्तम गोऱ्हा | ८ |
| ५ सर्वांत जास्त दूध देणारी गाय | १५ |
| ६ दुधाची बकरी | ४ |
| | ६० |

धान्याचे नमुन्याबद्दल दोन्ही प्रकारचे किरसानी लोकांसाठीं.

| वर्णन | बक्षिसें पहिलें रुपये | दुसरें रुपये |
|---|---|---|
| उत्तम रोशींया कापूस | ५ | ३ |
| " जोंधळा ( ज्वारी ) | ५ | ३ |
| " गहू | ४ | २ |
| " हरबरा ( चणा ) | ४ | २ |
| " तिळ [ पांढरा ] | ३ | १ |
| " जवस [ पाळशी ] | ३ | १ |
| " तंबाखू | २ | १ |
| " मिरची | ३ | १ |
| | २९ | १४ |

प्रत्येक नमुना तीन शेरांपेक्षा कमी नसावा. नांगराचे शर्यतीसाठीं बक्षिसांची रकम ९० रुपये ठेविली आहे. एकूण बक्षिसांची रकम १०० रुपये आहे. बुलढाणा तारीख १० माहे नोव्हेंबर सन १९१४ ई.

Sd/ K. S. Jathar.

डेपुटी कमिशनर जि. बुलढाणा

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| सोनें | २६॥ |
| चांदी | ७०॥ |
| अळशी | ९१ |
| बाजरी | ७७–७८ |
| कापूस | २७ २७॥ |
| तांदळ | ६८= ६८= |
| गहूं | ३। ते ८ |
| ज्वारी | ९९ १२ |
| तूर | १० ते १०॥ |
| तेल | ७॥ ते ८ |
| साखर | [illegible] |


श्री गजानन

जाहीर खबर

विक्रीस तयार

[illegible] गवती चहा सर्वोत्तम [illegible] सुद्धा [illegible] जाणतात तो.

[illegible] पाठविण्याचा कोठा.

ज्यांची मर्जी देशी मिळती मगर या पैकीं एखादी घेण्याची इच्छा असेल त्यानें आम्हांस [illegible] करणार यांना कडेनु बोलणें करावें. अकोला तारीख ३।१२।१४

सही

देवराव विनायक

नो. नं. ४६७

जाहीरात

पाहिजे—न्यु इंडिया इन्शुरन्स ब्याकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि खानदेशसमर हुषार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल विशेष माहिती करितां खालील पत्त्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट

न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड

नो नं ४९०

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-

The National Indian Life Insurance Co. Ltd., 166, Hornby Road • Bombay

No. No.421

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सर्दी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेंवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचे प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥८

बी. एच जव्हेरीयन कंपनी.

लकारीचकला, मुंबई.

नो नं०१३७



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० देड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये १ देड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच दवा वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे ॲनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसलाही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खवुतरखाना भुलेश्वर मुंबई

नो० नं० १९



मांगालिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरितां

सेंटचा राजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यास ठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चवलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों लाखो फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी सुवासाचा भांडार आहे किं. रु. -॥ ॥ व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक खास दिलचमनची दर डझनास रु. ॥ "

सोल एजन्ट्स. एच, आर. मादी आणि कं

नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDS 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurance. |
|---|---|---|
| | | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17 657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| | 3136,421 | 1.41,32356 |
| 1903 | 4 ,07,009 | 2.10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possesing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*

CHIEF AGENT,

N. No. 13. *C. P. Berar & Khandesh, NagPur*



सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा

## डॉ. वामन गोपाळ यांचा आयोडाईज्ड सार्सापरिला

शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१|. टपालखर्च -|- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४||- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक— डा. गोतमराव केशव, आणि सन्स ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई, नंबर २.

नो० नं० १११


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख १४ माहे डिसेंबर सन १९१४ ई० [ अंक ४८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागुतें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजित ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती १ खालिस हाग ८= तो० सुंदर कामदार शाल २ व ३½+१½ गज १ ते १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ४६३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिन्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१½ तोळे असतें.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } J. G. Ridland. एजंट
नो० नं० ९

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९१९१०९ } J. G. Ridland. एजंट
नो. नं ४

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना

### ए. जे. ह्मात्रे आणि सन् गंधी.

ठिः—पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव ! ! एकच भाव ! !

अत्तरें सुरंगी आमचकडे मिळणारा माल ओहो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, केवडा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्कहिना, गुलहिना, रुअबक्षा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुमुर्ख, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अगरजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अगरजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उदर्ये दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ९ आ १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक काडेस, बिशिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान. पितळी शिंगे व करणे, चव्ह्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व बातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व बेजाचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिन्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ४१३

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २९


## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.


बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं

### शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १०८·

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

## डायरी बक्षास ! !

(१)खडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ०६. (२)खडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ०६. (३) धर्मपद, किंमत ०४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ०९. ५ विदग्धवाङ्मय, किंमत ०३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ०२. (७) मुलांस थोडा उपदेश, किंमत ०८. (८) वाल्मीकीचा जय, किंमत ०८. (९) अण्णा किर्लोस्करकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्यकीं ०१२. (१०) शिवलीलामृत किंमत ०८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बाइंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बाय डिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.
नो. नं. ४५४

श्रीगजानन

### जाहीर खबर

### विक्रीस तयार

अकोलें येथील सीव्हील स्टेशनांतील गवती बंगला सभोंतालच्या विस्तीर्ण बगीच्यासुद्धां ज्यास खराचा जुना गवती बंगला ह्मणतात तो.

बयर्मनीच्या जवळील धान्य साठविण्याचा कोठा.

ज्याची मर्जी दोन्ही मिळकती अगर या पैकीं एखादी घेण्याची इच्छा असेल त्यानें खाली सही करणार यांज कडे बोलणें करावें. अकोले तारीख ३।१२।१४

सही
देवराव विनायक
नो. नं. ४६७

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रेय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, । १०० प्रेपरनाईट नोटपेपर्स व त्यांच्या बेताचीं पाकोटें १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही. पी. ०१०१




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकचूर्ण किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमेंट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च ' दिलखुष ' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १। रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाक हात महीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे, नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

## जाहीरात

—न्यु इंडिया इन्शुरन्स क्योंकिंग काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि [illegible]मर हुषार एजंट पाहिजेत. पगार कमीशन भरपूर दिलें जाईल माहिती करितां खालील पत्यावर करावें.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड

नों नं ४६०

---

ANTED smart and energetic to work as agents in every town ery lucrative terms. Apply to:-

The National Indian Life Insurance Co. Ltd., 166, Hornby Road - Bombay

No. No.421


---

## नोटीस

[illegible]स बेशमी पुंजाजी वा॥ कखु भोई [illegible]णार शहर आकोला ताजनापेठ ता. व आकोला यांसः— खालीं सही करणार कडून नोटीस देण्यांत येते कीं, मी [illegible]ची लग्नाची बायको असून तुम्ही मजला [illegible] बापाचे घरीं बाळंतपणा करितां नेले [illegible] तेव्हापासून तुम्ही मला नेण्यास [illegible]ले नाहीं. त्यांस आज सुमारें ६ वर्षे [illegible]लीं. मध्यंतरी तुम्ही माझे मावशीचे येथून [illegible]णजे पंचगव्हाण येथून माझे अंगावरील [illegible] येथील चांदीचे डागीने तुम्ही थापीने [illegible]ढून नेले. व मजला सांगितले कीं एक [illegible]दिन्याली तुला घेऊंन जाईन त्यास आज [illegible] वर्षे झालीं. अर्पणकाहीं मला न्यास [illegible]ले नाहीं. [illegible] दररोज माझे बापाचें गावीं तावकारीचें [illegible] काढून उदर निर्वाह करीत आहे [illegible] मला दरवर्षी ५० पन्नास रुपये प्रमाणें ६ वर्षाचे कर्ज ३०० तीनशे रुपये मी आज पर्यंत खाल्लें आहे. आतां मजला कर्ज कोणी देत नाहीं. सबब नोटीशीनें कळवितो कीं, आजपर्यंत माझेवर झालेलें कर्ज आठ दिवसात देऊन मला आपले घरीं घेऊन जाणें. मी नांदण्यास तयार आहे. तसें न केल्यास ही नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा माझेवर नवरे पणाचा हक्क राहणार नाहीं. कळावें ता. ५।१२।१४ ई.

सही

सारजी मर्द पुंजाजी भोई नि. आंगठा असे.

नो. नं.४७१

---

## नोटीस

हरी वा॥ विठोबा सोनार व शंकरसींग वा॥ सरदारसींग रजुत व पांडुरंग वा॥ नारायण ब्राह्मण सर्वत्र रा० [illegible] व ता० बाळापुर जी० अकोला

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं, तुम्ही त्रिवर्गांनें संगनत करून

माझा धाकटा मुलगा बाळकृष्ण वो॥ भवानी सोनार यास फंद देऊन नंतर एकनी त्याजपासून तीन हजार रुपयाचा व दोन हजार रुपयाचा रुपये न देतां बनावटी दोन प्रॉमेसरी नोटा थाप देऊन लिहून घतल्या व नंतर दोघांनें त्याजपासून रुपये न देतां बनावटी प्रॉमेसरीच्या नोटा दोन च्यार हजार रुपयाच्या थाप देऊन लिहून घेतल्या त्याप्रमाणें स्वतः माझे मिळकतीचीं शेतें व घरें व बाजारातील दुकान रुपये न देतां बनावटी गहाण खत करून घेतलें. नंतर तिनिनें त्याजपासून त्रिकीट रुजु वहीवर रुपये न देतां दोनशे दहा रुपयाचा बनावटी लेख केला. ही सर्व व्यवस्था मला न कळत बुडविण्या करितां धोक्यानें केली. जर वरील त्रिवर्गानें कोणतेही प्रकारचा बनावटी दावा आणल्यास माझी जिनगी व मी जबाबदार नाहीं कळावें ता० २।१२।१९१४ इ०

सही

१ भवानसा वा॥ लक्षमणसा सोनार द. खु.

नो नं. ४६९

---

## नोटीस

सखाराम व बाळकृष्ण वा॥ भवानी सोनार रा० पातुरशेखबाबु ता० बाळापुर जी० अकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी उभयतांस मुखत्यार पत्र दिले होतें तर तुम्ही उभयतांनीं वर्तणूक बरोबर केली नाहीं करीतां मी थोडें दिवसानीं लेखी पत्रानें उभयतांचें मुकत्यार पत्र रद्द केलें व तोंडीं ही पुष्कळ वेळां सांगितले व तारीख ९।१० १९१४ इसवीचे व या नोटीशीनें उभयतांचे मुकत्यार पत्र रद्द केलें. कळावें. तारीख २।१२।१४ इ०

सही

भवानसा लक्ष्मणसा सोनार द० खु०

नो० नं० ४७०

---

## नोटीस

रा० आनंदा व गणपत वा॥ तुकाराम कासार उभयता रा० जानेफळ ता० मेहकर जि० बुलढाणा

यासः—,

मी खालीं सही करणार कळवितों कीं तुमची नोटीस पावली. तुम्हीं नोटीसीचा जबाब योग्य रीतीनें न देतां आह्मांस कबूल नाहीं. आह्मी पूर्वी नोटीसींत ज्या वरासी मुलगी देणे कबूल केले असे त्या वरापेक्षां दुसरा वर आमचे लक्षांत येऊ शकत नाहीं आह्मी ज्या वरासी नेम केला आहे तो नतुर आपले पैसे कम घेऊन [illegible] इच्छीत नाहीं कारण तुम्ही आपली स्वतःचे मुलीचे अंगावरील डागीनें काढून घेऊन मोडून टाकले तरी त्या बाबतींत आपले बद्दल मंगरुळ मुक्कामीं लग्न प्रसंगी पंचाईत झाली होती तरी आपली अशी वर्तणूक व स्थिती गैर चांलीची असल्या मुळें हे सर्व जातीपातींत वगैरे सर्वांस आपली चालचलणूक माहितच आहे. दुसरे आह्मी मुलीचे इस्टेटी बद्दल आपणास दोन चार वेळा विचारणा केली तरी आपण आजपर्यंत काहीं आपणाकडून इस्टेट देण्यांत आली नाहीं. तरी मुलीचे इस्टेट आपण पंधरा दिवसाचे आंत पंचा समक्ष दिल्यास बरें पडेल न दिल्यास आपलेवर योग्य रीतीनें कोर्ट मार्फत तजवीज केल्या जाईल कळावें ता० २।१२।१९१४ इ०

सही

गंगु मर्द मुरारी कासार रा० ईसोली ता० चिखली जि० बुलढाणा पोष्ट अमडापूर. नि० हातचा आंगठा असे

नो. नं. ४७२

---

## नोटिसीचे उत्तर

१ मनसाराम वा॥ रामसींग २ पुंजी मर्द गोंड्या ३ किसन वा॥ रामसींग ४ तानी मर्द मनसाराम ५ राजसी मर्द किसन सर्व जात टाकोनकार रा० पो० राजंदा ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडुन नोटिसीचे उत्तर देण्यात येतें कीं तूं मजला वऱ्हाड समाचार वर्तमान पत्रातून तारीख ३०।११।१९१४ इ० यांत नोटीस नं० ४६१ ची तारीख २०।११।१९१४ चीदिली ती अक्षरशहा खोटी आहे. याचे कारण माझे घरुन तुजला यंदाचे गेल्या दीपवाळीला तुझा भाऊ नामे मनसाराम हा आला व सणासाठीं ह्मणून चार दिवसाचा करार करुन घेऊन गेला. दिपवाळी झाल्यावर मी स्वतः तुजला घेण्यासाठीं आलो असता तुझे भावानें सांगितले कीं आणखी ८ दिवसानीं पठवूं पुढें मी पुन्हा आठ दिवसा नंतर संपत आणि हरसींग यांस पाठविले असतां तुझे भावानें साफ पाठवित नाहीं ह्मणून जबाब दिला. पुन्हा तिसऱ्यानें आणण्यास पाठविले असतां तू लपून राहिली इतकेंच नाहीं तर तुझे भावानें आमचे वरावर डाका आणिला आहे अशी धमकी दिली आणि मी फौजदारींत फीर्याद करितो ह्मणून सांगितले या मुळें आह्मी लाचार होऊन घरीं आलो आणि आह्मी गरीबीमुळें स्वस्त बसलो असता तुह्मी ही खोटी नोटीस दिली. दुसरें मजला रक्तपितीचा आजार माझे वयाचे आठवे वर्षापासून असून तुझेशीं लग्न लावण्याचे वेळीं मजला हा आजार होता ह्मणून तुझे बापानें मजपासून २०० रुपये घेऊन माझेशीं लग्न लाऊन दिले. तर आतां तुजला माझे रक्तपितीची सबब बिलकुल दाखवितां येत नाहीं. शिवाय नवरा मजला रक्तपित्तो असली तरी मी नवरा असतां कायद्यानें तुजला फारकती मागता येत नाहीं व माझी फारकती तुजला मिळाल्याशिवाय दुसरा नवरा कायद्यानें करतां येत नाहीं केल्यास तुह्मी फौजदारीस पात्र व्हाल.

तुझें लग्न झाल्यापासून तूं माझे घरींच असल्यामुळें तुजला खावटी वगैरे काहीं देण्याची नाहीं. तूं खावटीची रक्कम मागितलेली अगदी खोटी आहे.

तूं ही नोटीस पावल्यापासून तीन दिवसाचे आंत माझे घरीं यावें ही नोटीस दिली सही.

मु० आकोला ५।१२।१९१४

सही

१ गोंड्या वा॥ रायसींग टाकोणकार नि० खु० हातची

नो. नं. ४७३

---

## जाहीर खबर

खालीं सही करणाराकडून सर्वत्र सेट सावकार व्यापारी वगैरे जमीनदार तमाम लोकांस कळविण्यात येते कीं, माझे आईचा बाप हिरापांडे बीन कालुपांडे जळगावीं राहत असता त्याजपाशीं वडीलार्जीत स्थावर जंगम इस्टेट व एक मुलगा मोतीपांडे असे असता ते उभयता मरणपावल्यावर हिरापांडे यांची स्त्री जमनाबाई व मोतीपांडे यांची स्त्री भगीयाबाई अशा दोन्ही विधवा स्त्रीया जीवंत आहेत. ते असलेले स्थावर मिळकतीचे उत्पन्न त्याना पाहिजे त्यापेक्षा जास्त असून त्याचा उपयोग उपजीविकेशिवाय करून स्थावर मिळकत गहाण वगैरे टाकून विक्री करण्याचे तयारीत आहेत. ह्या मिळकतीसंबंधानें जमनाबाई व भगीयाबाई ह्या हयातीपावेतों उपभोग फक्त घेण्याच्या अधीकारी आहेत दुसऱ्या कोणत्याही रीतीनें त्यांनीं गहाण देण्याचा किंवा विक्री करण्याचा हक्क नाहीं. सबब सर्वत्रास जाहिर करण्यांत येते कीं ह्या विधवा उभयता स्त्रीयापासून त्याजपाशी असलेले मौजे निंभोरा बु॥ ता॥ जळगाव येथील वानी नावचे सव्वीस अजमासे एकराचे शेत व राहाते घर आणि समोरची जागा हे आहे हे कोणी गहाण किंवा खरीदी विक्री करून घेऊन पैसे देऊं नये. जो पैसे देईल त्यास पाहिजे त्या किंमतीस विकणार आहेत व पैसे मिळाल्यास गहाण देणार आहेत. पैसे त्यास पाहिजे कोणीही दिल्यास त्यापासून पैसे घेऊन त्यास लेख करून देतील करितां कोणी या उभयता विधवा स्त्रीयास त्या मिळकतीवर कोणीही पैसे देऊं नये जे दिले असतील ते व पुढें जो कोणी देईल ते सर्व बुडतील व पैसे देणारा विनाकारण नुकसान पावेल व या मिळकती संबंधानें हिरापांडे मोतीपांडे यांचा लेख आमच्या जवळ आहे सबब कोणी फसूं नये ह्मणून सर्वत्रास जाहिर करण्यांत आलें आहे ता. १८।११।१९१४

सही

व्याहारीलाल वेंकटलाल तिवारी जळगांव द० खु

नो. नं. ४७४

## प्रदर्शन.

पिंपळगांवदेवी तालुका मलकापूर जिल्हा बुलडाणा येथें होणारे जनावराचे व शेतीच्या पदार्थांचें प्रदर्शन आणि वऱ्हाडी व परदेशी नांगराची शर्यत

—:*:*:—

हें प्रदर्शन तारीख ४।५।६ जानेवारी सन १९१४ पर्यंत खुलें ठेविलें जाईल. त्यांत खालीं दिलेप्रमाणें बक्षिसें दिलीं जातील परंतु वर्गणी जशी जमेल त्या मानानें तीं ज्यास्त केली जातील. बुलडाणा जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शेतकरी लोकांनीं आपापलीं उत्तम जनावरें आणावीत.

### बक्षिसाचा तपशील

#### जनावरांबद्दल

भाग १ बुलडाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापर्यंत शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें पाहिलें रुपये | दुसरें रुपये | तिसरें रुपये |
|---|---|---|---|
| १ अवलाद घेण्यायोग्य उत्तम गोऱ्हे | १५ | १२ | ८ |
| २ उत्तम बैलाची जोडी | १० | ६ | ५ |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | १० | ८ | ५ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आतील उत्तम गोऱ्हा | १० | ८ | ५ |
| ५ सर्वांत ज्यास्त दूध देणारी गाय | २० | १५ | ४ |
| ६ दुधाची बकरी | ५ | ३ | १ |
| | ७० | ५२ | २८ |

भाग २ बुलडाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापेक्षां ज्यास्त शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें रुपये |
|---|---|
| १ अवलाद घेण्यायोग्य उत्तम गोऱ्हे | १५ |
| २ उत्तम बैलाची जोडी | १० |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | ८ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आंतील उत्तम गोऱ्हा | ८ |
| ५ सर्वांत जास्त दूध देणारी गाय | १५ |
| ६ दुधाची बकरी | ४ |
| | ६० |

धान्याचे नमुन्याबद्दल दोन्ही प्रकारचे किरसानी लोकासाठीं.

| वर्णन | बक्षिसें पाहिलें रुपये | दुसरें रुपये |
|---|---|---|
| उत्तम रोझीया कापूस | ५ | ३ |
| " जोंधळा (ज्वारी) | ५ | ३ |
| " गहू | ४ | २ |
| " हरबरा (चणा) | ४ | २ |
| " तिळ [गाडरा] | २ | १ |
| " जवस [आळशी] | २ | १ |
| " तंबाखु | २ | १ |
| " मिरची | २ | १ |
| | २६ | १४ |

प्रत्येक नमुना तीन शेरापेक्षां कमी नसावा. नांगराचे शर्यतीसाठीं बक्षिसांची रकम ५० रुपये ठेविली आहे. एकूण बक्षिसांची रकम ३०० रुपये आहे. बुलडाणा तारीख १९ माहे नोव्हेंबर सन १९१४ इ.

Sd/ K. S. Jathar.
डेपुटी कमिशनर जि. बुलडाणा

---

## तरुण विद्यार्थ्यांनीं पुढें काय करावं ?

हल्लीं येथें चालू असलेल्या व्याख्यान मालेंत नामदार अण्णासाहेब जोशी यांचे वरील विषयावर ता० ८।१२।१४ रोजीं भाषण झालें. त्याचा सारांश खालीं दिला आहे.

"१ जाहीर भाषणासंबंधानें असा एक स्थूल नियम आहे कीं व्याख्यानकारास एकाद्या विषयासंबंधानें लोकामध्यें कांहीं तरी नवीन प्रेरणा किंवा भावना उत्पन्न करण्याची उत्कट इच्छा असून तसें करण्यास त्यास येपतेहि असावी लागते. माझी स्थिती आज तशी नाहीं. ज्या गोष्टी मी आज सांगणार आहे त्या मी न सांगितल्या तर लोकांचें लक्ष्य त्याजकडे लागणार नाहीं असें नाहीं. किंबहुना पुष्कळ लोकांचें लक्ष बिकट परिस्थितीमुळें ह्या पूर्वींच त्या गोष्टीकडे वेधलें आहे. परंतु ह्या प्रश्नाचा ज्या लोकांनीं जितका विचार करावयास पाहिजे त्यांनीं तितका केलेला नाहीं ह्मणून त्यांनीं ह्याची पूर्ण चर्चा करून कांहीं तरी मार्ग काढावा ह्या हेतूनें मी आज हा विषय घेतला आहे. राजकीय गोष्टींसंबंधानें आज पंचवीस वर्षें चळवळ सुरू आहे परंतु अजून आपण कोणत्या मार्गानें आपले योग्य हक्क मिळवूं शकू हें निश्चित झालें नाहीं. कालांतरानें राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांत दोन पक्ष झाले व अजूनपर्यंत दोघांस संमत असा मार्ग सांपडला नाहीं. ह्या विषयाची स्थिति तशीच आहे. ज्याला गरज पडेल तो वेळेवर सुचेल त्याप्रमाणें वागतो पण ह्या पेक्षां ऐनवेळ येऊन ठेपण्याचे अगोदर पूर्ण विचार करून मार्ग निश्चित करून ठेवणें जास्त इष्ट आहे.

२ सामान्य तरुणांचा वर्ग शिक्षण संपादन करून पोटापाण्याच्या उद्योगास लागतो. अर्थात असे कांहीं श्रीमंत लोक आहेत कीं जे विद्येकरितांच विद्या संपादन करतात पण असे लोक हिंदुस्थानांत काय किंवा विलायतेंत काय थोडेच असणार. ते श्रीमंत असलेकारणानें पोटापाण्याचा प्रश्न त्यांना नाहीं. परंतु जे लोक बुद्धिमत्तेवरच आपली उपजीविका करतात जे आपल्या बुद्धीच्या जोरावरच जिवंत राहूं शकतात अशा पांढरपेशासंबंधानें उ. ब्राह्मण, प्रभू, शेणवी किंवा बंगाल्यांत कायस्थ, खत्री इत्यादीं लोकांसंबंधानेंच आपणांस विचार कर्तव्य आहे.

३ ह्या प्रश्नाचें महत्व प्रत्येक मुलाचे बापास आहे. प्रत्येक मनुष्यास आपले पोट कसें भरेल व नंतर आपल्या मुलाबाळांचे कसे भरेल ह्याविषयीं नेहमीं विवंचना असतेच, आपला मुलगा मोठा झाला ह्मणजे त्यानें काय उद्योग करावा हा प्रश्न प्रत्येकास सोडवावा लागतोच परंतु ह्या गोष्टीचा ज्या मानानें विचार करावयास पाहिजे त्या मानानें विचार करण्यास सवड व ऐपत फारच थोड्या लोकांस असते व शिवाय आपल्या लोकांचे अंगीं एकाद्या गोष्टीचा आधींच पूर्णपणें विचार करून नंतर तदनुरूप वर्तन ठेवण्याची संवयच नाहीं त्यामुळें आपला सर्व व्यवहार परिस्थितिच्या ओघांत सांपडून त्यानेंच बद्ध होतो (ज्यास इंग्रजींत Policy of draft ह्मणतात ह्मणजे आपोआप जे होईल तें होईल ह्या तत्वावर चालतो.) ह्याचा परिणाम कसा होतो तो पहा. मुलगा Matriculation मॅट्रिक होईपर्यंत त्यानें पुढें काय उद्योग करावा ह्याविषयीं मुळींच विचार होत नाहीं. पुढें शास्त्रीय विषयाचा विशेष अभ्यास करावयाचा नसल्यास तो इंटरमिडिएट होऊन बी. ए. हा आपला जरूर व्हावयाचाच. बी. ए. झाल्यावर गरीब असल्यास कोठे तरी मास्तरकी अगर रेव्हिन्यू खात्यांत नोकरी धरितो व श्रीमंत असल्यास एल. एल. बी ची परिक्षा ठेवलेली आहेच. हा आपला सध्या शिरस्ताच पडून गेला आहे. हें कोडें उलगडावें कसें ? इतकें शिक्षण संपादन केल्यावर आपल्या तरुण पिढीस निर्वाहाचीं साधनें योग्य दर्जाचीं मिळवितां येतात किंवा नाहीं ह्यासंबंधानें योग्य विचार होत नाहीं. कदाचित् एकादा मनुष्य विचार करीत असेल पण सामान्यपणें सर्व लोक ह्या गोष्टीचा विचार करीतच नाहींत असें ह्मणावें लागतें. कां कीं, ज्यावेळेस वरील मार्ग ठरले गेले तेव्हांपेक्षा अतां परिस्थिती अगदीं बदललेली आहे. सुशिक्षित वर्ग एकसारखा वाढत चालला आहे. ह्या वाढीच्या मानानें ज्या धंद्यांत हे लोक पडतात त्या धंद्यांतील माणसांची समाजास जरूर असणारी संख्या वाढत नाहीं ह्यामुळें वरील सर्व धंद्यात अतिशय गर्दी झालेली दिसून येते. सुमारें ३० वर्षांपूर्वीं अशी स्थिती होती कीं हे सर्व धंदे अगदीं खुले होते त्यामुळे सुशिक्षित तरुणास उदरनिर्वाहाची बिलकूल फिकीर पडत नसे. त्याचप्रमाणें सरकारासही इंग्रजी शिकलेल्या नोकरांची जरूर असलेमुळें सरकारी नोकरींतही इभ्रत अब्रू वगैरे संभाळून शिवाय चांगल्या पगाराच्या जागाही मिळू शकत. परंतु आतां तो मनु बदलला. सर्व धंद्यांत गर्दी झाली. सरकारची सर्व ऑफिसें भरल्यामुळें नवीन लोकास नोकरी मिळणें दुरापास्त झालें. उघडच आहे सरकार झालें ह्मणून काय त्याजपाशी नोकरीचे गांठोडे थोडेच आहे कीं जो येईल त्यास नोकरी द्यावी !!! शिवाय हल्लीं युद्ध सुरू झाल्यापासूनची ३।४ महिन्यातली परिस्थिती सोडून दिली तर त्यापूर्वीं कांहीं काळ चित्तपावन ब्राह्मणास केवळ चित्तपावन ब्राह्मण येवढ्याच सबबीवर नोकरी देण्याचे नाकारीत हर एकंदर विचार करितां अशी स्थिति आढळून येते कीं जे धंदे सावलींत बसून करण्यासारखे आहेत आणि ह्मणूनच जे करण्यास आमचे तरुण तयार आहे त्या धंद्यांत तर अतिशय गर्दी झालेली व सरकारी नोकरी मिळणें दुर्घट मग आमच्या तरुणांनीं करावें काय ? हा प्रश्न आजच उपस्थित झाला आहे असें नाहीं. सुशिक्षित धंद्यांत गर्दी झाल्यामुळें इतर उपजिविकेचा मार्ग शोधून काढण्याची जरूर आपल्या तरुणास ह्यापूर्वींच भासली व गरजेमुळे मकॅनिकल इंजिनीअर इलेक्ट्रिकल इंजिनीअर रंगकाम इत्यादींचेहि आपल्या तरुणांनीं शिक्षण संपादन केलें आहे परंतु त्याहि बाजू हल्लीं खुंटल्या कारण तेथेंही गर्दी झाली. आतां ह्यापुढें कांहीं मार्ग आहे कीं नाहीं?

जरा शांतपणानें विचार केल्यास आढळून येईल कीं तरुण लोकांना हताश होण्याचें कारण ह्मणजे त्यांनीं आपल्या दृष्टीपुढें ठेविलेलें अत्यंत आकुंचित क्षेत्र. ज्याना learned preferious ह्मणतात ह्मणजे शिक्षण संपादून जे सावलींत बसून करता येतात तेवढच धंदे आपणास करण्यासारखे आहेत अशी जी आपल्या तरुण सुशिक्षितांची वृत्तीच बनून गेली त्यमुळें त्याना कांहीं मार्ग मोकळा नाहीं असें वाटतें. आपल्या विवक्षित राजकीय परिस्थितीमुळें आपणापुढें अनेक अडचणी आहेत हें खरें. आपल्या तरुणास आय. सी एस किंवा आय्. एम्. एस, जंगलखात्यातील नोकऱ्या इत्यादि मोठ्या हुद्याच्या जागा मिळणें हें अगदीं जरूर आहे पण त्या मिळत नाहींत हें उघड आहे ही राजकीय परिस्थितीची अडचण आपण बाजूस ठेऊं या. आणि असा विचार करूं कीं ह्याच राजकीय परिस्थितींत अशिक्षित लोक धंदे करून पोट भरतात कीं नाहीं? सुशिक्षित ह्याचा अर्थ आपण साधारण मॅट्रिकपर्यंत किंवा त्याचे पुढें शिकलेला असा घेऊ. ढोबळ मानानें पाहता अशा सुशिक्षितांची संख्या शेंकडा दोन येईल. अर्थात बाकीचे ९८ लोक इतर धंदे करून आपापलीं पोटें भरीत आहेत. बरें ह्या इतर धंद्यात प्राप्तीचें मान कमी आहे ह्मणावें तर तसेंही दिसून येत नाहीं. उदाहरणार्थ सरकारी नोकरी वकीली डाक्टरी इत्यादि सुशिक्षित लोकांनीं आपल्याशा मानलेल्या धंद्यात २०००।५००० रुपये दरमहा मिळविणारे लोक अत्यंत विरळा बाकी ब्यांची प्राप्ती २० रु.पासून ५०० पर्यंतच असते तेव्हां या सुशिक्षित धंद्यात शिरणारा प्रत्येक मनुष्य चांगल्या स्थितींत असतो असें नाहीं.

मुंबईंत क्रॉफर्ड मार्केटातील फळवाल्याकडे पहा. ह्या सर्वांची प्राप्ति चांगली आहे असेच अनेक धंदे आहेत उ. कोळसे विकणें लाकडें विकणें धान्य विकणें इत्यादि. आपण एक उमरावतीचें उदाहरण घेऊं तेथिल लोकसंख्या ३८००० आहे. ह्या पैकीं शेंकडा २ लोक सुशिक्षित धंद्यातले व बाकीचे इतर धंद्यांतले ह्या प्रमाणानें पहातां फक्त ७००।८०० माणसें कायती वकील, डॉक्टर, इंजिनिअर सरकारी अगर अन्य नोकर असून इतर सर्व लोक स्वतंत्र धंद्यावर आपली उपजीविका करितात.

वरील शेंकडा ९८ लोकांना निर्वाहाचीं साधनें शोधण्यास इतकी पंचाईत पडत नाहीं आणि ह्याचें कारण हेंच कीं त्यांना पाहिजेल त्या धंद्यांत शिरतां येतें. सुशिक्षितांना मात्र कांहीं एक विशिष्ट धंदेच मोकळे इतर धंद्यांत जाण्याची कल्पना सुद्धां त्यांचे मनास शिवणार नाहीं. कारण इतर धंदे करणें त्यांस हलकेपणाचे वाटते अशी मनाची भ्रामक कल्पना पक्की झाल्यामुळें सर्व सुशिक्षित कांहीं मोजक्या धंद्यांतच शिरतात.

आणि त्यांत अतीशय गर्दी होते. माझें मुख्य सांगणें असें आहे कीं ही मनाची भावना आतां सुशिक्षित तरुणांनीं सोडून दिली पाहिजे. अशिक्षित लोक जे धंदे करितात त्यांत जर आपण पडलों तर आपल्या शिक्षणाच्या योगानें ते धंदे आपण जास्त चांगले करूं शकूं व किफायतही जास्त मिळवूं शकू. आतां ही गोष्ट खरी कीं धंदा करण्यांत अनेक प्रकारच्या अडच-णी आहेत.

पहिली अडचण कोणता धंदा करावा हें निवडण्याची. मुलाची योग्यता कोणत्या प्रकारची आहे कोणतें काम त्यास झेंपेल हें समजण्याला कांहीं मार्ग नाहीं. दुसरी अडचण अशी आहे कीं अमुक एक धंद्यांत शिरावयाचें असें जरी एकाद्यानें ठरविलें तरी तो धंदा करण्यास जरूर असणारें शिक्षण देणाऱ्या संस्था आपल्या इकडे नाहींत. तिसरी अडचण भांडवलाची. ह्यां तिन्ही अडचणी ओलांडून पलीकडे जाणें हें कांहीं सोपें आहे असें नाहीं परंतु त्याला ना इलाज आहे जेव्हां एकादा नवा मार्ग शोधून काढावयाचा असतो तेव्हां अडचणी ह्या उत्पन्न होणारच व त्याशीं झगडल्यावरच यशः प्राप्ति होते. असें करण्यांत कदाचित पुष्कळ माणसांचा चुरा होऊन जाईल परंतु त्यामुळें एकदा मार्ग मोकळे झाले ह्मणजे सुशिक्षित तरुणापुढचें कायमचे संकट नाहींसें होईल.

शिवाय बारीक विचार केला असतां आपणांस असें दिसून येईल कीं ह्या अड-चणीहि कांहीं सकृद्दर्शनीं वाटतात इतक्या दुस्तर नाहींत. पुढें मामलेदारी मिळेल एवढ्या आशेवर जर १९ रुपये पगाराची जागा पत्करणें गैरसोईचे वाटत नाहीं तर समजा एकाद्या कापडाच्या दुकानावर ८।१० रुपये पगारावर एकादा इसम राहिल्यास १०।१२ वर्षांत त्यास त्या धंद्याचें ज्ञान प्राप्त होऊन त्याच्या शिक्षणाच्या मानानें त्यास इतक्या वर्षांत नोकरींत जो पगार मिळतां तितकी प्राप्ति खास होऊं लागेल. इतक्या वेळांत त्यास थोडेंसें स्वतःचे भां-डवलहि उभारतां येईल. शिवाय ज्या दुकानावर तो काम करीत असेल त्या मालकास आतां हा पक्का शिकलेला मनुष्य निराळें दुकान घालून आपणाशीं स्पर्धा करील असें वाटून तो त्याचा पगारहि वाढवील. ह्या ठिकाणीं एक उदाहरण सांगितल्याशिवाय माझ्यानें राहावत नाहीं. बडनेरा स्टेशनवर एक सिग्नलर होता त्यानें १९०० रुपये खर्च करून एक धान्य दळण्याची चक्की काढली त्यास रोज ९–७ रुपये मिळतात. आतां कल्पना करा कीं आमचे सुशिक्षित तरुण जे नोकरीचे मार्गे लागतात त्यास त्यांना जास्त फायदा होतो कीं असे धंदे काढल्यास जास्त फायदा होईल? असें होण्यास धंदे ह्मणजे हलकट काम आहे त्यांत गौणत्व आहे अशी जी आपल्या मनाची भावना झाली आहे ती नाहींशी केली पाहिजे. ह्या संबंधी मला मुंबईच्या एका व्यापाऱ्यानें मोठे मजेदार उदाहरण सांगितलें. त्याची मुंबईस एक माल पाठविण्याची व विकण्याची पेढी आहे. त्यानें असा निश्चय केला कीं जो कोणीहि बी. ए. येईल त्याला तीस रुपये पगारावर ठेवून आपला धंदा शिकवावयाचा. मी त्यास विचारलें कीं आतां पर्यंत असे किती लोक तयार झाले? त्यानें उत्तर दिलें कीं अर्धाहि नाहीं. आणि, कारण काय तर त्यानें पहिला जो बी. ए. मनुष्य कामावर ठेविला त्यास एकदां दुकानांतून कांहीं माल गिऱ्हाइकांस दाखविण्यास सांगितलें. पण हें काम त्या सुशिक्षित तरुणास कमीपणाचें वाटलें व तो लवकरच नोकरी सोडून गेला. तर ही जी आपल्या मनाची भावना झालेली आहे ती आपण दुर केली पाहिजे. त्यामुळें आपण आपलें क्षेत्र कीं जे राजकीय परिस्थितीमुळे कांहीं अंशीं संकुचित झालें आहे तें आपण आपल्या मोठेपणाच्या खोट्या कल्पनेनें फारच संकुचित करून आपल्याच पायावर धोंडा पाडून घेत आहोंत. राज-कीय परिस्थिती ही बहुतांशी दुसऱ्यावर अवलंबून आहे ती बदलण्याविषयीं आपण प्रयत्न करीत आहोंतच पण ही आपल्याच मनाची समजूत जिचा प्रतिकार करणें केवळ आपल्याच हातांत आहे ती मात्र नाहींशी करण्याची खटपट आपल्याकडून होत नाहीं.

शेवटीं मला इतकेंच सांगावयाचें कीं जे श्रीमान आहेत व जे परदेशांत जाऊन नवीन उद्योगधंदे शिकून ते आपल्या देशांत सुरू करण्यास समर्थ असतील अशा बद्दल मी बोललों नसून सामान्य ऐपतीच्या व सामान्य दर्जाच्या तरुण सुशिक्षितांसच माझे विचार लागू आहेत व हें जें माझें ह्मणणें आहे त्याची नीट चर्चा व्हावी त्या हेतुनेंच तें मी आज आपणापुढें मांडलें आहे.

ह्यासंबंधीं कोणास कांहीं विशेष माहिती पाहिजे असल्यास ती मी कोणासही केव्हांही कळविण्यास तयार आहे.

---

# वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष वद्य १२ शके १८३६

## स्वार्थ आणि परमार्थ.

सध्यां जर्मन व आस्ट्रियन लोकांशीं समरांगणावरच युद्ध चालले आहे असें नाहीं, तर बाजारांत ही हें युद्ध चालविण्याचा ब्रिटिश सरकारचा पूर्ण निश्चय आहे. जर्मनी व आस्ट्रिया या देशांतून येणारा माल बंद करून त्या मार्गी ब्रिटिश माल खप-विण्यासाठीं सरकारकडून आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. अशावेळीं हिंदी कारखानदारांनी स्वस्थ न बसतां स्वदेशी चळवळ जोरानें चालूं करावी व हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याची भरभराट करण्याची अमूल्य संधी साधावी असेंही सांगण्यांत येत आहे. अठराव्या किंवा एकोणिसाव्या शतकांत ब्रिटिश सर-कारनें देशी उद्योगधंदे बुडविण्यासाठीं कसे भगीरथ प्रयत्न केले व देशी उद्योग रसा-तळीं नेऊन पोंचविले वगैरे मागच्या कथा उकरून काढण्याची ही वेळ नव्हे, तसे प्रयत्न आतां होत आहेत कीं काय हें पाहिलें पाहिजे, व होत असल्यास त्यांचा प्रतिकार सरकारकडून करवून घेतला पाहिजे. असा प्रयत्न ह्मणजे कापडाच्या संबंधांत एक्साइज जकात हा दिसतो. ही जकात बंद करण्याविषयीं सूचना नागपूरचे ना. मि. दादाभाई यांनीं कौंसिलपुढें आणिली होती, पण ती माघारी घ्यावी लागली होती. सध्याची अनुकूळ परिस्थितिपाहून मुंबईच्यां इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनें ती पुनः पुढें आणिली आहे, आणि स्वदेशी धंद्यांचा उत्कर्ष चिंतिणारें आमचें सरकार तिचा सध्याचे काळीं कसा काय निकाल लावतें तें पाहणें आहे. पण कापडाचा उद्योग येवढाच कांहीं एक उद्योग उर्जित दशेला आणण्यासारखा आहे असें नाहीं. कात कमावणें, कांच, कागद, धातूची तार काढणें, मेणबत्त्या, आगपेट्या, पेन-सिली, वारानिशें, साबण वगैरे इतर पुष्कळ उद्योग हातीं घेण्यासारखे आहेत. हे उद्योग कोणी हातीं धरील तर त्यांना मदत करण्यास आपण तयार आहों असेंही सर-कारी अधिकाऱ्यांकडून सांगण्यांत येतें. या उद्योगांच्या संबंधाची माहिती वगैरे सरका-रच्या व्यापारखात्याकडून देण्यांत येईल. पण तेवढ्यानें भागणार नाहीं. सरकारनें शेअर घेऊन भांडवल पुरविलें पाहिजे, व्यवस्थेवर नजर ठेविली पाहिजे, आणि विशेषतः रेल्वेचे दर कमी केले पाहिजेत अशी मागणी व्यापारी वर्गाकडून व का-रखानदाराकडून व्हावयास पाहिजे. हें झाल्या-शिवाय उद्योगधंद्यांचा उत्कर्ष होणें कसें अशक्य आहे तें आह्मीं नुकतेंच एका लेखांत दाखविलें आहे. पण याचवेळीं दुसरा ही एक सोपासा व स्वार्थ आणि परमार्थ यांची जोड करून देणारा उद्योग आमच्या सुशिक्षितांना करतां येण्यासारख्या आहे. तो म्याजिकल्यांटर्नचा होय. म्याजि-कल्यांटर्न व सिनेमेटोग्राफ यांच्या द्वारें इतिहास, व शास्त्रीय शिक्षण फार जलद व उत्तम प्रकारें देतां येईल. म्याजिकल्यांटर्न व त्याचींचित्रें तयार करण्यास फारशी कुशलता ही लागत नाहीं. चित्रकला व फोटोग्राफी या दोन्ही येणारे शेकडों चांगले लोक आमच्यांत आज आहेत. त्यांनीं मनावर घेतल्यास हें सहज होणार आहे व याच्या योगानें हिंदुस्थानच्या लक्षावधि विद्यार्थ्यांवर उपकार करतां येतील. त्याच्या योगानें द्रव्यार्जना बरोबर शिक्षणप्रसाराचें ही श्रेय सहज संपादतां येईल. हिंदुस्थानांत प्राथमीक व दुय्यम प्रतीच्या शाळांची संख्या सुमारें ७८ हजार आहे. प्रत्येक शाळेला एकेक म्याजिक ल्यांटर्न व शेंपनास चित्रें तरी देण्यास सर-कारला जड जाणार नाहीं. ह्मणजे बरेंचसें गिऱ्हाईकही आज तयार आहे. या उद्योगाला भांडवल ही फारसें लागत नाहीं. तरी आमच्यांतल्या सुशिक्षित लोकांनीं मनावर घेऊन म्याजिक ल्यांटर्न व चित्रें तयार करण्याचा एखादा तरी कारखाना लव-कर काढावा असें आह्मी अगत्यानें सुचावितों.

---

## शीख लोकांची मुक्तता.

कोमागाटा मारू प्रकरणासंबधानें आताच खबर आली आहे कीं त्यांना सोडून देण्यात यावें अशी चौकशी करणाऱ्या कमिटीनें शिफारस केल्यावरून शीख लोक बंधमुक्त करण्यांत आले व सरकारनें त्यांना योग्य बंदोबस्तानें त्यांच्या देशीं पोंचाविलें. फार उत्तम. लॉर्ड हार्डिंज साहेबांच्या उदार व शहाणपणाच्या राजनीतीस साजेलसा हा निका-ल झालेला पाहून हिंदुस्थानांत सर्वत्र संतोष होईल यांत शंका नाहीं. कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला ह्मणजे या आनंदपर्यवसायी नाटकासंबंधानें पुष्कळ रहस्यें उलगडतां येतील असें लोकांस वाटत आहे. यासाठीं सदर रिपोर्ट लवकर प्रसिद्ध करावा अशी आमची सरकारास विनंति आहे.

---

## चालू महायुद्धाच्या बातम्या.

युरोपांत सध्या सुरु असलेल्या महायुद्धाला गेल्या आठवड्यांत थोडासा निराळा रंग आलेला दिसतो. बादशहा पांचवे जार्ज यांचें फ्रान्समधील आगमन शुभ मुहूर्तावर झालें असें दिसतें. जर्मनीच्या इंग्लंडवरील स्वारीचें भय निदान इंग्लंडच्या लोकांना तरी दिसत नाहीं. तसें असतें तर खुद्द बादशहा व युद्धखात्याचे सेक्रेटरी लॉर्ड किचनेर हे स्वतः युद्धक्षेत्रावर खास गेले नसते. जर्मन तोफां-च्या अंगची उष्णता ही कमी झालेली दिसते; किंवा आतांपर्यंत ओरडून ओरडून त्यांचा घसा तरी बसला असला पाहिजे खास. जर्मन लोकांना व्हार्मिलीज हें ठिकाण सोडून द्यावें लागलें. लीलच्या उत्तरेस इंग्लंड व फ्रान्सच्या फौजांचें पाऊल पुढें पडलें आहे. सध्या दोन्ही पक्षाच्या फौजा खंदकांतून बसण्यास पाहत आहेत. जर्मनींनें तर जमीन पोखरून आंत घुशीसारखें लपून बसण्याची युक्ति कांहीं ठिकाणीं अंमलांत ही आणिली आहे! हिंदुस्थानची फौज जर्मन शिपायांना सैताना सारखी दिसत आहे, आणि आपणांस हिंदी सैन्याचें जितकें भय वाटतें तितकें कोणत्याही युरो-पियन फौजेचें वाटत नाहीं असें जर्मन शिपाई ह्मणत आहेत. प्रस्तुतचें युद्ध निदान तीनवर्षांत तरी संपावयाचें नाहीं असें उद्गार लार्ड किचनेर यांनीं काढले असल्याबद्द-लची जी बातमी एका अमेरिकन पत्रांत प्रसिद्ध झाली होती ती खोटी आहे असें सरकारी रीतीनें जाहिर, करण्यांत आली आहे. यावरून ब्रिटिश सरकारच्या दृष्टीनें तरी प्रस्तुतच्या युद्धाच्या तीव्रतेचा सूर्य म-ध्यान्ह ओलांडून कलता झाला आहे असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. पूर्वकडे पोलांड मध्यें रशियानें मोठा विजय संपादन केल्याच्या बातम्या येतात, पण त्यांच्या विश्वसनीयतेसंबंधानें लोक साशंक होऊं लागले आहेत. जमन लोकांना पोलांड मधून हाकून लावण्याची रशियन लोक मुद्दाम घाई करीत नाहींत, याचें कारण खुद्द रशियन असें सांगतात कीं तसें केल्यास जर्मन लोक पश्चिमेकडे अधिक त्रास देतील. त्यापेक्षां त्यांना पूर्वेकडे गुंत-वून ठेवलेलें अधिक श्रेयस्कर आहे. परवा एका लढाईत जर्मन लोकांचा रशियानें प-

पराभव केला त्यावेळीं पुष्कळ जर्मन लोक हातीं लागले. यांत केसरचे दोघे पुत्र होते. पण ते विमानांत बसून रशियाच्या हातांतून निसटून गेले ह्मणतात. बेलज्यमची जी स्थिति झाली तीच सर्व्हियाची ही झाली आहे. तरी अशा स्थितींत ही परत सर्व्हियानें आस्ट्रियावर एक जय संपादल्याची खबर आहे. तुर्कस्थानच्या हालचालीच्या विशेषशा खबरा येत नाहींत. इजिप्तमधलें त्याचें कारस्थान सपशेल फसल्यासारखें दिसत आहे. सुएझच्या कालव्याचें नाकें आपल्या हातांत घेण्याची त्याची महत्त्वाकांक्षा दबल्यापासून तो निराश झाल्या सारखा दिसत आहे. घाईघाईनें व अविचारानें केलेल्या कृत्याच्या परिणामा बद्दल पश्चात्ताप करण्यास त्यास आता दीर्घकालाची फुरसत लवकरच मिळेल असा रंग दिसतो. तुर्कांकडून ग्रीक लोकाचा जो छळ नुकताच करण्यांत आला त्या बद्दल ग्रीसच्या प्रधानानें तुर्कस्थान कडून जबाब विचारला आहे, व समाधानकारक जाब न आल्यास मित्रत्वाच्या स्थितीचा भंग होईल अशी धमकावणी दिली असल्याची ही खबर आली आहे. इटलीनें आपली तटस्थवृत्ति सोडलीच तर तो इंग्लंड व फ्रान्सला मिळेल असा रंग दिसूं लागतांच जर्मनीनें तेथें आपला एक अत्यंत प्रसिद्ध मुत्सद्दी व्हॉन ब्युलो यास वकील ह्मणून पाठविला आहे. हा वकील राजकारस्थानाचे कामांत फार हुशार असून त्याची पत्नी एका प्रमुख सरदाराची मुलगी असल्यामुळें दोन्हीं कडून इटलीवर छाप बसविण्याचे जर्मनीचे प्रयत्न चालले आहेत. इटली तटस्थ आहे पण ही तटस्थ वृत्ति शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशा तऱ्हेची राहील असें एक मोठें कारस्थानी व संदेहात्मक भाषण इटलीचे प्रधान सायनर सालांड्रा यांनीं नुकतेंच केलें आहे. जर्मन वकीलाच्या आगमनाचा तर हा परिणाम नसेल ना अशी शंका इंग्लिश पत्रें घेऊं लागलीं आहेत. पोर्तुगालची आगळीक आपल्या हातून न कळत चुकीनें झाली याबद्दल जर्मनीनें क्षमा मागितल्यापासून पोर्तुगाल विषयींही खात्री देतां येत नाहीं. या संबंधात ता० ६ ची लिस्बनची तार फार संदेहात्मक आहे. पोर्तुगालला लवकरच या युद्धात पडावें लागेल, आणि त्या साठीं सर्व पक्षाचे प्रतिनिधि ज्यांत आहेत असें प्रधान मंडळ नेमण्याबद्दलही या तारेंत सुचाविलें आहे. हल्लींचें प्रधान मंडळ मोडावें कीं काय या बद्दल त्या प्रजासत्ताक राज्याच्या प्रेसिडेंटांनीं अद्याप निश्चयात्मक असें कांहींच ठरविलेलें नाहीं. तथापि तेथें दगगोळा होत आहेत अशी या तारेवरून शंका घेणें गैरवाजवी होणार नाहीं.

## दक्षिण अफ्रिकेंतलें बंड.

दहा बारा वर्षांपूर्वी दक्षिण आफ्रिकेंतले बोअर लोक इंग्रजाशीं दावागीरीनें लढत होते, तरी तें युद्ध संपतांच त्या देशाला स्वराज्य मिळालें. तें मिळाल्यापासून तेथील लोक ब्रिटिश साम्राज्याविषयीं पूर्ण राजनिष्ठ झाले, आणि जरी प्रस्तुच्या युद्धाच्या वेळीं मारित्झ व डीवेट यांच्या सारख्यांनीं ब्रिटिश लोकांशीं बेइमानपणा दाखवून बंडाचें निशाण उभारलें, तरी अखेर त्यांना शरण यावें लागून बंडाचा नायनाट झाला. स्वराज्याच्या हक्काची मात्रा बोअर लोकांवर किती उत्तम प्रकारें लागू पडली याला आतां दुसऱ्या प्रमाणाची अवश्यकताच राहिली नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांच्या राजनिष्ठेची कसोटी पाहण्याची ही वेळ होती, पण हिंदुस्थानचे लोक त्या कसोटीला पूर्णपणें उतरले आहेत. ते पूर्णपणें राजनिष्ठ राहिले आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांनीं तन, मन, व धन यावेळीं ब्रिटिश साम्राज्याला वाहिलें आहे. पण गंमत पहा कीं बोअर लोकांतले एक दोन पुढारी बंडखोर निघाले असूनही साउथ आफ्रिकेचे स्वराज्याचे हक्क काढून घेण्याबद्दल सूचना करण्याची छाती ज्या पायोनियर प्रभृति आंग्लोइंडियन पत्रांची होत नाहीं, तींच पत्रें पुढें मागें हिंदुस्थानाला स्वराज्याचे हक्क मिळतील ह्मणून आतां पासून त्या विरुद्ध सरकारला उपदेश करीत आहेत!

## व्हिक्टोरिआ क्रॉस.

युद्धांत उत्तम पराक्रम केल्याबद्दल व्हिक्टोरिआ क्रॉस नांवाचें एक पदक शूरांना ब्रिटिश सरकारकडून देण्यांत येत असतें. शूर पुरुषाचा हा अप्रतिम मान समजण्यांत येत असतो. चालू युद्धांत हा मान तिघा हिंदी शिपायांनीं नुकताच मिळविला असल्याची बातमी आली आहे. हें पदक देण्याची चाल १८५४ सालीं प्रथम सुरू झाली. तेव्हां पासून गेल्या ६० वर्षांत हा मान ५४० जणांना देण्यांत आला. पैकीं १८२ जणांना हा मान १८५७ सालच्या बंडाचे वेळीं अप्रतिम शौर्य दाखविण्याबद्दल दिला होता. क्रिमियन युद्धांत १११ बोअर युद्धांत ७८, झुलु युद्धांत २३, अफगाण युद्धात १६, न्यूझीलंडच्या स्वारींत १२ आणि हिंदुस्थानच्या सरहद्दी वरील दंग्यांच्या निरनिराळ्या प्रसंगीं १० अशीं सुमारें ४३२ पदकांची वाटणी आतांपर्यंत झाली. हें पदक ब्राँझ नांवाच्या धातूचें केलेलें असतें. असें सांगतात कीं क्रिमियन युद्धांत ज्या रशियन लोकांच्या तोफा ब्रिटिशांच्या हातीं लागल्या, त्यांच्या तुकड्यांचीं हीं पदकें बनविण्यांत आलीं व ही कल्पना परलोकवासी साध्वी महाराणी व्हिक्टोरिया यांचे पती प्रिन्स आल्बर्ट यांच्या डोक्यांत प्रथम आली. या पदकाची वस्तुतःकिंमत फक्त ४॥ आणे आहे, पण मानाचें पदक या दृष्टीनें त्याची किंमत कोणाला करतां येणार नाहीं. हें पदक बाजारांत १५०० रुपयांला विकत घेतल्याचीं ही उदाहरणें आहेत. हें पदक ज्यांना देण्यांत येतें त्यांना सरकारकडून दरसाल १५० पासून ७५० रुपयापर्यंत वर्षासन देण्यांत येतें. हें पदक निवळ हिंदी शिपायास मिळाल्याचें उदाहरण याच युद्धांत घडलें आहे, तरी यापूर्वी शौर्य दाखविल्याबद्दल हें पदक हिंदुस्थानांतल्या युरोपियन शिपायांना पुष्कळ मिळालीं आहेत. मायकेल म्याग्नर नांवाच्या १४ वर्षांच्या वयाच्या मुलानें तें मिळविलें होतें. सर एव्हलिन वुड यांनीं एका हिंदी माणसाचा प्राण वाचविल्याबद्दल तें मिळविलें होतें. गफ नांवाच्या एकाच घराण्यांतल्या तिघा पुरुषांनीं तें मिळविलें आहे! दक्षिण आफ्रिकेंतील युद्धांत, नुकतेच परलोकवासी झालेल्या लॉर्ड राबर्टस यांच्या पुत्रानें तें मिळविलें होतें; पण दुःखाची गोष्ट कीं हा अपूर्व सन्मान स्वतः पाहण्यास तो पुत्र जगला नाहीं. असा हा अपूर्व सन्मान गेल्या महिन्यांत एकदम तिघां हिंदी शिपायांस मिळाल्याबद्दल कोणा हिंदी माणसाला अभिमान व आनंद वाटणार नाहीं!

## सार्वजनिक सभेची व्याख्या.

यंदाच्या कांग्रेसला सर्व पक्षांच्या लोकांना जातां यावें ह्मणून नेमस्त व जहाल या दोन पक्षांत समेट करण्याचे यत्न चालले आहेत. कोठवर सह्या करण्यास जहाल तयार झाले आहेत. पण कोणत्या ही सार्वजनिक सभेला प्रतिनिधि निवडून देण्याचा अधिकार असावा असा त्यांचा आग्रह आहे. प्रयागचा 'अभ्युदय' व 'लीडर', मद्रासचें 'कॉमनवील', व 'हिंदु', व दुसरीं वजनदार पत्रें या आग्रहाला अनुकूल झालीं आहेत. पण अडचण ही आहे कीं सार्वजनिक सभा या शब्दाच्या व्याख्येंत कोणत्या सभांचा अंतर्भाव करावा व कोणत्या नाहीं? चार टारगट लोकांची सभा ही सार्वजनिक सभा ह्मणावयाची असेल, तर सार्वजनिक सभेकडूनच प्रतिनिधि निवडले गेले पाहिजेत अशी तरी अट पाहिजे कशाला? कॉलेजचे विद्यार्थी काय, पण प्राथमिक शाळेंतले सुद्धां प्रौढविद्यार्थी जनतेचा अंश असल्यामुळें त्यांची सभा ही हक्कानें सार्वजनिक या व्याख्येखालीं येऊं शकेल, आणि धूर्त व आपला मतलब साधण्याचे कामीं हव्या त्या साधनाचा उपयोग करून घेण्यास मागें पुढें न पाहणारे वेळीं प्रसंगीं अशा सार्वजनिक सभेच्या आड राहून कांग्रेसपाशीं भलतीच एखादी मागणी करून तिला अडचणींत आणून सोडणार नाहींत अशी पुण्याच्या किंवा नागपूरच्या मागील इतिहासावरून कोणाला तरी छातीला हात लावून सांगतां येईल काय? पुण्याच्या कांग्रेसच्या वेळच्या मारामाऱ्या अशा पोरासोरांच्या सार्वजनिक सभामुळेंच उद्भवल्या, आणि त्यांनींच कांहीं काळपर्यंत सार्वजनिक हिताचें कामकाज बंद पाडलें होतें ही गोष्ट इतक्यांतच लोक कसे विसरले?

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— मध्यंतरी थंडी बरीच पडूं लागली होती परंतु गेल्या आठवड्यात दोनचार दिवस ती थोडीशी शिथील झाली आणि काल पासून फिरून चमकण्यास आरंभ केला आहे. हवा स्वच्छ असून निरोगी आहे. गांवांत रोगराई नाहीं.

येथील डेप्युटी कमिशनर रा० डेवर साहेब बहादूर हे किरकोळ रजेवर मुंबईस गेले आहेत.

गेल्या शनिवारीं ता० १२ रोजीं दिल्लीच्या राज्यारोहण दरबारच्या वाढ दिवस निमित्त येथील मुलामुलींच्या सर्व शाळांमधून राष्ट्रगीतें व राजनिष्ठेचीं गाणीं गाण्यांत येऊन मुलांमुलींना मिठाई वांटण्यांत आली हायस्कूल व म्युनिसिपल ए० व्ही० स्कूल मध्यें येथील लोकप्रिय डे० कमिशनरसा० त्यांच्या पत्नी व कन्या रा० फौलर सा० वगैरे सर्व युरोपिअन व नेटिव्ह अधिकारी या प्रसंगीं हजर असल्यामुळें विशेष गांभिर्य आलें होतें.

दुरुस्तीः— या अंकाच्या पान ३ कॉलम ४ यांतील १३ व्या ओळींत learned preferiou च्या जागीं learned professions असें वाचावें.

## आंकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| सोनें | २६ |
| चांदी | ७०॥ |
| आळशी | ९९ |
| बाजरी | ७७–७८ |
| कापूस | ३४—३५ |
| तीळ | ५॥—६ |
| गहू | ६। ते ८ |
| जवारी | ५५—६२ |
| तूप | १० ते १०॥ |
| तेल | ६।ते ६॥ |
| सरकी | खं. ८ |

## आठवें महाराष्ट्र साहित्यसंमेलन.

( वेळ बदलली. )

हें संमेलन येत्या एप्रिलमध्यें ईस्टरच्या सुट्टींत मुंबईस भरण्याचें ठरून त्याप्रमाणें सर्वत्र जाहीर करण्यांतही आलें होतें. परंतु त्याच वेळेस उमरावतीस 'प्रांतिक सामाजिक परिषद्' भरण्याचें ठरलें आहे, त्यास विरोध येऊं नये अशी विनंती करण्यांत आल्यावरून, साहित्यसंमेलन शिमग्याच्या सुट्टींत भरवावें असें आतां साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळीनें ठरविलें आहे.

(लेखकांस विनंती.)

संमेलनासाठीं नेमलेल्या विषयांवर ज्यांस निबंध पाठवावयाचे असतील त्यांनीं ते जानेवारी १९१५ अखेर परिषदेच्या चिटणिसांकडे पाठविण्याची कृपा करावी. लेख धाडण्याविषयीं सर्व लेखकांस स्वतंत्र विनंतीपत्र जाणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं हेंच विनंतीपत्र समजावें, अशी विनंती आहे.

संमेलनाची नक्की तारीख मागाहून प्रसिद्ध करण्यांत येईल.

रामकृष्ण र. मोरमकर,
वासुदेव गोविंद आपटे,
चिटणीस, महाराष्ट्र साहित्यसंमेलन,
८१ फणसवाडी, मुंबई नं० २.

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

ओकटी, झाडा, संधिवात, फॅपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥१२

वी. एच जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो · नं० ३३७

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनाविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० देड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी साळ्याचें तेल,

किंमत रुपये ९ देड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4,68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 3136,421 | 1,41,32356 |
| 1903 | 41,07,009 | 2,1[illegible],95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,2[illegible],79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

***M. deSOUZA,***

CHIEF AGENT,

*C. P. Berar & Khandesh,* NagPUr

N No. 13

मागालिक प्रसंगों बक्षीस देण्याकरितां

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमागऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥। व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डें दिलचमनचीं दर डझनास रु. -॥।- "

### सोल एजन्ट्स. एच, आर. मोदी आणि कं.

नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥– उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून अन्य न लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक-- डा. गौतमराव केशव, आणि सन्स ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो॰ नं॰ १११

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २१ माहे डिसेंबर सन १९१४ ई० [ अंक ४९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।=शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २१ ममीरातिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व ३½+१½ गज ६ शे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ४५३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६¾ तोळे असतें.

मुंबई बँक
आकोला २१-९-१० } J. G. Ridland. एजंट
नो० नं०

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट
नो. नं ४

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना
ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठिः—पांजरा पोळचा नाका, चिमणाला-लमहारानांचे मंदीर भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ! एकच भाव! !

आठा सुरंगी आमचेकडे मिळणारा
माल ओळो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केसर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, थंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ४१६

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २९

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं
शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १८०

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

## डायरी बक्षीस!!

(१)खडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ०६. (२)खडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ०६. [३) धर्मपद, किंमत ०४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ०५. (५) विदग्धवाङ्मय, किंमत ०३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ०२. (७) मुलांस थोडा उपदेश, किंमत ०८. (८) वाल्मीकीचा जय, किंमत ०८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ०१२. (१०) शिवलीलामृत किंमत ०८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.
नो. नं. ४९४

श्रीगजानन

### जाहीर खबर

विक्रीस तयार

अकोले येथील सीव्हील स्टेशनांतील गवती बंगला सभोंतालच्या विस्तीर्ण बगीच्या सुद्धां ज्यास लवचा जुना गवती बंगला ह्मणतात तो.

बयमंजीच्या धर्मशाळे जवळील धान्य साठविण्याचा कोठा.

ज्याची मर्जी दोन्ही मिळकती अगर या पैकी एखादी घेण्याची इच्छा असेल त्यानें खालीं सही करणार याज कडेस बोलणे करावे. अकोले तारीख ३।१२।१४

सही
देवराव विनायक

नो. नं. ४६७

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी. ० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ६

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा आगपेण; व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगाव चालणारा १ च 'दिलखुश' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. ।‌ रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे औ. किं. ४ आणे, वि० सु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हा भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

## प्रदर्शन.

पिंपळगांवदेवी तालुका मलकापूर जिल्हा बुलढाणा येथें होणारे जनावराचे व शेतीच्या पदार्थांचें प्रदर्शन आणि वऱ्हाडी व परदेशी नागरांची शर्यत

—:*:*:—

हें प्रदर्शन तारीख ४।५।६ ज्यानेवारी सन १९१४ पर्यंतें खुलें ठेविलें जाईल. त्यांत खालीं दिलेप्रमाणें बाक्षिसें दिलीं जातील परंतु वर्गणी जशी जमेल त्या मानानें तीं ज्यास्त केलीं जातील. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शेतकरी लोकांनीं आपापलीं उत्तम जनावरें आणावीत.

### बक्षिसाचा तपशील

#### जनावरांबद्दल

भाग १ बुलढाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापर्यंत शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें पहिलें रुपये | दुसरें रुपये | तिसरें रुपये |
|---|---|---|---|
| १ अवकाद घेण्यायोग्य उत्तम गोऱ्हे | १५ | १२ | ८ |
| २ उत्तम बैलाची जोडी | २० | १ | ५ |
| ३ पीतनसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | १० | ८ | ५ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आंतील उत्तम गोऱ्हा | १० | ८ | ५ |
| ५ सर्वांत ज्यास्त दूध देणारी गाय | २० | १५ | ४ |
| ६ दुधाची बकरी | ५ | ३ | १ |
| | ७० | ५२ | २८ |

भाग २ बुलढाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापेक्षां जास्त शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें रुपये |
|---|---|
| १ अवकाद घेण्यायोग्य उत्तम गोऱ्हे | १५ |
| २ उत्तम बैलाची जोडी | १० |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | ८ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आतील उत्तम गोऱ्हा | ८ |
| ५ सर्वांत जास्त दूध देणारी गाय | १५ |
| ६ दुधाची बकरी | ४ |
| | ६० |

धान्याचे नमुन्याबद्दल दोन्ही प्रकारचे किरसानी लोकासाठीं.

| वर्णन | बक्षिसें पहिलें रुपये | दुसरें रुपये |
|---|---|---|
| उत्तम रोझीया कापुस............ | ५ | ३ |
| " जोंधळा (ज्वारी) ........ | ५ | ३ |
| " गहू ........................ | ४ | २ |
| " हरबरा (चणा) ........ | ४ | २ |
| " तिळ [पांढरा] ........ | २ | १ |
| " जवस [अळशी] ........ | २ | १ |
| " तंबाखु .... .... .... .... | २ | १ |
| " मिरची .... .... .... .... | २ | १ |
| | २६ | १४ |

प्रत्येक नमुना तीन शेरापेक्षां कमी नसावा. नांगराचे शर्यतीसाठीं बाक्षिसांची रक्कम ५० रुपये ठेविली आहे. एकूण बक्षिसांची रक्कम ३०० रुपये आहे. बुलढाणा तारीख १० माहे नोव्हेंबर सन १९१४ इ.

Sd/ K. S. Jathar.

डेपुटी कमिशनर जि. बुलढाणा

## आठवें महाराष्ट्र साहित्यसंमेलन.

( वेळ बदलली. )

हें संमेलन येत्या एप्रिलमध्यें ईस्टरच्या सुट्टींत मुंबईस भरण्याचें ठरून त्याप्रमाणें सर्वत्र जाहीर करण्यांतही आलें होतें. परंतु त्याच वेळेस उमरावतीस 'प्रांतिक सामाजिक परिषद' भरण्याचें ठरलें आहे, त्यास विरोध येऊं नये अशी विनंती करण्यांत आल्यावरून साहित्यसंमेलन शिमग्याच्या सुट्टीत भरवावें असें आतां साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळीनें ठरविलें आहे.

(लेखकांस विनंती)

संमेलनासाठीं नेमलेल्या विषयांवर ज्यांस निबंध पाठवावयाचे असतील त्यांनीं ते जानेवारी १९१५ अखेर परिषदेच्या चिटणिसांकडे पाठविण्याची कृपा करावी. लेख धाडण्याविषयीं सर्व लेखकांस स्वतंत्र विनंतीपत्र जाणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं हेंच विनंतीपत्र समजावें, अशी विनंती आहे.

संमेलनाची नक्की तारीख मागाहून प्रसिद्ध करण्यांत येईल.

रामकृष्ण र. मोरमकर,
वासुदेव गोविंद आपटे,
चिटणीस, महाराष्ट्रसाहित्यसंमेलन,
८१ फणसवाडी, मुंबई नं० २.

## जाहीरात

पाहिजे— न्यु इंडिया इन्शुरन्स व्यांकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि खानदेशभर हुषार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल विशेष माहिती करितां खालील पत्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट
न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड
नो नं ४५०

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-
The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay
No. No.421

## ब्रह्म विद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ५ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १।८ वरील मासिक घेणारास फक्त १ रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ४७५

## विनंती पत्र.

मराठा— शिक्षण— परिषदेची आठवी बैठक पुणें येथें तारीख २७, २८, २९ डिसेंबर सन १९१४ रोजीं भरणार आहे. अध्यक्षस्थानीं श्रीमंत महाराज मल्हारराव बाबासाहेब पवार देवास धाकटी पाती यांची बहुमतानें निवड करण्यांत आली आहे. तरी सर्व ठिकाणच्या मराठे बंधुंनीं पुणेंकर मराठा बांधवास शक्य ती मदत देऊन परिषदेचें कार्य तडीस न्यावें अशी सविनय प्रार्थना आहे.

परिषदे पुढें विचारासाठीं मांडावयाच्या विषयाबद्दल सूचना व ज्या कोणास निबंध वाचावयाचे असतील त्यांनीं आपले निबंध शक्य तितक्या लवकर पाठविण्या बद्दल विनंती आहे.

आपले नम्र
गोविंदराव कृष्णाजी पा० बोत्रे
लक्ष्मणराव बापुजी शिंदे बी. एजी.
गंगाजीराव मुकुंदराव काळभोरे
सेक्रेटरीज् स्वागत मंडळ.

## नोटीस.

नोटीस बेशमी गणेशराम सुरजमल मारवाडी रा० अंदुरा ता० बाळापूर

यास:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी व मी मिळून माळव्यांत देवळी ता० साजापूर येथे तकसीमेत माल गुजारीचे गाव केले आहे. व तेथें आपली दुकान आहे गांवासंबंधी साजापूर येथें दावा चालू आहे हल्लीं तुह्मी दुकानास व मकानास काम नवीन चालु केलें आहे. त्या मकानास व दुकानास जो पैसा लागेल त्याचा जबाबदार मी नसून तुह्मी आहां तुह्मी माझे परवानगीवाचून काम सुरू केलें आहे कळावें ता० १४।११।१४ इ. मु० आकोला.

सही

बंकट बालाराम द० खु०

नो. नं. ४७६

## नोटीस

नोटीस परशराम वा। बाळाजी कासतोडे जात कुणबी रा० मौजे गणपुर प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें ।

यांसी:—

नोटीस दे० बनी मर्द परशराम कासतोडे कुणबी रा० मौजे गणपुर प्र० व ता० मेहकर जि० बुलडाणें लिहून देते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असोन लग्न होण्यास सुमारें ११ वर्षे झालीं तेव्हांपासून तूं मजला नांदवित नाहींस. मजला रुतु प्राप्त होऊन ६ वर्षे झालीं. माझा संसार होत नाहीं. माझा संसार वाया जात आहे. आपसांत पंचाईत होऊन तूं मजला फारखत देण्याचे कबुल केले त्यास ४ महिने झाले तीं तूं अद्याप दिली नाहींस करितां नोटीसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून ८ दिवसांत ठरल्याप्रमाणें मजला फारखत रजिष्टर करून द्यावी. वरील मुदतींत ती न दिल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुझी कोणत्याहि प्रकारें तक्रार चालणार नाहीं. करितां आगाऊ कायदेशीर नोटीसीनें तुजला कळविलें आहे कळावे.

तारीख ६।१२।१४

सही

नि० बनी मर्द परशराम हिची.

## नोटीस

नोटीस बेशमी कासीराम ओंकारदास रा० उमरावती हल्लीं मुक्काम भिनमाळीया प्रगणें सोजत मारवाड

यांसी:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपण आह्मांस ता० १९।११।१४ ची नोटीस दिली ती आह्मांस पोहचली. त्या नोटीसींत आपण लिहीले कीं कारंजा येथील दुकान कासीराम रामलाल या नांवचे आहे त्यांत तुमची व आमची शराकत असून त्यांत तुमचा आठ आण्याचा हिस्सा आहे आपण लिहीलेले सर्व खोटे आहे. शराकत तुमची आमची नसून ओंकारदास सोमेश्वर आपले वडील यांची व आमची आहे. शराकत झाली त्यावेळेस करार मदार व ठराव सर्व आपले वडील ओंकारदास सोमेश्वर व आह्मी ह्यामध्यें झालेले आहे त्यावेळेस आपण अज्ञान होता व आपले बापाचे ह्मणण्यावरून फक्त आपलें नांव दुकानास देण्यांत आले. ह्या व्यतीरिक्त आपला व दुकानचा कांहीं एक संबंध नाहीं. आपण लिहितां कीं आपला आठआण्याचा हिस्सा दुकानांत आहे तर ही गोष्ट देखील खोटी आहे. आपले वडीलानीं दोन हिस्से आमचे ठेवून फक्त एक हिस्सा दुकानांत आपला स्वतःचा ठेवून घेतला आहे. ह्या प्रमाणें आपले वडीलांचा फक्त दुकानांत $\frac{1}{3}$ हिस्सा आहे व ह्या प्रमाणें पूर्वी नफा नुकसानीचे जमाखर्च ही झाले आहे. आपण कारंजा येथें गेले साली दोन महिनें येऊन राहिलात व दुकानांतील वह्या जातेवेळीं जबर दस्तीनें नेल्या. त्यानंतर मी आपले जबाबदारी वर एकटाच काम चालवित आहे. त्या वह्याही आपण परत आणून दिल्या नाहींत त्या वह्यांतही माझेवर लिहिलेलें ह्मणण्या प्रमाणें मजकूर व जमाखर्च सापडेल. आपणास हिशेब व नफा नुकसान मागण्याचा कांहीं अधिकार नाहीं. आपण नेलेल्या वह्याही नोटीस पावल्या तारखेपासून एक महिन्याचे आंत आह्मांस परत द्याव्या. नाहीं तर आह्मास कायद्याप्रमाणें

तजवीज करणें भाग पडेल. ह्या नोटीसीचा खर्च आपणापासून घेतला जाईल. कळावें ता. १४।१२।१४ इ.

सही

रामलाल जगंन्नाथ राहणार कारंजा द. खु. नो. नं. ४७८

---


# वऱ्हाडसमाचार

मिति पौष शु॥ ९ शके १८३६


## जपानांतून येणारा नवा प्रकाश.

नुकत्याच घडलेल्या कोमागाटा मारूवरील शीख उतारूसंबंधाच्या शोचनीय प्रकाराची खरी अंतःस्थिति दाखविणारा नवा प्रकाश जपानांतून आला आहे. ह्याच्या साह्यानें सदर अंतःस्थिति किती हृदयद्रावक आहे हें चांगलें दिसून येतें. ता. २७ आगष्टच्या जपान हेरल्ड पत्राच्या अंकांत कोमागाटा मारू बोटींवरील उतारूंची स्थिति वर्णिली आहे ती अशी—या उतारूंचे प्रमुख मि० गुरुदितसिंग यांच्यामनांत हिंदुस्थान आणि कानडा यांच्यांत व्यापारी दळणवळण सुरू करून आपल्या ज्ञातिबंधूंना पोटापाण्याचा उद्योग लावून देण्याचें होतें. हिंदुस्थान व जपान देशांतून कोळसा व लोखंड कानडांत नेऊन तिकडून इमारती लाकूड वगैरे जिन्नस हिंदुस्थानांत आणावयाचे होते. शीख लोकांनीं कानडा देशांत जमिनी मिळवून शेती करावी व प्रामाणिकपणानें आपला धंदा चालवावा, असा त्यांचा उद्देश. पण दैवानें चिंतिलें होतें निराळेंच. गुरुदितसिंगाच्या उद्देशाप्रमाणें घडून येतें तर त्यांत कानडाच्या लोकांचा फायदाच झाला असता, व हिंदी लोकांचाही त्याबरोबर होऊन दोन्ही लोकांत सख्य वाढलें असतें. पण त्याच्या ऐवजीं कानड्यांतील लोकांच्या विचित्र वर्तनानें तीव्र द्वेषभाव मात्र उत्पन्न करून ठेविला, आणि हिंदी लोकांना अपार दुःखसमुद्रांत लोटलें. कोमागाटा मारू वरील हिंदी उतारूंचे हाल जपान हेरल्डनें वर्णिले आहेत ते तर अत्यंत करुणास्पद आहेत. या लोकांचें दारिद्र्य वर्णनातीत होतें. ते जपानांत गेले तेव्हां त्यांचे जवळ खाण्यासाठीं फळें किंवा भाज्या विकत घेण्याला सुद्धां पैसे नव्हते. बोटीवर त्यांना उभेडसुद्धां मिळूं देईनात, किंवा स्वैपाक करण्याला वाफ देईनात. शेवटीं जपानी कौंसलच्या मध्यस्थीनें हे त्यांचे हाल अंशतः दूर झाले. बोटीवर त्यांना नुसतें डाळीचें खाणें मिळे. त्यांना आपण हिंदुस्थानांत मुलाबाळांना भेटूं अशी आशा सुद्धां वाटत नव्हती. स्वदेशची मुलाबाळांची समाचाराची बातमी त्यांना कित्येक महिने पर्यंत मिळालेली नव्हती. जपान हेरल्ड पत्रानें प्रत्यक्ष पाहून वर्णिलेली ही स्थिति कोणीकडे आणि पायोनियर, इंग्लिशमन, व टाइम्स ऑफ इंडिया इत्यादि पत्रांनीं या लोकांजवळ दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामान होतें असें ह्मटलें तें कोणीकडे! त्यांनीं भाज्या फळें वगैरे विकत घेण्यासाठीं आपला दारूगोळा जपानी लोकांना तर विकला नसेल ना? अशी पृच्छा मॉडर्न रिव्ह्यु कर्त्यांनीं केली आहे ती तर खरी नसेल ना?

---

## छापण्याची शाई.

सध्याची वेळ हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांना उर्जितदशेला आणण्यास फार अनुकूळ आहे असें जाणून हरिद्वार—हृषिकेश येथें कांहीं लोकांनीं छापण्याच्या शाईचा कारखाना काढला आहे. सध्यां आपले देशांत छापण्याची चांगली शाई जर्मनींतून येत असते. या देशी कारखान्यांत तयार होणारी शाई कांहीं दिवसांनीं जर्मन मालाची बरोबरी करणारी होईल असें ह्मणतात. शाईच्या अंगीं चिकटपणा, तकाकी, न फुटण्याचा गुण, व लवकर वाळणें इ. गुण असावे लागतात. हे सर्वगुण आजच या देशी शाईचे अंगीं आहेत. ही शाई छापतां छापतांच सुकते. सरकारनें या कारखान्याला शास्त्रीय कृतीची माहिती व भांडवल यांचा पुरवठा केल्यास मोठ्या प्रमाणावर हा कारखाना चालण्यासारखा आहे.

---

## वॉर रिलीफ फंड

वॉर रिलीफ फंडाला हिंदुस्थानच्या लोकांकडून—विशेषतः संस्थानिकांकडून—जी मदत झाली आहे तिची खुद्द इंग्लडांतल्या धनिक लोकांकडून झालेल्या मदतीशीं तुलना करून लंडनचें रिव्ह्यु ऑफ रिव्ह्युज मासिक पुस्तक ह्मणते कीं हिंदुस्थानच्या मदतीपुढें इंग्लंडची मदत कांहींच नाहीं. हिंदुस्थाननें इतकी मदत दिली असतांही पायोनियर, व इंग्लिशमन यांसारखीं आंग्लोइंडियन पत्रें ह्मणत आहेत कीं युद्धसंपून या मदतीबद्दलचा उतराईपणा दाखविण्याचा प्रसंग येईल तेव्हां ब्रिटिश सरकारनें फार सावधागिरी ठेवावी आणि हिंदुस्थानला स्वराज्याचे हक्क देऊं नयेत! हिंदुस्थान सरकार अशा पत्रकर्त्यांच्या मुसक्या आवळण्यास समर्थ असूं नये, आणि प्रेस आक्टसारख्या शस्त्रांचा प्रयोग गरीब बिचाऱ्या हिंदी पत्रकर्त्यावरच तेवढा व्हावा ही केवढी शोचनीय गोष्ट आहे!

---

## हिंदी साहित्यसंमेलन.

साहित्यसंमेलनें या शिक्षणसंस्था सारख्या सार्वजनिक हिताच्या व महान उपकारी संस्था होत ही कल्पना बंगाली लोकांच्या मनावर जितकी उत्कृष्ट प्रकारें ठसली तशी इतर प्रांतांतल्या लोकांच्या मनावर अद्याप ठसलेली दिसत नाहीं. मद्रासेंत तर देशी भाषांच्या अध्ययनाविषयीं व त्यांच्या उत्कर्षा विषयीं पूर्ण अनास्था दिसून येते. मद्रास इतकी जरी नाहीं तरी जवळ जवळ तितकीच आस्थाशून्यता आह्मा महाराष्ट्रीयांच्या ही ठायीं आहे असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. ज्या हिंदी भाषेंत तुळसीदास रामायण किंवा आणखी तसेच दोन चार ग्रंथ यां शिवाय ह्मणण्यासारखें प्राचीन ग्रंथभांडार नाहीं, व बंगाली व मराठी पुस्तकांचीं भाषांतरें या पलीकडे अर्वाचीन ग्रंथभांडार ही नाहीं अशा हिंदी भाषा बोलणारांनीं ही साहित्य संमेलनाच्या बाबतींत आह्मां महाराष्ट्रीयांना लाजवावें यापेक्षां आणखी शोचनीय गोष्ट कोणती असेल? मराठी भाषेचे प्राचीन ग्रंथभांडार विपुल आहेत आणि अर्वाचीन ग्रंथभांडार संपन्न करण्याची धमकही आह्मा महाराष्ट्रीयांचे अंगी आहे. असें असतां आह्मी लोक साहित्या विषयीं किती उदासीन आहों याची साक्ष आमच्या साहित्य परिषदेचें दारिद्र्यच देईल. आमच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेला दहापांच ग्रंथकारांशिवाय इतरांचें विशेषसें साह्य नाहीं. यामुळें तिच्या हातून ह्मणण्यासारखी कांहीं कामगिरी होत नाहीं. ती संस्था कशी तरी जीव धरून राहिली आहे येवढेंच. तेंच हिंदी भाषा जाणणारांचे प्रयत्नाकडे पहा. गेल्या मोहरमाचे वेळीं हिंदी साहित्यसंमेलन लखनौ येथें पंडित श्रीधर पाठक यांच्या अध्यक्षत्वाखालीं झालें. त्यास निरनिराळ्या प्रांतांतर्फे ५०० प्रतिनिधि निवडून गेले होते. आमच्या संमेलनाला फारसें दूर जावें लागत नाहीं, व निवडणुकीचें तत्वही नियमांत घुसडलें नाहीं, तरी शें दोनशें प्रमुख गृहस्थ गोळा होत नाहींत! परवाच्या हिंदी साहित्यसंमेलनाचे वेळीं एक छोटेंसें साहित्यविषयक प्रदर्शनही भरविण्यांत आलें होतें, व त्यांत प्राचीन दुर्मीळग्रंथ, लेखकांच्या तसबिरी, नाणीं, ताम्रपट, वगैरे जिनसा ही मांडण्यात आल्या होत्या. मुंबईस येत्या शिमग्याच्या सुटींत भरणाऱ्या मराठी साहित्यसंमेलनाचे प्रसंगीं असें प्रदर्शन भरविण्यांत यावें अशी आह्मी सूचना करतों. हिंदी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष पंडित पाठक यांचें भाषण कळकळीचें व सुविचारपरिप्लुत झालें. हिंदी भाषाभिमानी आपल्या साहित्याच्या उन्नत्यर्थ कसेकसे प्रयत्न करीत आहेत पहा! बनारसची नागरी प्रचारिणी सभा उत्तमोत्तम १०० विविधविषयक ग्रंथ प्रकाशित, करूं लागली आहे; तसेंच शिवणकाम, रंगकाम, सुतारकी, स्वैपाक, वगैरे कामधंद्यासंबंधानें ही माहिती देणारें साहित्य तयार करण्याचें तिनें पतकरलें आहे. नागरी लिपि प्रचारांत आणण्याचे आटोकाट प्रयत्न तिनें चालविले आहेत. त्यासाठीं ठिकाठिकाणीं उपदेशक तिनें पाठविले आहेत. यापैकीं कित्येक उपदेशक मराठी संस्थानांतून मराठी भाषेचें उच्चाटन करून तिच्या जागीं हिंदी भाषेची स्थापना करण्यांतही यशस्वी झाले आहेत. फार काय पण श्री. सरदार किबे साहेबांसारख्या कट्ट्या मराठी भाषेच्या अभिमानी लेखकाच्या मनावरही त्यांनीं भुरळ घालून त्यांनीं आपल्या जाळ्यांत त्यांना ओढलें आहे! दुसऱ्याचा पाडाव करून स्वतःचें महत्त्व वाढविण्याच्या या निंद्य प्रयत्नाचें अनुकरण राहो, पण हिंदी सभा जे स्तुत्य प्रयत्न करीत आहे त्यांत तरी महाराष्ट्रसाहित्यपरिषदेनें तिला हार जाण्याचें कांहीं कारण नाहीं. हिंदी साहित्यसंमेलनाचे वेळीं लोकांनीं दाखविलेला उत्साह अवर्णनीय होता. साहित्याच्या उन्नतीला मदत करण्यासाठीं जागचे जागीं ५००० रुपये जमले. आकोल्यास भरलेल्या साहित्यसंमेलनाचे वेळीं याच्या चतुर्थांश ही रकम गोळा झाली नव्हती. हिंदी साहित्यसभेचे हजार दीड हजार सभासद आहेत. मराठी परिषदेचे दीडशे सुद्धां नाहींत! नागरी प्रचारिणी सभेची स्वतःची इमारत स्वतःचा ग्रंथसंग्रह व स्वतःचीं तीन मासिक पुस्तकें आहेत. मराठी साहित्य परिषदेला यां पैकीं एकाची तरी अनुकूळता आहे काय? हिंदी साहित्यसंमेलनाची ही कामगिरी व उत्साह पाहून महाराष्ट्रीयांना कांहींच हुरूप येऊं नये काय?

---

## सांप्रतची विवाहपद्धती

### [ दम्पत्यैकजीव ]

पूर्वीं दोन अंकांत दम्पत्यैक्य घडवण्यास वेदकालांत व पुराणकालांत कोणकोणते उपाय योजण्यांत आले हें दाखविलें आहे

येवढ्यानेंही पत्नीपातिप्रेम जितक्या पूर्ण पणानें जडावें तितकें जडेना ह्मणून मुलीस कोणी द्यावें— कोणत्या प्रकारच्या पुरुषास मुलगी द्यावी— कोणत्या आप्तांस ती देऊं नये— सकुल्य, सपिण्ड, समानोदकांतील, समान गोत्रांतील पुरुष तरी याच धोरणानें वगळलेले आहेत. याच तत्त्वावर पोट जाती पोटजातींत रोटी व्यवहार असला तरी बेटीव्यवहार मना आहे. उद्देश हाच कीं दाम्पत्य प्रेम पूर्णपणें केवळ दम्पत्य याच भावनेनें विकसित व्हावें अशा व्यतिरेकानें उभयतांत रक्तगुणैक्याचें समानत्वाचा संभवच टाळला जाऊ लागला. ऋणबीजत्व अगर धनबीजत्व परस्पर भिन्न झालीं व संयोग आणि सर्व प्रकारें अभीष्ट संततीचा संभव वाढला. या प्रमाणें व्यतिरेक क्रमाक्रमानें पूर्णत्वास निदान हल्लीं आढळून येतो तसा आविर्भूत झाला. सर्व पद्धतीच्या मुळाशी परस्पर संकलन आणि त्याच्या द्वारा मनुष्यजातीची उत्क्रान्ति— पण ती क्रमशः —हीं आहेत हें सहज समजण्या सारखें आहे. नेपाळ तराईत वरिष्ठ जातीच्या पुरुषास कनिष्ठ जातीच्या स्त्री बरोबर विवाह करतां येतो. अलाहाबाद हायकोर्टास असले विवाह मान्य नाहींत ह्मणूनच नामदार बसूंनीं लग्नासंबंधीं बिल आणलें होतें. परंतु तें नामंजूर झालें. एक कालावच्छेदें करून दोन अथवा जास्त विवाहित स्त्रिया करणें मुळा पासूनच बंद होतें. परंतु दैवयोगानें घटित विवाहा पासून पतीस पत्नीशी एकात्म बनणें दुर्घट होऊं लागल्यास प्रेमाभावीं केवळ पशुवृत्तींत एक तर सन्तान होणेंच कठीण व झालेंच तर तें अशक्त दुर्मन आणि अप्रसन्न होण्याचा संभव विशेष— अशा प्रकारची संतती उत्पन्न होऊन समाजाचा तसेंच कुळाचा ऱ्हास न व्हावा ह्मणून पहिल्या स्त्रीच्या संमतीनें कांहीं जातींस एक स्त्री असतां दुसरी करण्याची परवानगी मिळाली— हें शैथिल्य इष्ट होतें कां अनिष्ट होतें हें या त्रोटक हकीकतींत पहाणें नाहीं. आह्मांस संक्षिप्त इतिहास देणें आहे. पूर्वजांच्या दूरदर्शीपणावर टीका करण्याचा आमचा उद्देश नाहीं. ही परवानगी प्रथम स्त्रीस वंध्यत्व अगर स्पर्शजन्य रोग असेल तरच मिळत असे. व तीही प्रथम भार्ये पासून मिळवून घ्यावी लागत असे. मनूनें मृत भार्ये नंतर पुनः दुसरें लग्न करण्याची संमति दिली व तशी आज्ञा त्यांच्या ग्रंथांत सांपडते. द्वितीय स्त्री कुमारिकाच असावी लागे, व अशा कुमारिका पत्नीस प्रथम पत्नी पेक्षां सामाजिक आणि धार्मिक हक्क कमी मिळत असत व

आयाही मिळतात. त्यांस सहधर्माचरण करण्याचा अगर दत्तक घेण्याचा अयाही अधिकार नाहीं. अशा स्त्रियांस विषय शास्त्रार्थ परिणीता भार्या इत्यादी हलकीं विशेषणें मनु आणि इतर शास्त्रग्रंथांत आढळतात. एक कालविच्छिन्न द्विभार्या योग व त्यास शास्त्रकारांनीं घालून दिलेल्या मर्यादा इतकें सिद्ध करून देतात कीं शास्त्रकारांच्या वेळींच पुरुष स्त्रियांवर अधिक सत्ता गाजवूं लागले असें वागणें पुढील पिढ्यांस अपकारक होतें. प्रेमानें ज्या संततीची उत्पत्तिच नाहीं ती मानवजातीच्या उत्क्रांतीस विघातक आहे व समाजास निकृष्ट करील हें भय पूर्वीच्या श्रेष्ठ मनांस पडलें. त्यांनीं विवाहपद्धतीस देववेल तितकें धर्मस्वरूप दिलें. हें स्वरूप देणें समाज हितासाठीं आवश्यक होतें. विवाह पद्धति बदलत बदलत सुधारत सुधारत स्थापली गेलेली आहे. देव ब्राह्मण आणि अग्नि यांच्या समोर पतीस शपथा घेण्यास लावणाऱ्या आज्ञा ही पण याच वेळीं दिल्या गेल्या. या आज्ञांनीं स्त्रिया आणि पुरुष यांचें नुसत्या व्यवहारांतच ऐक्य होत नसून पारमार्थिक ऐक्यही स्थापन करण्याकडे यांचें धोरण आहे. गृहस्थाश्रमांतील पुरुषांस घालून दिलेलीं नित्यकर्में व विधुरावस्थेंतील नित्यकर्में यांत फरक आहे. तसेंच स्त्रियांना सवर्णा सहधर्मचारिणी हें पद आहे. त्यांचीं वैधव्यपणांतील कर्में निराळीं विहित आहेत. एक स्त्री असून दुसरी केली असतां तिची धर्मदृष्ट्या योग्यताही कमीच आहे. तिला कामार्थ भार्या अशा हलक्या वचनांनीं शास्त्रें म्हणतात हें वर सांगितलेंच आहे. कन्यादान अद्यापिहि प्रथम विवाहांतच करतां येतें. ज्या शपथांचें दान प्रथम विवाहांत आहे तें पुढें नाहीं हें सर्व श्रुतच आहे. याप्रमाणें आपल्या पूर्वजांनीं ही विवाहग्रंथी धर्मसूत्रानुसार निर्माण केली आहे. हीं स्त्रीपेक्षां ही पुरुषासच अधिक जखडलेलें आहे. पुरुष अधिक प्रबल असल्यामुळें हीं सर्व बंधनें त्याच्यावर लादणें भाग होतें. शास्त्रकारांना आरंभापासूनच गर्भधारण मीमांसा पूर्णपणें अवगत होती यांत संशय नाहीं. गर्भाशयांत एक प्रकारचा ठसा एक वार बसतो. तो असला म्हणजे सर्व संतति तदनुरूप होते. यामुळेंच सर्व भावंडें एकसारखीं दिसतात. यामुळेंच पति मृत झाला असतांही ज्या जातींत स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची चाल आहे त्या जातींत अन्य पतीपासून झालेली संतति कधीं कधीं पूर्वीच्या मृत पती प्रमाणें दिसत असते. [illegible] भृंग होतो तो तरी याच कारणामुळें होतो. गर्भधारिणी तीव्रसंवेगानें ज्या वासना होतात त्यांचा परिणाम संततीच्या रूपावर आणि स्वभावावर होतो हा अनुभव आहे. गर्भधारिणी खेंकडे खाण्याची सारखी उत्कंठा एका स्त्रीस होती ती तृप्त झाली नाहीं मूल न होतां आईस खेकडा झाला. कवि [illegible] गर्भांत असतां त्याच्या आईस काय चमत्कार दिसला व पुढें त्याचें सारखें स्मरण ठेवल्यानें त्या प्रकारचें कवित्व आलें हें श्रुतच आहे. भारतांत अभिमन्यु गर्भांत असतां व्यूहभेदनाची अपूर्ण विद्या त्यास कशी मिळाली हें सर्वांस ऐकून तरी माहीतच आहे. "मुलांचीं कर्में डोहाळ्यावरून" ही सिद्धांतरूपी म्हण आपल्यांत प्रत्येक मुखीं आहे. यासाठींच [illegible] स्त्रियांचे डोहाळे पुरविण्याबद्दल आणि गरोदरणींचीं मनें न दुखवील असा त्यांवर कायमच परिणाम न होईल अशी आपण खबरदारी घेत असतों. हा विषय स्वतंत्र रूपानें लिहिण्यासारखा आहे. या विवाह पद्धतीच्या संक्षिप्त इतिहासांत तो विस्तृतपणें देतां येण्यासारखा नाहीं.

पूर्वीच्या विवाह पद्धतींत प्रथम स्त्रियांस स्वैराचरण, नंतर आजन्म परस्पर साहचर्य बंधन आणि नंतर तें बंधन दृढतम करण्यासाठीं व त्यापासून अन्योन्य सुख प्रीती साठीं नियम आणि आज्ञा अशी क्रमाक्रमानें उत्क्रांति होत गेलेली दिसून येते.

एकवार एकत्र झालेल्या जोडप्यांत प्रेमवृद्धि दिवसेंदिवस होत जाऊन "हृदयमेव जानाति प्रीतियोगम् परस्परम्" अशी त्यांच्या जोडप्याची स्थिति होऊन संतति प्रेमज व्हावी व तिच्याद्वारा समाज व देश कार्य घडावे असें या नियमांचें धोरण होतें. या प्रीतियोगास अंशतः कितीही पर्यायानें कमीपणा आणणारे सर्व आचार आणि प्रचार नुसते त्याज्यच नव्हेत तर ते जोरानें बंद च पाडले पाहिजेत. ज्या स्त्रिया अन्य पुरुषांस गुरु करितील त्यांस तें करूं देऊं नये व जे गुरु स्त्रियांना गुरु पाहिजेत होऊं शकत नाहीं असें म्हणत असतील ते परमस्वार्थी ही, शास्त्रद्रोही ही, आणि निजलाभासाठीं किंवा स्वार्थपरायणतेसाठीं अंध झालेले अधम होत. असेंच या सर्व इतिहासावरून सहजानुमान निघतें. पुरुषाचा स्वभाव अत्यंत मत्सरी आहे हें वर सांगितलेंच आहे. पत्नीचें सर्वस्व आपल्यावर अवलंबून आहे हें त्यास बाणावें; बीजसंकर होण्याची भीतीच राहूं नये; व उभयता पतीपत्नीचा शक्तिका एक भाव व्हावा म्हणून मनूनें पुनर्विवाहाचा पूर्ण निषेध केलेला आहे. नारद वशिष्ठ आणि इतर शास्त्रकार विधवापुनरुद्वाहास अनुकूल आहेत.

---

## शेतकी व बागाईत

हें एक छोटेंसें पुस्तक रा. रा. अंतीजी दामोदर कोळे यांनीं स्वतःच्या अनुभवानें व दीर्घकालच्या व्यासंगानें तयार केलें आहे. यांतील भाषा अगदीं साधी व बालबोध असून कांबीबियांच्या माहितीनें जंत्री सारखें हें दिग्दर्शन आहे. या पुस्तकाबद्दल पुणें मुंबई कडील पत्रकारांचे अभिप्राय चांगले पडलेले आहेत. इतर अशा विषयावरील पुस्तकापेक्षां या पुस्तकांत खालील बाबींचें वर्णन विशेष मननीय व प्रयोग करून अनुभवण्यासारखें आहे.

१ केंबोडा पासून खत कसें काढावें?
२ खाड्यांत ओलें गवत कसें सांठवावें ?
३ अल्यापासोनें सोनखत कसें तयार करावें?
४ गुसव्या मुनाचा उपयोग काय ?
५ आंब्यांचीं जंगलीं झाडें कायम ठेवून त्यांचीं कलमीं झाडें बनविणें.
६ खुंटी जगली म्हणजे मूळ झाड तोडून टाकावें लागतें. मग ती खुंटी मोठी होण्यास ५।६ वर्षें लागतात. या साठीं झाड कायम ठेवून खुंटी कशी मारणें ?
७ आंब्यांचे छोटे झाडावर न बांधतां कलमा द्या फांद्या आणून त्यांचीं कलमें कशीं करणें ? या पद्धतीनें १।१।२ वर्षांत भिन्न पैशानें शेंकडों कलमें करतां येतात. कलमें विकत घेण्यापेक्षां सर्व लागवडीचे पैसे वांचतात व कलमी झाडें ४।५ वर्षांत शिपीवीं लागतात. तशीं हीं शिपींचीं लागत नाहींत.
८ आंब्यांचें मोठें झाड तोडून तें दुसरीकडे कसें लावावें ?
९ कलमी आंबे ६ महिने पर्यंत कसे टिकवावे ? मवांत ठेवण्यास खर्च फार लागतो हें पुष्कळांस माहीत असेलच.
१० आंब्यांचें फळ लहान झालें तर तें पूर्ववत मोठें होण्यास काय करावें ? कोकंब, डांडीकर, चिकू, साखळे, पेरु, बोर, महाळुंग, लिंबु, संत्रा, [illegible] वगैरे संबंधानें यांत माहिती आहे.

निदान ५ प्रतींचा आश्रय देणारांस बागाईतासंबंधीं सल्ला फुकट दिली जाईल. १० प्रती घेणारांस अल्प फी घेऊन वारंवार सल्ला दिली जाईल. २५ प्रती घेणारा कडून कांहीं एक न घेतां त्यांस नेहमी फुकट सल्ला दिली जाईल. पुस्तकाची किंमत ८ आणे ठेविली आहे.

वरील मजकूरा वरून हें पुस्तक [illegible] व सुखवस्तु लोकांच्या पुस्तकालयांत अवश्य संग्रहणीय आहे हें निराळें कळविण्याची गरज उरली नाहीं.

---

## पैसा फंड

या नामांकित फंडाचे उत्पादक रा. रा. अंतीजी दामोदर कोळे हे १८।११।१९१४ च्या वेळीं आकोल्यास आले होते व त्यांचा हेतु पैसा फंडा संबंधानें लोकमत उत्तेजित करण्याचा असा होता तसाच त्या फंडाच्या मदतीनें तळेगाव [दाभाड्याचें] येथें चालविलेल्या कांचेच्या कारखान्यासंबंधानें लोकांस माहिती देऊन त्याच्या पुढील सालापासूनच्या व्यवस्थेबद्दल लोकमत बनविण्याचाही होता. येथील जाहिर सभेंत त्यांनीं जी हकीकत सांगितली ती विशेष उपयुक्त व मार्गदर्शक असल्यावरून आम्ही खालीं प्रसिद्ध करीत आहों:—

प्रथम त्यांनीं कांचेचा इतिहास सांगितला. १८६५ सालीं बंगाल्यांतील एका मुलाच्या डोक्यांत ही कल्पना आली. वर्तमानपत्राद्वारें ती महाराष्ट्रांत आली. रा. रा. जोशी राहणार वसई यांनीं पहिला प्रयत्न १८७१।७२ च्या सुमारास केला. त्यानंतर रा. रा. ओक, रिसबूड, पटवर्धन, गुर्जर ठाकूर, भट वगैरे अनेक गृहस्थांनीं लोकमत जागृत करण्याचा यथाशक्य प्रयत्न केला. परंतु म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं. रा. रा. सामंत हे महाड येथें [illegible] असतांना त्यांच्या मुळें या प्रश्नाला मात्र थोडें थोडें [illegible] आलें. पुढें त्यांनीं प्रयत्न सोडला. याचें कारण काय तें कळत नाहीं. पण सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांस तांकीद दिली असेल असा तर्क आहे. १८९६ सालीं दुष्काळ पडला. दुष्काळ कां पडतो या संबंधानें विचार करतांच १८९९ सालीं भयंकर दुष्काळ पडला. एक दोन प्रसंग फारच विलक्षण दिसले. दयाळू सरकारानें आपल्याकडून पराकाष्ठा केली. ११ कोट रुपये खर्च ही केले. त्या वेळीं मी लखनौस राष्ट्रीय सभेसाठीं गेलों होतों. येतांना उज्जनी, बऱ्हाणपूर वगैरे मुक्कामीं गरीब लोकांचे हाल मी स्वतः पाहिले. बुभुक्षित लोकांना अन्न दिलें तरी त्याचा उपयोग कितीच होई. सुवर्ण भूमीच्या लोकांवर असा प्रसंग कां आला याचा विचार केला तेव्हां देशांत धंदे नाहींत हेंच याचें कारण होय असें वाटलें. परदेशींतील कल्पक लोकांनीं हुन्नर केल्या साहाय्यानें अनेक तऱ्हेच्या वस्तु बनविल्या व त्या आम्ही डोळे मिटून घेतल्या यामुळें पुष्कळ पैसा बाहेर गेला. भांड्याला पुष्कळ छिद्रें असलीं तर त्यांतून पाणी बाहेर जाणारच. कच्चे पदार्थ विकून जे पैसे येतात त्याच्या कितीतरी पट पैसे बाहेर जातात! या वेळीं त्यांनीं उपरण्याचा कापूस किती किंमतीचा व त्यांचें कापड किती किंमतीस घ्यावें लागतें, हें स्पष्टपणें सांगितलें. पुढें ते म्हणाले आपल्या देशांत कच्चे पदार्थ पुष्कळ आहेत. त्यांचे पक्के पदार्थ आपणास तयार करतां येत नाहींत. बाहेर विद्यार्थी पाठविले तर त्यांस प्रयोग शिक्षण मिळत नाहीं. रा. रा. [illegible] यांचें उदाहरण जगप्रसिद्ध आहे. या अडचणी दूर करण्यासाठीं पैसा फंड आहे. ३० कोटी पैकीं लहान डोक्याचे, मध्य मेंदूचे, दोन पायांचे २६ कोट लोक वजा केले तर बाकी ४ कोट राहतात. यांनीं वर्षाचा एक पैसा दिला तरी ६ लक्ष रुपये जमतील. मग चार आठ आणे दिल्यावर किती फंड जमेल याचा विचार करा. कल्पना इतकी चांगली असतां तिचा प्रसार कां होत नाहीं. याचें कारण शोधून काढणें जरूर नाहीं काय? या नंतर कमिटीनें कांचेचा धंदा पसंत केला, गारगोटीचा सुकाळ म्हणून तळेगांवीं कारखाना काढला. ईश्वरदास व जपानी नोकर ठेवून काम सुरु केलें वगैरे मनोरंजक हकीकत सांगितली. मग मुलांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ पाण्याप्रमाणें पैसा खर्च केला पण त्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं, याचें कारण रा. रा. करंदीकर अकस्मात वारले हेंच होय. असें ही त्यांनीं सांगितलें. उत्पन्न थोडें व खर्च पुष्कळ म्हणून तो कारखाना मि. ईश्वरदास यांस चालविण्यास ५ वर्षांची मुदत ठरली. ३० हजार रुपयांवर ३ टक्के नंतर ४ टक्के प्रमाणें त्यानें व्याज दिलें. तेथें तयार झालेल्या १०।१२ मुलांपैकीं ३ बडोदें येथें रा. दंडवते यांच्या कारखान्यांत आहेत. २।३ कुंडल रोड येथें औंध सरकारच्या साहाय्यानें निघालेल्या कारखान्यांत आहेत. १ शिष्यवृत्ति मिळवून परदेशांत उच्च शिक्षण मिळविण्याकरितां जाणार आहे. ३।४ मुलें रिकामीं आहेत. येत्या फेब्रुवारी अखेर भाड्याची मुदत संपत आहे. हा कारखाना आपल्या ताब्यांत यावा. २६ हजार रुपयांचें ५ टक्के

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

उलटी, झाडा, संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं० ३३७



वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दांस मर्द बनविणारी

## राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० देड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

## राजवंशी सांध्याचें तेल,

किंमत रुपये ९ देड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० १९



मागालिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरितां

सेंटचाराजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥|- व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डे दिलचमनचीं दर डझनास रु. -॥|- "

सेल एजन्ट्स. एच, आर. मादा आणि कं.

नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.



# Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRO RES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 8 668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4.68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6.81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 3136,421 | 1.41,32356 |
| 1903 | 41,07,009 | 2,1[illegible],95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—


*M. deSOUZA,*

CHIEF AGENT,

*C. P. Berar & Khandesh, NAGPUR*



सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळे व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षवातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणांची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१|. टपालखर्च -|- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरा घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक-- डा. गोतमराव केशव, आणि सन्‍
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २.

ना० न० १११


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २८ माहे डिसेंबर सन १९१४ ई० [ अंक ४०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हाग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व $१\frac{१}{२}+१\frac{१}{२}$ गज ६ ते १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ४५३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २१$\frac{१}{२}$ तोळे असतें.

मुंबई बँक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट

नो० नं०

### जाहिरात

#### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयेप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं ४

---

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना
ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी,
ठि: पान्या पेळचा नाका, चिपणलालमहागजांचे मंदार भुलेश्वर -- मुंबई.
एकच भाव! ! एकच भाव! !
अट सुरंगी आमचेकड मिळणारा
माल ओळ सुरंगा

अत्तरें - गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुवाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केवर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६रु.

तेलें.- चमेली, बेलिया, मुमुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास १ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस २ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उदणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिल्लिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, खंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, बुटें व वेणींचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ४१३

---

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २९

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

#### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८०

#### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

#### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ७

---

## डायरी बक्षीस!!

(१)खरे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ०६. (२)खरे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ०६. [३) धर्मपद, किंमत ०४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ०५. (५) विदग्धवाङ्मय, किंमत ०३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ०२. (७) मुक्तास योद्धा उपदेश, किंमत ०८. (८) वाल्मीकीचा जप, किंमत ०८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ०१२. (१०) शिवलीलामृत किंमत ०८. या यादींपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील म्हणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बाइंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.

नो. नं. ४९४

---

श्रीगजानन

### जाहीर खबर

#### विक्रीस तयार

अकोले येथील सील्हील स्टेशनांतील गवती बंगला सभोंवताल्च्या विस्तीर्ण बगीच्या सुद्धां ज्यास हल्लीचा जुना गवती बंगला म्हणतात ता.

जयमंगीच्या धर्मशाळे जवळील धान्य साठविण्याचा कोठा.

ज्याची मर्जी दोन्ही मिळकती अगर या पैकीं एखादी घेण्याची इच्छा असेल त्यानें खालीं सही करणार यांज कडेस बोलणे करावे. अकोले तारीख ३।१२।१४

सही

देवराव विनायक

नो. नं. ४१७

---

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः — श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची पाकोंनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीं मिळून किंमत रु. १ व्ही. पी. ०१०६




सर्वत्र एजन्टस पाहिजेत

पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी

नो. नं. ६

---

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, सोप, पेपरमिंट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, कि० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतिम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपेण; व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ व 'दिकखुप' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येता पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० सु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे कि० तोळ्यास २ रु०

पत्ता - श्री० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

## प्रदर्शन.

पिंपळगांवदेवी तालुका मलकापूर जिल्हा बुलडाणा येथें होणारे जनावराचे व शेतीच्या पदार्थांचें प्रदर्शन आणि वऱ्हाडी व परदेशी नागराची शर्यत

—:*:*:--

हें प्रदर्शन तारीख ४।५।६ जानेवारी सन १९१४ पर्यंत खुलें ठेविलें जाईल. त्यांत खालीं दिलेप्रमाणें बक्षिसें दिलीं जातील परंतु वर्गणी जशी जमेल त्या मानानें तीं ज्यास्त केली जातील. बुलडाणा जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शेतकरी लोकांनीं आपापलीं उत्तम जनावरें आणावीत.

### बक्षिसाचा तपशील

#### जनावरांबद्दल

भाग १ बुलडाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापर्यंत शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें पाहिलें रुपये | दुसरें रुपये | तिसरें रुपये |
|---|---|---|---|
| १ अवलाद वेण्यायोग्य उत्तम गोऱ्हे | १५ | १२ | ८ |
| २ उत्तम बैलांची जोडी | १० | ६ | ५ |
| ३ पीतनसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | १० | ८ | ५ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आंतील उत्तम गोऱ्हा | १० | ८ | ५ |
| ५ सर्वांत ज्यास्त दूध देणारी गाय | २० | १५ | ४ |
| ६ दुधाची बकरी | ५ | ३ | १ |
| | ७० | ५२ | २८ |

भाग २ बुलडाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापेक्षां जास्त शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्ग | बक्षिसें रुपये |
|---|---|
| १ अवलाद वेण्यायोग्य उत्तम गोऱ्हे | १५ |
| २ उत्तम बैलाची जोडा | १० |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षाचे आंतील उत्तम कालवड | ८ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आंतील उत्तम गोऱ्हा | ८ |
| ५ सर्वांत जास्त दूध देणारी गाय | १५ |
| ६ दुधाची बकरी | ४ |
| | ६० |

धान्याचे नमुन्याबद्दल दोन्ही प्रकारचे किरसानी लोकासाठीं.

| वर्णन | बक्षिसें पाहिलें रुपये | दुसरें रुपये |
|---|---|---|
| उत्तम रोझीया कापुस………. | ५ | ३ |
| " जोंधळा (ज्वारी)…….. | ५ | ३ |
| " गहू………………… | ४ | २ |
| " हरबरा (चणा)…….. | ४ | २ |
| " तिळ [पांढरा]…….. | २ | १ |
| " जवस [आळशी]…….. | २ | १ |
| " तंबाखु …. …. …. …. | २ | १ |
| " मिरची …. …. …. …. | २ | १ |
| | २६ | १४ |

प्रत्येक नमुना तीन शेरापेक्षां कमी नसावा. नांगराच शर्यतीसाठीं बक्षिसांची रकम ९० रुपये ठेविली आहे. एकूण बक्षिसांची रकम २०० रुपये आहे. बुलडाणा तारीख १० माहे नोव्हेंबर सन १९१४ इ.

Sd/ K. S. Jathar.
डेप्युटी कमिशनर जि. बुलढाणा

## आठवें महाराष्ट्र साहित्यसंमेलन.

(वेळ बदलली.)

हें संमेलन येत्या एप्रिलमध्यें ईस्टरच्या सुट्टींत मुंबईस भरण्याचें ठरून त्याप्रमाणें सर्वत्र जाहीर करण्यांतही आलें होतें. परंतु त्याच वेळेस उमरावतीस 'प्रांतिक सामाजिक परिषद्' भरण्याचें ठरलें आहे, त्यास विरोध येऊं नये अशी विनंती करण्यांत आल्यावरून साहित्यसंमेलन शिमग्याच्या सुट्टींत भरवावें असें आतां साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळीनें ठरविलें आहे.

(लेखकांस विनंती.)

संमेलनासाठीं नेमलेल्या विषयांवर ज्यांस निबंध पाठवावयाचे असतील त्यांनीं ते जानेवारी १९१५ अखेर परिषदेच्या चिटणिसांकडे पाठविण्याची कृपा करावी. लेख धाडण्याविषयीं सर्व लेखकांस स्वतंत्र विनंतीपत्र जाणें शक्य नसल्यामुळें त्यांनीं हेंच विनंतीपत्र समजावें, अशी विनंती आहे.

संमेलनाची नक्की तारीख मागाहून प्रसिद्ध करण्यांत येईल.

रामकृष्ण र. मोरमकर,
वासुदेव गोविंद आपटे,
चिटणीस, महाराष्ट्रसाहित्यसंमेलन.
८१ फणसवाडी, मुंबई नं० २.

## जाहीरात

पाहिजे— न्यु इंडिया इन्शुरन्स ब्यांकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि खानदेशभर हुषार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल विशेष माहिती करितां खालील पत्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट
न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड
नो नं ४५०

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-

The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road, - Bombay
No. No.421

## ब्रह्म विद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ५ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस वेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ याचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधी प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ४७२

## विनंती पत्र.

मराठा— शिक्षण – परिषदेची आठवी बैठक पुणें येथें तारीख २७, २८, २९ डिसेंबर सन १९१४ रोजीं भरणार आहे. अध्यक्षस्थानीं श्रीमंत महाराज मल्हारराव बाबासाहेब पवार देवास धाकटी पाती यांची बहुमतानें निवड करण्यांत आली आहे. तरी सर्व ठिकाणच्या मराठे बंधुंनीं पुणेंकर मराठा बांधवास शक्य ती मदत देऊन परिषदेचें कार्य तडीस न्यावें अशी सविनय प्रार्थना आहे.

परिषदे पुढें विचारासाठीं मांडावयाच्या विषयाबद्दल सूचना व ज्या कोणास निबंध वाचावयाचे असतील त्यांनीं आपले निबंध शक्य तितक्या लवकर पाठविण्याबद्दल विनंती आहे. आपले नम्र

गोविंदराव कृष्णाजी पा० बोत्रे
लक्ष्मणराव बापुजी शिंदे बी. एजी.
गंमाजीराव मुकुंदराव काळभोरे
सेक्रेटरीज् स्वागत मंडळ.

## नोटीस

जोहरमल कस्तुरचंद व दगडुलाल हजारीलाल अ० पा० क० चुलता जोहरमल कस्तुरचंद मारवाडी रा० आलेगांव ता० बाळापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आह्मांस वऱ्हाड समाचार छापखान्यांतून ता० २९।७।१४ इ० रोजीं नोटीस दिली व त्यांत लिहिले कीं आह्मी तुह्मास ता० १० जून १९१४ इ० रोजीं २००० रु० चे गहाणखत पुर्वीचे गहाणखतांचा हिशोब करून लिहून दिलें व त्यावेळीं आमचे जवळ वसूलाची पावती नसलेकारणानें तुह्मी आपल्या वहीत पाहून ४५ रु० वसूल लावीले व हिशोब करून नवीन गहाणखत करून घेतलें. हल्लीं ती पावती सापडली असल्यास त्याजवरून चुक मुल देण्या घेण्यांस तुह्मी तयार आहा. तुमची नोटीस पोंचल्यावर कांहीं दिवसांनीं आमची पावती ता० १९।१२।११ इ० चीं तुमचे सहीची सापडली व ती आह्मी तुमचेकडे घेऊन गेलो व त्याप्रमाणें रु ६९८९ ची दुरुस्ती करून मागितली व सदरहू रु० ६९८९ आह्मास रोख द्यावे अगर नवीन गहाणखतांत मजरा घेतल्या बद्दल वहीत हिशेब करावा असें ह्मटले तेव्हां तुह्मी फक्त रु० ४५ वजा जाऊन बाकीचे रु० २४८९ नवीन वसूल घेण्याचे कबुल केले परंतु हे तुमचे ह्मणणे गैरवाजवी आहे कारण तुह्मी आपल्या नोटीशींत वसुल रु० ४५ दिले हें मुद्दलांतील आहेत. व पावतींतील रु० ४५ हे त्याशिवाय असून व्याजांतले आहेत व तुह्मी तुमचे सहीचे पावतींतिही तसेंच लिहिले आहे. तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आह्मास रु० ६९८९ व ते दिल्यापासून ह्मणजे ता० १९।१२।११ पासूनचें व्याज असे आह्मास द्यावे व पावती घ्यावी. कळावे आज ता० १९।१२।१४

सही
रामु वा। परशराम माळी
इंगळे नि० खुद
नो० नं० ४८०

## नोटीस

रा. रा. किसन वल्लद मुकाजी पाचपवार राहणार ह्मसांग ता० आकोला पेठ बोरगांव यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं माझी बायको नामें प्रयाणी ही तुमची सावत्र मुलगी असून तुमच्याच घरीं रहात आहे ह्मणून तिला आणण्यासाठीं गांवकरी चौघेजण इसम घेऊन मी तुमच्या घरीं ता. ९ डिसेंबर रोजीं ह्मसांगास आलो होतो तेव्हां तुह्मी चांगल्या नांदणुकीसंबंधानें मला ह्मणाला कीं नांदणुकीची चिठ्ठी लिहून दे ह्मणजे मग तुझ्या बायकोला पाठवितो. असें ह्मणण्याच्या खरेपणासाठीं तह्मी तुह्मी माझ्या बायकोला माझ्या गाडींत आणून बसविलें व मला आकोटकर अप्पासाहेब कुळकर्णी यांच्या घरी नांदणुक चिठ्ठी लिहून देण्यासाठीं मला नेऊन गेला. तेथें कागद लिहिला व त्यावर टिकीट चिकटवून माझा आंगठाही तुह्मी घेतला. मी तेथून गाडीवर परतून येऊन पाहतो तर बायको गाडींत नव्हती. तेव्हां तुह्माला तिला पाठविण्यासाठीं ह्मटलें तर तुह्मी लबाडीचा जबाब दिला कीं ती आतां आमच्या ताब्यांत नाहीं. मी तिला कडतखेड्याच्या विठोबाच्या हवालीं केली आहे. मी विठोबाला विचारलें तर तो ह्मणेकीं मी धाडीत नाहीं. त्यावरून मी आकोटकर आप्पासाहेबाकडे गेलो व नांदणुक चिठ्ठी परत मागितली तर ते ह्मणाले कीं आह्मी ती फाडून टाकली या रीतीनें तुह्मी दगलबाजीनें मला फसविलें व माझी बायको लपवून ठेविली आणि आकोटकराच्या मदतीनें तुह्मी नांदणुक चिठ्ठीची खोटीच बतावणी केली असली पाहिजे असा संशय मला व माझ्या बरोबरीच्या चौघेजणास येत आहे. तुह्मी ही नोटीस पोंचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत माझ्या घरीं माझी बायको आणून पोचती करावी. असें करण्यास चुकाल तर तुह्मावर व तुमच्या साथीदारावर फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल. कळावें. ता० २१।१२।१९१४ इ०

सही
जगू वा। भगवान धनी गहणा
धांडस रामागड ता० दर्यापूर यांच्या
हातची निशानी रेघ दस्तुर मारोती
रामचंद्र रेलकर मु० आकोला
नो० नं० ४८४

वऱ्हाडसमाचार

मिति पौष शु॥ ११ शके १८३६

## हिंदुस्थानचें संरक्षण.

मध्यंतरीं एमडेन क्रूझरनें घातलेल्या धुमाकुळानें सरकारचें व लोकांचें लक्ष हिंदुस्थानच्या संरक्षणच्या तजविजीकडे विशेष लागलेलें आहे. अशावेळीं हिंदुस्थानच्या रक्षणाच्या काय तजविजी आहेत व त्याप्रीत्यर्थ किती खर्च होत आहे याविषयीं नुकत्या प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांतून दिलेली पढील माहिती बरीच बोधप्रद होइल असें वाटतें. लष्करी खात्याचें उत्पन्न एकंदर हिंदुस्थानच्या उत्पन्नाचा शेंकडा २ इतका भाग आहे. हें उत्पन्न ह्मणजे डेअरी फार्म, स्टोअरचें शिलकी सामान विकून येणारे पैसे, निरुपयोगी झालेले घोडे, खेचरें, गाड्या वगैरेंच्या लिलांवापासून होणारें उत्पन्न वगैरे किरकोळ बाबी आहेत. लष्करी खात्याचें उत्पन्न विशेषसें हिशेबांत धरण्यासारखें नाहीं. येथें खर्च हीच महत्त्वाची बाब आहे. हा खर्च सरासरीनें दरसाल दोन कोटी दहा लक्ष पौंड आहे. ह्मणजे एकंदर हिंदुस्थानच्या खर्चाशीं याचें प्रमाण शेंकडा २७ आहे. यापैकीं २३ कोट रुपये हिंदुस्थानांत खर्च होतात, आणि बाकीचे ह्मणजे खर्चाचा सुमारें एकचतुर्थांश भाग इंग्लंडमध्यें खर्च होतो. खर्चापैकीं शेंकडा ७८ भाग अथवा २६ कोट रुपये फौजेवर खर्च होतो. त्यांत सोजिरांचा पगार व भत्ता मिळून सुमारें १४। कोट रु० सप्लाय व ट्रान्सपोर्ट मिळून सुमारें ३। कोट रु० विलायतेहून येणाऱ्या स्टोअर्स कडे १ कोट, व आर्डनन्स कडे १ कोट रु० असा खर्च आहे. याशिवाय पेनशन, वॉर आफिसला देण्यांत येणारी रकम मिळून सुमारें ३॥। कोट रु० विलायतेस जातात. दर्यावर्दी खात्याचा खर्च दर साल ७० लक्ष रु० आहे. पैकीं ३७ लक्ष रु० हिंदुस्थानांत व बाकीचे ४३ लक्ष विलायतेंत खर्च होतात. यांतच रॉयल इंडियन मरीनचा खर्च व हिंदुस्थानासाठीं हिंदुस्थानच्या व नजवळपासच्या समुद्रांत ठेवलेलीं जहाजें वगैरे बद्दलचा खर्च जो विलायतच्या दर्यावर्दी खात्याला देण्यांत येत असतो त्याचा समावेश केलेला आहे. हिंदुस्थानच्या लष्करी खात्याचा निवळ खर्च गेल्या पांच वर्षांची सरासरी पाहिली असतां दरसाल २९ कोट रुपये होता असें दिसतें. सन १९१२ — १३ सालीं हाखर्च फक्त सुमारें १९॥ कोट रुपये झाला होता. त्याचा दुप्पट चौपट वचपा यंदाच्या सालीं वाढलेल्या लढाईच्या खर्चामुळें निघेल असा रंग दिसतो.

## नोटा व साव्हरिन.

चालू युद्धाच्या आरंभीं लोक घाबरून जाऊन भराभर साव्हरिन खरीद करूं लागले व नोटांला कोणी विचारीनात अशी स्थिति झाली होती. ही स्थिति अंशतः अद्याप कायम आहे, आणि अशा वेळीं करन्सी कंट्रोलर मि० हावर्ड यांच्या रिपोर्टांत केलेल्या विधानामुळें ती बदलेला असा रंग फार कमी दिसतो ही मोठी खेदाची गोष्ट आहे. मि० हावर्ड ह्मणतात कीं व्यापारी वगैरे मंडळ्यांनीं सोन्याच्या नाण्यांत पगाराची वाटणी न करतां नोटांच्या रूपानें ती करावी ह्मणजे नोटांचा प्रसार वाढेल. लोक नोटा घेण्यास हल्लीं कां नाखुष आहेत याच्या कारणाचा विचार केला तर असें दिसतें कीं युद्धामुळें अडाणी लोकांना नोटांपेक्षां सोन्याची शाश्वती अधिक वाटते. अशा वेळीं लोकांची ही अडाणीपणाची समजूत घालविण्यासाठीं व त्यांचा विश्वास स्थिर करण्यासाठीं नोटांचा खप कमी करून सोन्याच्या नाण्यांचा खप वाढविणें हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे. तो सोडून नोटांचा खप वाढविण्याचा उपदेश मि० हावर्ड करीत आहेत हें खास दूर दृष्टीचें नाहीं असें आह्मांस वाटतें.

## शौर्याबद्दल बक्षीस.

थोड्या दिवसांपूर्वीं पंजाबांत सियालकोट येथें भरलेल्या दरबारात पंजाबच्या लेफ्टेनंट गव्हर्नर साहेबांनीं सांगितलें कीं लोअर बारी कालव्यावरील १७८००० एकर जमीन चालू युद्धांत प्रशंसनीय कामगिरी करून दाखविणाऱ्या हिंदी लष्करी ऑफिसरांना व शिपायांना देण्यासाठीं राखून ठेवण्यांत आली आहे. फार उत्तम गोष्ट ! जे शिपाई आपल्या बालकापोरांचा मोहपाश तोडून व साम्राज्याच्या अभिमानानें प्रेरित होऊन हातावर शिर घेऊन लढत आहेत त्यांच्या स्वार्थत्यागाचें चीज करण्याची सरकारची ही योजना सर्वोत्कृष्ट आहे यांत संशय नाहीं, व त्याबद्दल हिंदुस्थानची प्रजा सरकारला धन्यवादच देत राहील. पण या आनंदाच्या बातमीबरोबरच त्यांनीं एक दुसरी बातमी सांगितली आहे ती मात्र खेद व लज्जा उत्पन्न करणारी आहे. ते ह्मणाले कीं आसपासच्या कांहीं जिल्ह्यांतून असंतोषाचा प्रसार करण्याचा यत्न कित्येक लोकांनीं चालविला आहे. हा प्रयत्न बाहेरील प्रांतांतून आलेले लोक करीत आहेत. लेफ्ट. गव्हर्नर साहेबासारख्या बड्या अधिकाऱ्याच्या शब्दावर अविश्वास करण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण असे अधिकारी निराधार विधान कधीं करावयाचे नाहींत. पण सांप्रतच्या काळीं सगळ्या हिंदुस्थानभर राजनिष्ठा व साम्राज्याभिमान यांची नौबत वाजत असतां व या नौबदीचा गंभीर नाद युरोपापर्यंत जाऊन पोंचला असतां त्या नादांत असंतोषाचा बेसूर ध्वनि मिसळला जावा ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. अशी शंका येते कीं सध्या जर्मनीचे गुप्त हेर हिंदुस्थानांत अशांति फैलावण्यासाठीं साऱ्या हिंदुस्थानभर पसरले आहेत अशा प्रकारचें विधान खुद्द व्हाइसराय साहेबांनीं तुर्कस्थानशीं लढाई सुरू होण्याचे वेळीं केलें होतें त्याच्याशीं तर या गोष्टीचा संबंध नसेलना ? कांहीं ही कारण असो, हिंदुस्थानची प्रजा ब्रिटिशसाम्राज्याशीं कधीं बेइमान होणार नाहीं ही गोष्ट आतां सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे आणि असंतोषाचा फैलाव करण्याचे यत्न कोणीं चालविले असले तरी त्या प्रयत्नांना कधीं यश यावयाचें नाहीं अशी हिंदुस्थानच्या प्रजेतर्फे आह्मी सरकारची खातरजमा करतों. बंगालचे बाँब किंवा अमेरिकेच्या रायफल बंदुका हिंदुस्थानला आपल्या राजनिष्ठेपासून कधीं भ्रष्ट करणार नाहींत अशी सरकारनें पूर्ण खात्री ठेवावी.

## देशसेवेचा आठवडा.

चालू आठवडा— डिसेंबर महिन्याचा अखेरचा आठवडा— याला देशसेवेचा आठवडा हें सार्थ नांव देतां येईल. कारण या आठवड्यांत हिंदुस्थानांतल्या सुशिक्षितांना देशसेवेचें स्फुरण चढत असतें. वर्षाच्या बाकीच्या एकावन आठवड्यांत जरी ते आपापल्या उद्योग धंद्यांत चूर होऊन देशसेवेची उपेक्षा करीत राहिले, तरी या आठवड्यांत स्वदेशोन्नति, धर्मोन्नति, औद्योगिक उन्नति, राजकीय उन्नति वगैरे, उच्च तत्त्वांचा पाठ ते तोंडानें घडघडा ह्मणूं लागतात. शाळेंतले विद्यार्थी जसे वर्षाचे बाकीचे दिवस आपल्या कर्तव्याची उपेक्षा करून नाटकें, खेळ, गप्पासप्पा यांत कालक्रमणा करीत राहिले, तरी परीक्षेच्या अगोदर कांहीं अंगांतला आळस पूर्णपणें झाडून टाकून व रात्रीचा दिवस करून आपल्या अभ्यासांतली उणीव भरून काढण्याचे कामीं विलक्षण तत्परता दाखवितात, त्याप्रमाणें आह्मा सुशिक्षित डिसेंबर महिना अर्धा होऊन गेल्यावर देशाविषयींच्या कर्तव्य संपादनासाठीं खडबडून जागे होतों, आणि राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद किंवा धर्मपरिषद यांच्या बैठकी यंदाचे सालीं कोठें भरावयाच्या आहेत, व त्या बाजूला प्रेक्षणीय स्थळें किंवा तीर्थें कोणकोणतीं आहेत त्यांच्या तपासाला लागतों. असा ही राष्ट्रीय कर्तव्यतेची जागृति करून देणारा आठवडा ह्मणजे डिसेंबरचा शेवटचा आठवडा आतां येऊन पोंचला आहे. लोक कांग्रेस जिवंत आहे कीं मेली, व जिवंत असल्यास ती दरसाल प्रमाणें कन्व्हेनशन कांग्रेस होणार आहे कीं मुक्तद्वाराची कांग्रेस व्हावयाची आहे याविषयीं चौकशी करावयाला लागले आहेत. तथापि यंदाच्या कांग्रेसपुढें कोणकोणते विषय यावयाचे आहेत, व त्या विषयांच्या चर्चेंत आपण कोणत्या प्रकारची भर टाकावयाची, याविषयींचें स्वप्न अद्याप फारच थोड्यांना पडलें असेल. जी गोष्ट कांग्रेसविषयीं तीच या आठवड्यांत भरणाऱ्या इतर परिषदांविषयींही ह्मणतां येईल. चालू सालांत समाजानें कोणकोणत्या बाबतींत प्रगति केली व तिला आपण किती मानानें कारण झालों असें आत्मपरीक्षण करून पाहण्याची सुबुद्धि यंदा सामाजिक परिषदेला जाण्यासाठीं निघालेल्या किती गृहस्थांना झाली असेल तें परमेश्वरास ठाऊक! औद्योगिक परिषद किंवा एकेश्वरी मताची धर्म परिषद या संस्थांनींही वरील वर्णनाला अपवाद काय ह्मणून व्हावें! या सर्व अनास्थेच्यापायीं आमच्या राष्ट्राची प्रकृति ही आहे. आमच्या देशांत थोर पुरुष प्रत्येक प्रांतांत थोडे बहुत तरी आहेत, पण थोर संस्था नाहींत, याला कारण आमची प्रकृतिगत अनास्था तर खरीच, पण त्या बरोबरच दुसरीं ही कित्येक विचार करण्या सारखीं कारणें आहेत यां कारणांपैकीं मुख्य कारण अहंभाव हें आहे. मला किंवा माझ्या दैवतेला अध्यक्षस्थान अर्पण करीत असल तर कांग्रेस ही पाहिजे, नाहींपेक्षां ती फुटून तिचा नाश झालेला पाहण्याइतका आनंद मला दुसऱ्या कशानें ही होणार नाहीं, अशा प्रकारचे उद्गार काढणारांना जोंपर्यंत देशाभिमान्यांत गणण्यास आमचें राष्ट्र तयार आहे, तोंपर्यंत ही स्थितिच कायम राहणार. तों पर्यंत सामाजिक परिषद ह्मणजे शाब्दिक लपंडावाचें समरांगण आणि धर्मपरिषद ह्मणजे सर्वबंधुत्वाचें सोंग घेऊन मिरविणाऱ्या भाऊबंदकीची वरातच होणार यांत काय आश्चर्य आहे! सामान्य जनतेची ही स्थिति अत्यंत शोचनीय आह यांत शंका नाहीं. तथापि त्यांतल्या त्यांत ज्यांनीं कांग्रेससारख्या संस्थेचें भयंकर वादळांतून मोठ्या धैर्यानें आज सात आठ वर्षें मोठ्या चातुर्यानें रक्षण केलें, ज्यांनीं न्या. मू. रानडे यांच्या मागें सामाजिक परिषदेला निदान जिवंत ठेवण्याचें तरी श्रेय मिळविलें, ज्यांनीं औद्योगिक परिषदेसारखी संस्था निर्माण करून ती कशी बशी तरी आज कित्येक वर्षें चालवून औद्योगिक प्रश्नांची शाब्दिक चर्चा तरी कायम ठेविली व ज्यांनीं एकेश्वरी मताचा लोप या भरतखंडात न होऊं देण्याची थोडीशी तरी खटपट चालविली, त्यांच्या धैर्याची, त्यांच्या कर्तव्य जागृतीची, त्यांच्या थोड्या बहुत स्वार्थत्यागाची अगदींच विस्मृति होऊं देणें हा अन्याय होईल. या संस्था अशा अल्प संख्यक देशसेवकांमुळेच आज आसन्नमरण स्थितींत कां होईना, पण जीव धरून आहेत. या संस्थांच्या देहांत जीव आहे ह्मणूनच भावी उन्नतीची थोडी बहुत तरी आशा वाटण्यास जागा आहे. या संस्था टिकविण्याच्या मुळाशीं थोडीसा तरी स्वार्थत्याग व कर्तव्यनिष्ठा या गुणांचा लेश आहे, ह्मणूनच राज्यकर्ते व इतर राष्ट्रें आह्मांला माणसें तरी समजत आहेत हें विसरतां कामा नये. असो. आहे ही स्थिति एका आठवड्यांत किंवा एका वर्षांत पालटणारी नाहीं. ती हळूं हळूंच बदलत जाणारी आहे. तेव्हां निराश न होतां तिचें रूपांतर शक्य तितक्या त्वरेनें घडून यावें, व हिंदुस्थानतेच्या राष्ट्रीय संस्थांत राष्ट्रीय जीवनाचा खरा संचार यंदा नाहीं तरी पुढल्या वर्षी तरी थोडा बहुत झालेला सुप्रसंग परमेश्वराच्या कृपेनें दिसून येण्याचा योग यावा अशी सदिच्छा धरून आपण यंदा या संस्थांच्या यंदाच्या बैठकीस हजर राहण्यासाठीं मद्रासला प्रयाण करूं या.

## आरोग्य खात्याचा रिपोर्ट.

आरोग्य आणि शिक्षण या दोन गोष्टी हिंदुस्थानचा खरा खरा उद्धार करणाऱ्या आहेत, आणि ह्मणूनच या दोन खात्यांच्या वार्षिक रिपोर्टांकडे सुशिक्षितांचे डोळे लागले असतात. पण खेदाची गोष्ट आहे कीं निदान १९१३ सालाबद्दलचा नुकता

पडलेला मध्यप्रांत आणि वऱ्हाड
...आरोग्य खात्याचा वार्षिक रिपोर्ट
...ंना मुद्दा चिंताकर्षक वाटणारा
...त्याचा अपवाद न करतां लोकांच
...आर्जुकन घेईल, आणि त्यांच्या इ...
...मर टाकून त्यांना सत्कार्यास प्रेरित
...असा रिपोर्ट लिहिण्याची कला अ...
...अधिकाऱ्यांना जशी साधली आहे
...मयाप हिंदुस्थानांतल्या अधिकाऱ्यांना
...ी दिसत नाहीं. प्रस्तुत रिपोर्टांत हा
...असला तरी त्याचें अंतर्याम गोड
...प्लेगनें गेल्यासाली
...नें या प्रांतावर कृपादृष्टिच
...शुभवर्तमान या रिपोर्टांत आहे.
...बंदोबस्तासाठीं सरकारनें डाक्तर वगैरे
...ला आणि प्लेग नाहींसा होण्याला
...गाठ पडली हा काकतालीय न्यायाचा
...मोठा चमत्कारिक आहे. तथापि
...सरकारी कामाची घडी ज्यास्त
...चालविली पाहिजे नाहींपेक्षां प्लेग्या
...गाविषयींचे सरकारचे सद्धेतु कसे विफल
...तें या काकतालीय न्यायानें स्पष्ट
...प्लेगच्या बंदोबस्तासाठीं नेमलेल्या
...ना प्लेगनें चंबुगवाळें आटोपल्यामुळ
...प्लेगप्रतिबंधक उपायाची महती लोकांना
...च्या कानावर म्हणजे लोकशिक्षणाच्या
...फिरते ठेवावे लागले! हें काम
...ला विद्याखात्याच्या मार्फत थोड्याशा
...करता आलें असतें. प्लेगच्या
...नाहीं तरी देवी टोंचून घेण्याच्या
...तरी लोकांना शिक्षण देण्याचे कामीं
...त्याचा उपयोग करून घेण्याची
...खुद्द ना० चीफकमिशनर साहेबांना
...आहे, व ती लवकरच अमलात
...ल अशी अपेक्षा करणें गैरवाजवी
...नाहीं. देवी काढविण्याचे कामीं जुन्या
...लोकांना प्रवृत्त करण्याचा उत्तम
...म्हणजे देवी टोचण्याला आमचें जुनें
...क प्रतिकूळ नाहीं अशी लोकांची
...करून देणें हा आहे. आमच्या
...वैद्यकावर लोकांचा अपार अढळ
...आहे. तेव्हां आमच्या चरकसुश्रुतादि
...आधार शोधून काढून ते आमच्या
...टाकल्यानें जें कार्य होईल तें
...जंतुशास्त्राचा आधार देण्यानें
...नाहीं. यासाठीं सरकारनें असे जुने
...आधार पाहून काढण्याचे कामावर
...हुशार व विद्वान् वैद्याची योजना
...कार्यभाग अधिक लवकर व चांगला
...अशी आम्ही नम्रपणें सूचना करतों.
...चा रोग खराब पाण्याच्या सेवनानें
...होत असतो. तेव्हां स्वच्छ पाण्याच्या
...ची तजवीज करणें हा त्या रोगाच्या
...चा उपाय आहे. आणि हा उपाय
...ची जबाबदारी सरकार व लोक यांच्या...
...रखीच आहे ही गोष्ट आमच्या लोकांस
...अत्यंत इष्ट आहे. सरकार या बा...
...आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजा...
...आहे हें पाहून समाधान वाटतें.

---

## राष्ट्रकार्य

...च्या २९ व्या राष्ट्रीय सभेसाठीं
...महाल पार्नी हातांत हात घालून
...व पूर्वीचा द्विभाव व तज्जन्य द्वेष-

भव हे जाऊन त्यांच्या स्थळीं प्रेमभाव पूर्ववत् नांदू लागावा म्हणून मुसल्मानमधील रथी महारथ्यांनीं भगीरथ प्रयत्न करून पाहिले पण त्या प्रयत्नास यश आलें नाहीं हें सहृदर्शनीं विषाद उत्पन्न करील पण विचाराअंतीं हीं बाह्य लटपटीचा समेट झाला नाहीं. ही आनंदाची गोष्ट होय.

महाराष्ट्र संबंधानें नामदार गोखले व लोकमान्य टिळक हे आपपल्या पक्षाचे मेरुमणी आहेत आणि आग्रहाचें रण पडलें की सुरतेच्या प्रसंगानंतर चालकेल्या या राष्ट्रीय सभेला कायदेशीर अस्तित्वच नाहीं व दुसरें प्रस्तुतचे तिचे नियम पूर्वी नोंदलेल्या व मान्य केलेल्या खेरीज संस्थांस सभासद निवडून देण्याचा अधिकार देतात त्या ऐवजीं ते नियम राष्ट्रीय सभेंत बहुमतानें बदलले जाण्यापूर्वीच वाटेल त्या लोकांकडून वाटेल त्याला सभासद निवडण्याचा अधिकार सुरतेस राष्ट्रीय सभेबाहेर पडलेल्या महाल मंडळीस अगोदर पाहिजे आहेत. दोन्ही मागण्या हट्टाच्या आहेत व राष्ट्रीय सभावाले त्या मान्य करितील तर त्यांचें आयुष्य सुरतेलाच खुंटलें व तेव्हां मृत झाल्यानंतर आतां ते पुनर्जन्मास येत आहेत असा अर्थ होतो. आणि हा मूलच्छेदी पांडित्यप्रकर्ष महालांच्याच तोंडीं चांगला शोभतो.

आमच्या दृष्टीनें मवाळ व जहाल या दोघांचेंही ध्येय राष्ट्रकार्य आहे. दोन्ही पक्षामध्यें गुणावगुण आहेत इतकेच नाहीं तर दोघांचे मार्ग एकच असणें संभवनीय नाहीं. एका पक्षाचा बाणा मुत्सद्दीपणाचा आहे तर उलट पक्षाचा बाणा लष्करीपणाचा आहे. दोन्ही पक्ष राष्ट्रकार्य मंगलप्रद करण्यासाठीं सरकारापाशीं नेटानें झगडत आहेत. दोघेही प्रामाणिक व सात्विक आहेत. एकाची राष्ट्रीय सभा चालू आहे तर दुसऱ्याचें मानसिक मनोराज्य चालू आहे. एकाची दश्यसभा जितकें कार्य सरकारच्या हातून घडवून आणीत आहे त्यापेक्षां अधीक फलप्राप्ती या दुसऱ्या पक्षाची मनःसृष्टींतील अदृश्य तारायंत्री सभा घडवून आणीत आहे हें विसरतां कामा नये. दोन्हीही पक्ष स्वतंत्र, पृथक् व मनःपूत रितीनीं आपापले राजमान्य उपक्रम चालू ठेवितील तर राष्ट्र कार्याचें पाऊल अधीक पुढें पडेल असें आम्हांस वाटतें.

---

## युद्धवृत्त

आमच्या स्थानिक सरकारनें 'युद्धवृत्त' म्हणून इंग्रजींत व मराठींत प्रसिद्ध करण्याचा नवीन उपक्रम चालू केला आहे. त्याचे पहिले तीन लेख प्रसिद्ध झाले आहेत. लोकांना खरी माहिती द्यावी, त्यांच्या समजुती गैर न व्हाव्यात आणि त्यांस युद्धाचें धोरण चांगलें बांधता यावें हा प्रयत्न आहे आणि या प्रयत्नाचे आम्ही अभिनंदन करितों. वरील लेखमालेंतील तिसरा लेख विशेष माहितीचा असून चांगला साग्र व संगतवार असा आहे. म्हणून आम्ही तो जसाचा तसाच आमच्या वाचकासाठीं खालीं देत आहों:—

### दर्यावरील युद्ध.

१. जमिनीवर तरी जर्मनीचे बेत आतांपर्यंत फसले आहेत. फ्रान्स व बेल्जम या दोन्हीं देशांत जर्मनीच्या सैन्याला संयुक्त सैन्यावर चालून जातां आलें नाहीं; आणि पूर्वेकडील रशियन सैन्याच्या स्वारीची काट थोपवून धरण्याकरितां जर्मनीला आपल्या सैन्याच्या नऊ तुकड्या (सरासरी ४ लाख फौज) पश्चिम रणभूमीवर तिकडे पाठवून याव्या लागल्या आहेत. तेथें आज बरेच दिवस मोठें तुंबळ युद्ध माजून राहिलें आहे. अगदीं ताज्या तारांवरून असें दिसून येतें कीं जर्मन लोकांनीं पोलंडमधील लोड्झ शहरांत शिरकाव केला आहे, पण तो पर्यंत रशियन फौजेचें कडें क्राको भोंवती आंवळत चाललें आहे. आणि क्राको तर आग्नेयी कडून जर्मनींत प्रवेश करण्याच्या रस्त्याचें नाक्याचें ठाणें आहे. अल्पकाळ कच खाल्ल्यानंतर सर्व्हियन सैन्यही पुनः एकदां आस्ट्रियावर चालून जात आहे अशी बातमी आली आहे. जर्मनी भोंवतालचा गराडा पुरा होऊं लागला आहे. आणि जर्मनी आतां चढाई करून जाण्याचें सोडून देऊन स्वतःचे बचावासाठींच लढत आहे. जर्मनीचे लष्करी बेत तर चांगलेच थंडे पडले आहेत. आतां त्याचे आरमारी बेतांना कितीसें जास्त यश आलें आहे. तें पाहूं!

२. जर्मनीचे आरमारी प्रधान ॲडमिरल व्हॉन टिरपिट्झ यांनीं सन १९०० साली एक लेख प्रसिद्ध केला त्यांत पुढील वाक्यें आढळतात. "जर्मनीची आर्थिक उन्नति व विशेषतः जर्मनीचा सर्व जगाशीं चालू असलेला व्यापार हा निर्विघ्न चालू कसा राहातील हा प्रश्न आजचे वर्तकेस जर्मन साम्राज्याला अत्यंत जिव्हाळ्याचा झाला आहे. केवळ एक वर्ष पर्यंत जरी आरमारी युद्ध सुरू राहून त्यांत जर्मनीला अपेश आलें तरी तेवढ्यानेंच जर्मनीचा जलमार्गाचा व्यापार अगदीं बसेल व त्या योगानें प्रथम जर्मनीच्या सांपत्तिक स्थितीवर व नंतर सामाजिक स्थितीवर अत्यंत अनिष्ट परिणाम घडून येतील" त्याच वर्षी, बलाढ्य लढाऊ आरमार ठेवणें हेंच एक आपल्या वसाहती व जलमार्गाचा व्यापार यांचें संरक्षण करण्याचें साधन आहे ह्या मुद्यावर जर्मनीनें आपलें आरमार पुष्कळ वाढविण्यासाठीं एक कायदा पास केला. ह्याच 'बलाढ्य लढाऊ आरमाराचा' वेळ आली म्हणजे इंग्लंडावर स्वारी करण्याचे कामीं ही उपयोग करावयाचा होता ह्यांत कांहीं संदेह नाहीं! हें उद्दिष्ट डोळ्यापुढें ठेवून जर्मनीनें दरवर्षी आपल्या आरमारांत अधिक अधिक भर घातली, आणि सन १९०० सालापासून तों युद्ध सुरू होई पर्यंतचे अवधींत जर्मनीनें मोठें लढाऊ आरमार तयार करण्याकडे, थोडे थोडके नव्हेत, तर ४९० कोटी रुपये खर्च केले.

३ युद्धाचे सुरुवातीस जर्मनीचें बहुतेक आरमार उत्तर समुद्रांत नांगरलेलें होतें. परंतु ब्रिटिश आरमार अकल्पीत वेगानें चोहोंकडून तेथें जाऊन पोहोंचलें, आणि त्यानें इंग्लंडच्या पूर्व किनाऱ्यावर पाहारा ठेवून शिवाय उत्तर समुद्रांतून बाहेर पडण्याच्या उत्तर व दक्षिण ह्या दोन्हीं बाजूच्या वाटा रोखून धरल्या. ब्रिटिश आरमाराचें अजस्त्र बळ पाहून जर्मन आरमार आपल्या बंदरांत तावडतोब निघून गेलें आणि तेव्हां पासून तें तेथेंच दडी देऊन बसलें आहे. अश परिस्थितींत जर्मनीनें इंग्लंडवर स्वारी करण ही गोष्ट अशक्य आहे.

४ तथापि उत्तर समुद्रांत मुद्दां जर्मन लोक अगदींच हात जोडून बसले आहेत असें नाहीं. त्यांचा जर्मनांचा उद्देश असा आहे कीं ब्रिटिश आरमाराशीं खुल्या दर्यावर सामना न करितां कारण तसें केल्यास जर्मनीचे आरमारी सामर्थ्य नष्ट होईल हें त्यांस माहित आहे ह्या समुद्रांत सुरुंग पसरून व पाणबुड्या बोटी पाठवून त्यांचे कडून शत्रूच्या एक एका जहाजाचा नाश करून तेणें करून शत्रूचें बळ कमी करावें. पण हा उद्देश विशेषसा तडीस गेला नाहीं. ॲबुकियन, हॉग, क्रेसी वगैरे ब्रिटिश गलबतें जर्मनीचे पाणबुड्या बोटींनीं बुडविलीं हें खरें. पण हीं सगळीं गलबतें जुनीं होतीं आणि त्यांचें नाशानें जी कांहीं नुकसानी झाली असेल ती सर्व हेलिगोलंडचे पलीकडे जें दर्यायुद्ध झालें त्यांत कित्येक जर्मन क्रूझरांचा व विनाशक बोटींचा नाश झाला त्यानें भरपूर भरून आली आहे.

५. कोणी असा प्रश्न विचारतील कीं, ब्रिटिश आरमारच पुढें घुसून जर्मनीचे आरमाराला बंदरांतून बाहेर का खेंचीत नाहीं? त्यांचें उत्तर हें कीं जर्मन लोकांनीं त्या समुद्रांत जिकडे तिकडे पाणसुरुंग पेरून ठेवले आहेत. त्यांना बाहेर खेचण्याचा प्रयत्न केला तर बहुधा ब्रिटिश आरमाराचा नाश होईल आणि जर्मन काफिला जर्मनीचेच बंदरांत अडकून बसला असता असें घडून करणें विशेष फायद्याचें नाहीं.

६. तर मग दोन्हीं आरमारें परस्परावर हल्ला करण्यास असमर्थ आहेत असेच म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश आरमार अधिक बलाढ्य असल्यामुळें जर्मनीची इंग्लंडवर स्वारी करण्याची छाती नाहीं हें खरें. पण, उलटपक्षीं, जर्मनीनें जो दर्यावर बंदोबस्त करून ठेवला आहे त्यामुळें इंग्लंडलाही जर्मनीवर स्वारी करतां येत नाहीं. शिवाय, रशियालाही जर्मनीवर उत्तरेकडून स्वारी करितां येत नाहीं, कारण उत्तर समुद्रांतून जर्मन आरमाराला कीलच्या कालव्याचे मार्गानें बाल्टिक समुद्रांत उतरता येईल आणि त्यामुळें रशियन लढाऊ जहाजांना आपआपल्या बंदरांतच थबकून राहणें भाग पडलें आहे.

७. युद्धाचे आरंभीं गोबेन व ब्रेसलौ अशीं दोन जर्मन लढाऊ जहाजें भूमध्य समुद्रांत होतीं. आरंभीं आरंभीं, त्या गलबतांनीं आफ्रिकेमध्यें असलेल्या फ्रान्सचे वसाहती पैकीं कांहीं किनारपट्टीच्या शहरांवर कुरपी गोळ्यांचा भडिमार करून फ्रान्सची कांहीं खराबी केली. परंतु भूमध्य समुद्रांत फ्रान्सचें बलाढ्य आरमार आहे आणि त्यानें, ब्रिटिश आरमाराच्या एका तुकडीच्या साहाय्यानें, ह्या गलबतांना पश्चिमेकडून हुसकून दिलें व त्यांना दार्देनेल्सचे सामुद्रधुनींत आसरा घेण्यास भाग पाडलें व तेथें त्यांचें टर्कीनें बेकायदा संरक्षण केलें (तें कसें ... निराळ्या ले... खांत स्पष्ट करूं). आणि ... आरमार

मध्य समुद्रांत आहे, पण उत्तर समुद्रांत तशी जर्मन काफिल्याची त्यांच्या बंदरांतून बाहेर पडून ब्रिटिश काफिल्याशी सामना करण्याची छाती होत नाहीं तशीच आस्ट्रियाचे आरमाराची फ्रेंच आरमारावर हल्ला करण्याची छाती होत नाहीं. भूमध्य समुद्रांत शत्रूंचीं जहाजें राहिलीं नाहींत असेंच वस्तुतः ह्मणण्यास हरकत नाहीं.

८. त्याच प्रमाणें जर्मनीचें किंवा आस्ट्रियाचें एकही जहाज आतां अटलांटिक महासागरांत नाहीं. निरनिराळ्या प्रकारचा माल त्यांनीं अमेरिकेंतून जर्मनींत न्यावा व ब्रिटनचा व फ्रान्सचा व्यापार बुडवावा या उद्देशानें जर्मनीनें प्रथम कांहीं व्यापारी गलबतेंच तोफा चढवून सज्ज केलीं पण असलीं सर्व जहाजें, उदाहरणार्थ, कैसर वुइल्हेल्म डर ग्रॉस व 'ह्वीवाल्ड' हीं ब्रिटिशांनीं आपले कबजांत तरी घेतलीं आहेत किंवा त्यांचा नाश तरी करून टाकला आहे. शत्रूच्या जहाजांना अटलांटिक महासागर आतां बंद झाला आहे.

९. जर्मन लढाऊ जहाजांनीं सर्वांत अधिक धुमाकुळ घातला तो पासिफिक व हिंदी महासागरामध्यें होय. येथें त्यांनीं ब्रिटिश जहाजाचें बरेंच नुकसान केलें व बरीच भीति उत्पन्न केली. उदाहरणार्थ. हिंदी महासागरात 'एम्डेन' व आणखी दोन तीन क्रुझरांनीं बरींच व्यापारी जहाजें धरलीं आणि कांहीं थोड्या शहरांवर कुलपी गोळेही टाकले. आपणास माहितच आहे कीं मद्रासला थोड्याशा कुलपी गोळयाचा लाभ झाला. पासिफिक महासागरांत 'शार्न्होर्स्ट' 'ग्नीसीना' 'नुरेंबर्ग' 'ड्रेस्डेन' आणि 'लीप्झिक' ह्या पांच जर्मन क्रुझरांनीं 'केप ऑफ गुड होप' व 'मॉन्मथ' ह्या दोन ब्रिटिश जहाजांचा नाश केला आणि तिसरें जहाज 'ग्लासगो' ह्याची बरीच खराबी केली. पण एम्डेनला हुडकून काढून त्यास जलसमाधि देण्यांत आली. आणि ह्या पांच जर्मन क्रुझरांपैकीं चार क्रुझरें ब्रिटिश क्रुझरांनीं बुडवून टाकिलीं आणि पांचव्याचा पाठलाग करण्यांत येत आहे अशी नुकतीच बातमी आली आहे. आतां पासिफिक व हिंदी महासागरांत शत्रूचें गलबत बहुतेक शिलक राहिलें नाहींच असें ह्मटलें तरी चालेल.

१०. ह्या दर्यावरील युद्धाचे काय परिणाम झाले आहेत ते आतां पाहूं. पहिली गोष्ट ही कीं, आरमारी राष्ट्र या नात्यानें आपण किती अधिक बलाढ्य आहों ह्याचा प्रत्यय ग्रेट ब्रिटननें जगास आणून दिला. त्यानें उत्तर समुद्रांतील जर्मनीच्या बलाढ्य आरमारास आपल्या बंदराचा आसरा धरून राहण्यास भाग पाडलें इतकेंच नाहीं तर त्यानें आटलांटिक व पासिफीक महासागरांतूनही शत्रूंचीं जहाजें हांकून दिलीं. शिवाय, जर्मनीचा जलमार्गाचा व्यापार पुष्कळसा बुडविला आहे. नुकतीच गणती करण्यांत आली आहे त्यावरून असें दिसून येतें कीं जर्मनीच्या एकंदर २,०२९ जहाजांपैकीं, थोडी थोडकीं नाहींत, तर ३३२ जहाजें पकडण्यांत आलीं आहेत, ह्मणजे आपल्या जहाजां पैकीं शेंकडा १६ जहाजें जर्मनी गमावून बसला आहे. ब्रिटिशांच्या ८९१४ आगबोटीं पैकीं काय त्या १०७ आगबोटी गमावल्या. पण येवढ्यानेंच संपलें नाहीं.

११. दर्यावर ब्रिटिशांचें सामर्थ्य विशेष अधिक असल्यानें त्यांना जर्मनीचे वसाहती साम्राज्यास खूब जोराचे रट्टे देतां आले. आफ्रिकेंत जर्मनीचे ताब्यांत असलेलें टोगोलंड ठाणें व कॅमरून बेटाचें मुख्य बंदर ड्युअला हीं ब्रिटिशांनी घेतलीं. पासिफिक महासागरांत आपिआ, सामोआ, हरबर्टशोहे आणि नौरू हीं बेटें आस्ट्रिया व न्यूझीलंड येथून आलेल्या सैन्यानें आपले कबज्यांत घेतलीं. आणि शेवटीं चीन मधील जर्मनीच्या मोठ्या वसाहतीचें मुख्य ठाणें क्येयाचौ हें ब्रिटिश व जपानी सैन्यानी मिळून सर केलें. इतर राष्ट्रांचें नुकसान करून सुद्धां जें आपलें द्वीपांतराचें साम्राज्य वाढवण्याची हाव जर्मनीला लागली होती त्या साम्राज्यापैकींच मोठा भाग जर्मनी आधीच गमावून बसला आहे!

१२. तथापि ग्रेट ब्रिटनचें आरमार इकडे जर्मनीचें वसाहती साम्राज्य रसातळास पोंचवीत आहे तर तिकडे तेंच आरमार सार्‍या ब्रिटिश साम्राज्याचें सामर्थ्य युद्धभूमीवर आणून पोहोंचविण्याचें साधन झालें आहे! आणीबाणीचे वेळीं मायदेशाचें साहाय्य करण्याकरितां सर्व साम्राज्यांतून जी फौज पाठविण्यात येत आहे तिचें संरक्षण अफाट समुद्रावर ब्रिटिश आरमारच करित आहे. आपल्या सर्वांच्या सामान्य शत्रू विरुद्ध लढण्याकरितां समरांगणावर आपआपली जागा घेण्यासाठीं कानडा, आस्ट्रेलिया व हिंदुस्थान ह्यांना आपआपलीं बहादर सैन्यें पाठवितां आलीं तीं ब्रिटिशांचे समुद्रावर असलेल्या प्रभुत्वामुळेंच होय.

१३. आणि शेवटीं आपण हें विसरतां कामा नये कीं ब्रिटिश आरमार शत्रूचा व्यापार बुडवीत आहे, ह्मणजे त्याचें द्रव्य बळ नष्ट करित आहे; व जर्मनीला तर सध्या द्रव्यबळाचीच विशेष निकड आहे. खुद्द जर्मनींत काय चाललें आहे तें कांहीं आपणास माहित नाहीं. व्यापार व उद्योग धंदे बसल्यामुळें जर्मन प्रजेच्या सुस्थितीवर कितपत परिणाम झाला असेल तें सांगतां येत नाहीं. पण अशा बातम्या येत आहेत कीं खाण्यापिण्याचे जिनसाचे भाव भडकूं लागले आहेत व लवकरच पुष्कळ कुटुंबास दारिद्र्याच्या अपेष्टा खातरीनें भोगाव्या लागतील. लढाईचा दारू गोळा तयार करण्यास अवश्य लागणार्‍या तांबें, सोरा वगैरे जिनसांचा तुटवडा जर्मनीस भासूं लागला आहे अशींही चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ब्रिटिश आरमार गुपचुप पण निष्ठुरपणें जी ही जर्मनीचा सांपत्तिक गळचिपी करित आहे ती जर्मनीला बरेच दिवस सोसवेल किंवा नाहीं हा प्रश्नच आहे.

## महायुद्ध

हें घोर रणकंदन मंद मंद चालूं आहे. पश्चिम रणक्षेत्रांत बेलजमचे भाग व खंदक शत्रूंच्या ताब्यांतून परत घेतले जात आहेत. क्यालेवर जर्मनी डोळे वटारते पण सर्वपक्षीं पूर्व बाजूला टर्कीची तारंबळ उडाली असून राशियाचें जड पाऊल आस्ट्रियन बाजूला मार्गें मार्गें चेपीत आहे. कोठें विमानांनीं बांब फेकून संहार होतो तर कोठें समुद्राच्या पोटांत ठेविलेले ज्वालाग्राही विध्वंस करितात. उत्तर समुद्रात कडेकोट युद्धाचीं पूर्व चिन्हेंचमकत आहेत. एकंदरीनें आमची बाजू विजयाचे मार्ग झाडून साफसूफ करीत आहेत. त्रिपोलीवर जर्मन व आरब आल्याबद्दल इटलीचें माथें भडकलें आहे.

## दक्षिण आफ्रिकेचा महावीर

दक्षिण आफ्रिकेंतले महान् देशभक्तवीर मी. गांधी हे आपल्या पत्नीसह हिंदुस्थानांत येण्यास निघले असून ते या आठवड्यात आपल्या किनाऱ्यावर येऊन उतरतील तेव्हां व राष्ट्रीय सभेच्या मंडपात पाऊल ठेवतील तेव्हा त्याचा मोठा सन्मान करण्याचा विचार मुंबईकरांनीं ठरविला आहे. तो अगदीं योग्य आहे. त्याचा सन्मान ह्मणजे आपलाच सन्मान आहे असें प्रत्येक हिंदीगृहस्थ समजल्यात तिळमात्र संदेह नाहीं.

## दुःखाची बातमी.

आपले अंगच्या सौजन्यादि सद्गुणांनी हिंदुस्थानच्या प्रजेचीं अंतःकरणें ज्यांनीं पूर्णपणें वश करून घेतलीं आहेत असें आमचे लोकप्रिय व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज सा० यांचेवर एका मागून एक दोन मोठाले दुःखाचे प्रसंग या वर्षांत आलेले पाहून कोणाला त्यांचेविषयीं सहानुभूति वाटणार नाहीं. दिल्लीच्या अत्याचारामुळें झालेल्या दुखण्यांतून उठतांच अत्यंत प्रिय पत्नीचा वियोग त्यांना सहन करावा लागला आणि त्या गोष्टीला पुरतें वर्ष हो लोटलें नाहीं तोंच मुलगा लढाईंत जखमी होऊन मेल्याचीही बातमी आली. असे दुःखाचे प्रसंग ह्मणजे मनुष्याच्या मनाच्या खंबीरपणाची कसोटीच आहे, आणि त्याच्या दुःखाचे वाटेकरी होण्यास तयार अशी हिंदुस्थानची तीस कोट प्रजा आहे हें मनांत आणून लाट साहेब त्या कसोटीला पूर्णपणें उतरतील अशी आह्मी आशा करतों.

इजिप्त देश इतके दिवस तुर्कस्थानच्या सुलतानाच्या नामधारी छत्राखालीं असे तो आतां इंग्रजांनीं आपल्या संरक्षणाखालीं घेतला ह्मणजे त्याला ब्रिटिश प्रोटेक्टरेट केल्याबद्दलचा जाहिरनामा गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाला आहे. रक्ताचा एक थेंब पडल्याशिवाय झालेल्या राज्यक्रांतीचें दुसरें उदाहरण जगाच्या इतिहासांत क्वचितच असेल.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—वातावरण चांगलें निवळलें असून चर्मोला उत्तेजक थंडी, तेजस्वी सूर्यप्रकाश व नीलवर्ण आकाश यांच्या समृद्धीनें आरोग्यसंपदा पुनः उत्कर्ष पावत आहेत.

**सारा**—शेतकरी लोक आपापल्या पीकांच्या पुढील योजनेंत चिंतातुर आहेत. सरकारी साऱ्याची मुदत एक दोन महिने वाढेल तर कापूस इतका जलदीनें बाजार पाहणार नाहीं असा अंदाज आहे.

**रस्तेलूट**—कापूस विकून त्याची रकम घेऊन सायंकाळीं शेतकरी परततात तेव्हां पाळत ठेऊन कांहीं दरवडेखोर रस्तेलूट करीत असतात. तेव्हां बार्शीटाकळी रस्ता किंवा वाशिम रस्ता रात्रीचा वर्ज्य होईल तितका बरा.

रा. रा. वामन गणेश साठे प्रासिक्युटींग इनस्पेक्टर आकोला हे बुलढाण्यास बदलून गेले आहेत. हे गृहस्थ आपल्या कामांत चोख, कायदेकानूंत हुषार व आज सात वर्षांच्या अनुभवानें परिपक्व असे आहेत. स्वभावही तिखटपणा सोडून अधीक चांगुलपणाकडे वळत आहेत.

अलिशान नामदार सर राबर्टसन चीफ कमिशनर हे दमो जिल्ह्यात फिरत असून जानेवारी २ ला नागपुरास परत येतील.

रा. रा. रामचंद्र वासुदेव पराजपे आडिशनल डिस्ट्रीक्ट जज्ज, नं. २ उमरावती यांस येत्या जानेवारी पासून १० महिन्याची हक्काची रजा देण्यात आली.

वरील रजेंत रा. रा. रघुनाथ माधव भगाडे यांस आफि. सबजज्ज करून उमरावतीस नेमिलें.

रा० रा० अबदूल रहिमखान तहशीलदार माजिस्ट्रेट वर्ग २ यांस क्रि० प्रो० कलम ५६२ खालील अधिकार देण्यात आले.

**अभिनंदनः**—रा० रा० सी० इ० लोसाहेब डायरेक्टर— शेतीखातें यांच्या उत्कृष्ट सद्गुणांचा व कुशाग्र बुद्धीचा व बहुव्यापक कार्यदृष्टीचा लाभ या प्रांताला विशिष्ट प्रकारें होत होता किंबहुना या प्रांतातील हें खातें प्रस्तुतच्या उज्वळ व भरभराटीच्या स्वरूपाला आणण्याला हेच लोकप्रिय गृहस्थ विशेष कारणीभूत आहे. यांची बढती इंडिया सरकारच्या तैनातीस उद्योग व व्यापार खात्याकडे झालेली पाहून सर्वांस आनंद वाटेल व हें अधिकारी रत्न आपल्या मनोहर रश्मींनीं सर्व राष्ट्रीय प्रद्योत होईल असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

फायनान्स कमिटी— प्रांतिक कायदे कौंसिलांतील बिन— सरकारी सभासदांनीं नामदार सर बिपिन कृष्ण बोस मोरोपंत जोशी व नारायणराव केळकर यांची बहुमतानें फायनान्स कमिटीची त्रयी निवडण्यांत आली.

रा. रा. नारायण रामराव गुप्त, तहशीलदार, खामगांव हे पिंपळगांव राजे येथें दौऱ्यावर फिरत असतांना पंधरा दिवसापूर्वी प्रातःकाळीं मुखमार्जनाच्या वेळीं एकाएकीं छातींत कळ येऊन काळजाची क्रिया बंद पडली व प्राणोत्क्रमण झालें. हे गृहस्थ धार्मिक, धर्मजागरूक व कर्तव्यनिष्ठ असत. कार्यक्रम चालू असतांना मरण स्वल्पकाळांत येण्याला देखील मनुष्य पुण्यवान असावा लागतो. राजश्री नानासाहेब हे गोड स्वभावाचे व लोकप्रिय असत आणि त्यांच्या मरणानें सरकारचा एक चांगला अधिकारी व आप्तमित्रमंडळीचा एक प्रेमळ गृहस्थ हरपला!

शेकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ‌॥८१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं० ३३७



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांढ्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपये.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो. नं० १९



मागलिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरितां

सेंटचाराजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥॥- व रु. २ ट ख. वेगळा. सुवासिक कार्डे दिलचमनचीं दर डझनास रु. -॥- "


सेल एजन्ट्स. एच, आर. मोदी आणि कं.

नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबइ.



सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक--** डा. गौतमराव केशव, आणि सन्स

ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबइ नंबर २.

नो० नं १११



## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDs 4½ CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8 668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 3136,421 | 1.41,32356 |
| 1903 | 41,07 009 | 2,19,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*

CHIEF AGENT,

*C. P. Berar & Khandesh,* NAGPUR


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्माराम छापून प्रसिद्ध केलें